१५ ६ आगष्ट १९१५

Regd-No. N°150

# वऱ्हाडसमाचार

Berar-Samachar.

ही खर्चाची वाट ४ आणे. प्रांत ३
...देश १७, बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३
११, मद्रास ४३, व मुंबई २९.
या मानानें पोलिसाच्या वर्तनांत
मात्र सुधारणा दिसत नाहीं.
...गाच्या शिक्षेविषयीं हिंदुस्था-
...

वर्ष ४९ ] आकोला––सोमवार तारीख २ माह आगष्ट सन १९१५ ई० [ अंक ३०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

### अस्सल अंगूरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।॥= ता. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें––

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### जाहीर नोटीस.

बळीराम वा॥ गणपती वैराळ राहणार बोरगांव वैराळाचे ता. बाळापूर जि. अकोला पोष्ट अंदूरा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुमचे देवेत्रीवेचें खातें माझे दुकानीं आहे. त्या खात्याची बाकी तुमचेकडे वसूल वजा जातां रुपये १०५ एकशें पांच घेणें निघाली ती आणि शिवाय दोन दस्तैवज एक तारीख १६ ६-१९१२ चा रुपये ३०० आणि दुसरा दस्तैवज रुपये ३९८ चा ता० १८-५ १९१४ असे होते. मी तुह्मास खाते बाकिची रक्कम व्याज जर रक्कम देण्यास नसेल तर दस्तैवज करून द्या. असें ह्मटले कीं, या खाते बाकीच्या दस्तैवजा शिवाय आणखी दोन मागिल दस्तैवज रुपये ३०० तिनशेंचा आणि रुपये ३९८ चा असे आहेत असा दाखला घाला असे ह्मटले असतां तुह्मी इनकार केला. व दस्तैवज अपूरा लिहिलेला परत घेऊन गेले. यावरून मजला धास्ती वाटते कीं, माझी एकंदर रक्कम व्याज मुद्दल सुद्धां बुडवून टाकण्याच्या विचारांत आहा. यासाठीं तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुमची सर्व स्थावर जंगम इस्टेट खुली असून तिजवर दुसरें कोणाचे कर्ज नसून मोकळी आहे. आणि आतां माझी रकम बुडविण्या साठीं तुह्मी कोणापाशीं गहाण, खरेदी करून दिल्यास या नोटिशीचे तारखे पासून जो व्यवहार कराल तो रद्द व बातल समजला जाईल. माझे घेणें असलेल्या रकमेचा बोजा तुमचे इस्टेटीवर प्रथम राहील. तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी माझे दस्तैवजाची व खाते बाकीची रकम चुकती करून पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास मी तुमचेवर दिवाणींत फिर्याद करीन. ही नोटीस दिली सही. ता. ११ माहे ७ सन १९१५ इ०

सही

रघुनाथ नंदराम मारवाडी द० खु०
नो० नं० ३११

## NOTICE

*Grass. Grass. Grass.*

Season cut fodder grass of the best quality delivered on the rails at Rs. 24/-per ton.

Grass baling operations on a limited scale will be started at Warora Station on the G. I. P, Railway, soon after tho monsoons, and in order to avoid disappointment, all intending purchasers are requested to send in their indents to the undersigned before the 31st August 1915.

Sd/ W. J. Anthony.
Divisional Forest Officer,
N. N. 312 North Chanda Division

## नोटीशीचेदर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### सचित्र कोकशास्त्र.

रसिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ कालपर्यंत आहों व जो अतिशय पारिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरुषांचीं जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरुषांच्या अनेक रोगांची औषधी चिकीत्सा व त्यांचें निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचें एक भांडारच आहे. किंमत रू.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बाळबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा, अलीगढ.
नो. नं २७०

### नोटिशीचें उत्तर,

नोटीस बेशमी भागू मर्द किसन कासार रा० तांबोळ ता० मेहकर जि० बुलडाणा इजला:—

मी खालीं सही करणार रा० सुलतानपूर ता० मेहेकर कळवितों कीं तूं आकोला वऱ्हाडसमाचार ता. ७-६-१५ ई. अंक २२ यात नो. नं. २२८ ची दिलेली ता० १२-७-१५ ई० रोजीं मिळाली. ती अगदीं खोटी आहे. वरून मुदतींत उत्तर देतों कीं, माझ्या चिजा सोन्याची नथ मासे ७ व चांदीच्या पाटल्या तोळे १० तुझ्या आंगावर असतां तूं पळून गेल्यापासू आह्मी ५–६ वेळ तुला आणण्यास अ परंतु तुझ्या बापानें तुला प्रत्येक वेळीं ठेविलें. ह्मणून तूं माहेरी केलेल्या कर्जाचा व नोटीस खर्चाचा मी मुळीच जबाबदार नाहीं. योग्य कायदेशीर माझ्या फारकती शिवाय तूं दिलेल्या फक्त नोटीशीनें माझा तुजवरील नवरे पणाचा हक्क जन्मभर सुटणार नाहीं. ही नोटीस तांबोळ येथें

शेतकी कॉलेजांत पडणारे पदवी[illegible]का पोचस्या इतकेंच [illegible] वरील चिजा व शाळा माझे घरीं यावे. झालेले आहे. या मुदतींत हे कोर्टांचें मदतीनें तुका ताब्यांत घइन, आणि चिजा व ळाघालेला सर्व खर्च तुझ्या बापाचे इस्टेठीवर कोर्ट मार्फत वसूल केला जाईल. कळावें तारीख २०-७-१९ ई.

दस्तुर सदाशिव विठ्ठल ओंजनी खुर्द.

सही.

किसन तुळशीराम कासार

द. खु.

नो० नं०३१३

## नोटीस

नोटीस बेशमी बळीराम जानकीराम वाढी साहु दुकान जवळ बु॥ ता. खामगांव व जिल्हा बुलंडाणा.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे जवळ खुर्द येथील सुकदेव वा॥ नरसाजी पाटील याचे मालकीचें मौजे गायगांव येथील सेत सर्वे नंबर २८ एकर १७ गुंठे ३९ आकार रुपये २३ पांतील ॥= ८ चा हिस्सा उत्तरेकडील, हे सेत माझें जवळ रक्कम रुपये २०० दोनसेवर ता. १९।४।१९०८ सालापासून गहाण आहे व तें गहाणखत वरील सुकदेव वा॥ नरसाजीनेंच लिहून देऊन नोंदून दिले अहे. सदर्हु सेत तुमचेही जवळ ता. १०।४।११ रोजी वरील इसमानें गहाण लिहुन दिल्याचें मी ऐकतो. व मीं असेंही ऐकतों कीं तुझी खामगांव कोर्टांत वरील इसमावर दि. मु नं. ७१/१४ चा हुकुमनामा मिळवून ताब्यांत घेतले आहे. तरी तुह्मांस सदरहु नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मांस ही नोटीस पावलें दिवसापासून आठ दिवसाचें आंत आमचें गहाणखताची रक्कम व्याज व मुद्दल सुद्धां आणून देऊन आमची पावती घेऊन जावी तसें न केल्यास रीतीप्रमाणे रक्कम वसूल करणें भाग पडेल मग तुमची कोणत्याही प्रकारची सबब ऐकली जाणार नाहीं. ह्या नोटीसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें ता. २९।७।१९ इ.

सही.

भगवानदास शंकरलाल द. खु.

राहणार बाळापूर मु.

आकोला.

नो. नं. ३१४

## नोटीस

रा० वैजीनाथ राजाराम जात ब्राह्मण रा० खामगांव.

यांसः—

जेठमल रामलाल अ० पा० क० आई केशरबाई जवजे रामलाल मु. खामगांव ता॥. मलकूर जि० बुलढाणे.

याजकडूनः—

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी खाली लिहिलेले मितीस रुपये नेऊन सोने चांदीचे नग गहाण ठेविले त्याचे वर्णन.

१२० मिती आश्विन शु॥ २ संवत १९६९ रोजी ६।- सोन्याच्या गुंड्या साखळी सह घड्याळाचे चेन सोन्याचे दोनी वजन अंदाज तोळे.

४७५ मिती आश्विन शु॥ ६ संवत १९६९ रोजी २१ सोन्याचे आड वजन अंदाज तोळे एकविस कांचेचे [illegible] मणी व गाठविलेले दोरे व लाख [illegible] या सुध्दा अंदाज तोळे १.३ पुतळ्या सोनेचा नग २४ व त्यांत मणी ४ [illegible] पदक सोन्याचे एक गाठविलेले [illegible] वस्तु सुध्दा वजन अंदाज तोळे

१७५ मिती भाद्रपद सुधी ९ संवत १९६९ रोजी ६॥ सोन्याची परांची हातातील अंदाज वजन तोळे.

९६ चांदीचा तोड्याचा जोड वजन तोळे अंदाज.

येणेप्रमाणें सोनें चांदीचे दागीनें गहाण ठेऊन रुपये नेले त्यास व्याज दरमहा दर शेकडा एक रुपयाप्रमाणें ठरविले आहे तरी तुह्मी आतां पावेतो रकम आणून गाहाणमाल सोडविला नाहीं तरी या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत रकम आणून देऊन गाहाण माल सोडवून न्यावे तसे न केल्यास तुमचेवर रकम व त्याचे व्याज व नोटीसीचा खर्चा बदल दावा करून रुपये भरून घेतले जातील. कळावे तारीख २८ माहे जुलाई सन १९१९ इसवी.

सही.

जेठमल रामलाल अ० पा० करणार आई केशरबाई जवजे रामलाल तर्फे कुलमुखत्यार श्रीकिसनदास हिरालाल दस्तुर खुद सही मारवाडीत.

नो० नं० ३१९

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य ८ शके १८३७

## मध्य आशिआ आणि प्राचीन भारत.

प्राचीनकाळीं भरतखंड हा देश अत्यंत सुधारलेला देश होता ही गोष्ट आतां अगदीं निर्विवाद सिद्ध झालेली आहे. प्राचीन भारतीय सुधारणा नुसता हा देशच व्यापून राहिली नव्हती, तर तिबेट, मध्य आशिआ, चीन, मंगोलिया, जपान, ब्रह्मदेश, सयाम कंबोडिया, जाव्हा, सुमात्रा वगैरे आसमंतांतल्या देशांत व द्वीपांतही तिनें आपला ध्वज लावल्याचीं चिन्हे दिवसें दिवस प्राचीन इतिहाससंशोधकांत अधिकाधिक दिसत आहेत. मध्य आशिआंत संशोधकांनीं जे खोदकाम चालविलें आहे त्यांत त्यांना अनेक मंदिरें, मूर्ति, चित्रें, वगैरे सांपडलीं आहेत व त्यांवरून प्राचीन भारतीय सुधारणेची छाप या देशांवर किती पडली होती त्याचें अनुमान करतां येतें. सुप्रसिद्ध संशोधक सिल्व्हेन लेव्ही यांनीं या सांपडलेल्या वस्तूंच्या आधारानें प्राचीन भारतीय सुधारणेविषयीं एक विद्वत्तापूर्ण लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांत कुचा नांवाचें प्राचीन राज्य व त्याच नांवाची नगरी यांच्या संबंधाची हकीकत विशेष मजेदार आहे. पूर्वीं मध्य-आशिया हें स्थळ पारसिक, तुर्क, तिबेटी बौद्ध, यहुदी, ख्रिस्ती, या सर्व भिन्न भिन्न राष्ट्रांच्या व धर्मांच्या लोकांचें परस्परांना भेटण्याचें स्थान होतें. कुचा हें राज्य चीन व तुर्कस्थान यांच्या मध्यें या दोन राष्ट्रांच्या सीमांना लागून होतें. येथें प्रथम आर्य लोकांची वस्ती होती. त्यांचे धर्मग्रंथ संस्कृत भाषेंत होते. पुढें बौद्धधर्माचा प्रसार झाल्यावर त्या राज्यांतल्या लोकांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला व विहार आणि मठ बांधून त्यांत भिक्षु राहूं लागले व धर्मचर्चा करूं लागले. तेव्हांपासून त्या लोकांनीं स्वतःची वर्णमाला व स्वतःची स्वतंत्र भाषा काढली आणि त्या भाषेंत संस्कृत ग्रंथाची भाषांतरें केलीं. बौद्ध पालीग्रंथांची ही भाषांतरें झालीं. ज्योतिष व आयुर्वेद यांसारख्या शास्त्रीय विषयांवर कुची भाषेंत भाषांतरित ग्रंथ झाले. या ग्रंथांचे अवशेष हल्लीं उपलब्ध झाले आहेत व ते रशियन आणि जपानी संशोधकांनीं पेट्रोग्राड व टोकिओ येथें नेऊन पुराणवस्तुसंग्रहालयांत ठेविले आहेत. विनयपिटक, अभिधम्मसुत्त, उदानवग्ग, महापरिनिव्वाणसुत्त वगैरे बौद्धग्रंथांचीं कुची भाषेंतलीं भाषांतरें उपलब्ध झालीं आहेत. कुचा राज्यांतले लोक बौद्ध धर्मीं होते असें दिसतें. पण ते महायान पंथाचे होते हें अद्याप निश्चित नाहीं. कुमारजीव नांवाचा एक महान् कर्तृत्ववान् लेखक संस्कृत ग्रंथांचा चिनी भाषेंत भाषांतरें करणारा ह्मणून प्रसिद्ध आहे. हा कांहीं दिवस या राज्यांत येऊन राहिलेला होता. बौद्धधर्माच्या मागून तांत्रिक मताचा प्रचार तेथें सुरू झाला. ब्रह्मकल्प नांवाची एक पोथी तेथें सांपडली आहे. तींत अनेक देव देवतांचीं स्तोत्रें आहेत. देवांचीं स्तोत्रें आहेत यांत नवल नाहीं, पण चांडालपत्नी, चांडालकन्या, फार काय पण उंट, हरिण इ० पशूंना सुद्धां वंदन करण्याचे श्लोक आहेत! त्याचप्रमाणें भिन्न भिन्न नक्षत्रांवर जारणमारणादि प्रयोग केले असतां काय फळ प्राप्त होतें तें ही सांगितलें आहे. वैद्यक ग्रंथांत परस्पर विरुद्ध फळ उत्पन्न करणाऱ्या खाद्य पदार्थांची मीमांसा करणारा एक ग्रंथ सांपडला तो हल्लीं लंडन येथें ब्रिटिश म्युझियममध्यें ठेविला आहे. धर्म व शास्त्रीय ग्रंथांप्रमाणें ललित वाङ्मय ही कुची भाषेंत होतें. कादंबऱ्या बहुतेक बुद्धचरित्रांतल्या निरनिराळ्या प्रसंगावर लिहिलेल्या आहेत, व नाटकांचा नायक सुप्रिय नांवाचा कोणी एक चक्रवर्ति राजा आहे. अनेक नाटकांत ऋष्यशृंग मुनि व त्यांची पत्नी ( रामचंद्राची बहीण ) शांता, व्यास व गौतम ऋषि, बिभीषण, राजनंदिनी मुक्तिका व राजा महेंद्रसेन अशी नांवें आढळतात. नाटकांतून प्रत्येक ठळक पात्राबरोबर ( नायकाबरोबर ) त्याचा मित्र विदूषक हाही आहे. पद्यरचनेच्या छंदांचीं कित्येक नांवें संस्कृत अलंकारशास्त्राला अपरिचित तथापि संस्कृत आहेत. जशी—मदनभरत स्त्रीविलाप इ. यांवरून सिल्व्हेन लेव्ही हे पंडित हे असें अनुमान काढतात कीं कुची भाषेंतलें साहित्यभांडार बरेंच मोठें असावें. त्यावेळचें सरकारी दप्तर ही सांपडतें. त्यांत करारनामे, उंटावरील स्वारांना दिलेले परवाने, जमाखर्चाच्या वह्या व परराष्ट्राशीं केलेल्या पत्रव्यवहाराचे कागद वगैरे महत्त्वाची इतिहास सामुग्री आहे. हे सर्व ग्रंथ व कागदपत्र नीट व्यवस्थेनें जुळवून त्यावरून त्या देशाचा सांगोपांग इतिहास लिहिण्याचे परिश्रम जर कोणी करील तर त्यास प्राचीन भारतीय सुधारणा मध्य आशिआंत कशी प्रसार पावली होती त्याचा बराच मनोरंजक वृत्तांत लिहितां येईल असें सिल्व्हेन पंडिताचें मत आहे.

## ब्राह्मण आणि शेतकी.

मद्रासचें कॉमनवील हें साप्ताहिक पत्र मिसेस ॲनी बिझांट यांच्या संपादकत्वाखालीं मोठ्या झोकांत चाललें आहे. हें पत्र बहुधा दर तिमाहीस एक पुरवणी अंक काढीत असतें व त्या अंकांत एकेका महत्त्वाच्या विषयाची निरानिराळ्या अंगानें चर्चा करणारे विद्वान् लेखकांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध होत असतात. आर्थिकस्थिति, व शिक्षण यासंबंधाच्या पुरवण्या पूर्वीं येऊन गेल्या. गेल्या आठवड्यांत शेतकी या विषयाचा पुरवणी अंक आमचे होतीं आला आहे. यांतल्या पाहिल्या संपादकीय टिप्पणींत थोडक्यांत कृषिकर्माची सद्यःस्थिति व ती सुधारण्याचे उपाय यांचें विवेचन मार्मिकपणें केलें आहे. या विवेचनांतलें एक वाक्य आह्मांस आक्षेपार्ह वाटतें. प्राचीन काळीं ब्राह्मण कृषिकर्म क्वचित्च करीत असत असें जें ह्मटलें आहे तें सत्यास सोडून आहे. महाभारताच्या आदिपर्वांतच धौम्यमुनि व त्यांचें शिष्य याची कथा आहे तिजवरून वरील विधानाचें असत्यत्व सिद्ध होतें. महाभारत, रामायण, पुराणें, काव्यें वगैरे सर्व वाङ्मयांतून ऋषींचें जें चारित्र्य वर्णिलें आहे त्यावरून तत्कालीन ब्राह्मण शेतकी करून निर्वाह करीत व बाकीच्या वेळांत अध्यात्मिक चर्चा करीत असें स्पष्ट दिसतें ऋषींच्या चारित्राचा तो आदर्श आमच्या दृष्टीआड झाला व ब्रह्मण लोक सेवापरायण होऊन कृषिकर्मास पराङ्मुख झाले याचा दोष त्या पूर्वकालीन ऋषींवर घालणें हा निवळ अन्याय आहे. इंग्रजी अमदानीच्या आरंभीं ब्राह्मणांना नोकरीची लालूच दाखवून व इंग्रजी शिक्षणक्रमापासून शेतकीसारख्या विषयाला दूर ठेवून कृषिकर्माविषयींच्या ब्राह्मणांच्या ( सुशिक्षित वर्गाच्या ) पराङ्मुखतेंत भर घालण्याची चूक सरकारी अधिकाऱ्यांनीं केली असतां तिचें खापर त्या सुशिक्षित वर्गावर फोडणें हा ही तितकाच अन्याय आहे. अलीकडे शेतकी कॉलेजें व शाळा काढून अधिकारी आपल्या चुकीची दुरुस्ती करूं लागले. त्या बरोबर ब्राह्मणवर्गही आपल्या कर्तव्याला जागृत झाला आहे.

शेतकी कॉलेजांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे पदवीधर बहुतेक ब्राह्मणच आहेत. इतकेंच नाहीं, तर नवीन नमुन्याची शेतकी शाळा काढून सरकारच्या अदरास पात्र झालेले अलिबागचे श्रीमंत सरदार बिवलकर हे ही ब्राह्मणच आहेत. घरची शेतवाडी असलेले अनेक तरुण ब्राह्मण नोकरीचा नाद सोडून शेतकीचा धंदा करूं लागले आहेत, व त्यांना काल्हापूरचे माजी प्रोफेसर परांजपे यांच्या सारखी वृद्ध मंडळी मार्गदर्शक होत आहे, यावरून ब्राह्मणवर्ग कृषिकर्माविषयींच्या आपल्या कर्तव्यास हळूं हळूं पुनः जागृत होऊं लागला आहे हें स्पष्ट होत नाहीं काय? ब्राह्मणवर्गाच्या नांवानें निष्कारण खडे फोडण्यांतच कित्येकांना जी मौज वाटते तिच्यांतलें इंगित आह्मांस तरी कळत नाहीं.

## हुंडा.

स्नेहलतेनें दिलेल्या स्वतःच्या प्राणाच्या बळीनें बंगालच्या हुंडादेवीची तृप्ति अखेर झाली नाहीं ती नाहींच! कोमल, तरुण कन्यकांचे बळी घेणारी ही देवी कसली, राक्षसी ह्मटली पाहिजे! या राक्षसीची मात्रा अशिक्षितापेक्षां सुशिक्षितांवर आणि दुर्धारक ह्मणून तुच्छ किंवा तिरस्करणीय समजल्या जाणाऱ्या जुन्या चालीच्या लोकांपेक्षां समाजसुधारणेचा उदो उदो करणाऱ्या सुधारकांवरच विशेष चालते हें आश्चर्य ह्मटलें पाहिजे. बंगालच्या ब्राह्मसमाजिष्टांना देवांच्या मूर्ति देव्हाऱ्यांतून बाहेर फेकतां आल्या, व गळ्यांतलें यज्ञोपवीत तोडतांना मानासिक कष्ट झाले नाहींत, पण हुंड्याच्या रूपानें अंतःकरणांत वसणाऱ्या सुवर्णमूर्तीला बाहेर काढून फेकतां येत नाहीं व रौप्य मुद्रिकांचा पाश त्यांच्यानें तोडवत नाहीं. ब्राह्मसमाजांत हुंडाघेण्याचें खूळ उलट वाढत चाललें आहे असें अमृतबाझार पत्रिका ह्मणते. ज्यांच्यानें लोभ टाकवत नाहीं, ते लोक निर्लज्जपणें सुधारणेची तत्त्वें लोकांना उपदेशण्यास जेथें पुढें येतात, त्या समाजाची स्थिति कशी असली पाहिजे याचें अनुमान कोणालाही करतां येण्यासारखें आहे.

## हुंडानिषेधाचें एक ऐतिहासिक उदाहरण.

दक्षिणेंतल्या सुप्रसिद्ध विजयनगराच्या गादीवर राजा दुसरा देवराय यानें इ. स. १४२२ पासून १४४८ पर्यंत राज्य केलें. या राजाच्या वेळीं हुंडा घेण्याची पद्धति ब्राह्मणसमाजांत जारीनें होती, व तिचे दुष्परिणाम ही समाजांत दिसत होते. ते पाहून ही पद्धति बंदकरण्यासाठीं या राजानें तामिल, तेलगु, कर्नाटक वगैरे प्रांतांतून विद्वान् विद्वान् शास्त्री, पंडित वगैरेंची सभा बोलाविली. या सभेसाठीं प्रत्येक गांवांतला एकेक शिष्ट ही बोलविला होता. या सर्वांच्या समोर हुंडा पद्धति शास्त्रसंमत आहे काय असा प्रश्न त्यानें चर्चे साठीं मांडिला. तेव्हां बरीच चर्चा होऊन ती शास्त्रनिषिद्ध आहे असा निर्णय ठरला. हा निर्णय ठरल्यावर शास्त्रांनीं निंद्य ठरविलेल्या या पद्धतीचा स्वीकार करणारास काय दंड ठरवावा हा प्रश्न पुढें आला. तेव्हां हुंडा घेणारास पतित समजून त्यास समाजानें बहिष्कार घालावा असें ठरविण्यांत आलें. राजानें या ठरावाला लागलीच कायद्याचें स्वरूप देऊन हुंडा घेणें हा फौजदारी गुन्हा आहे असें जाहिर केलें व तेव्हांपासून त्या राज्यांत हुंड्याचा बीमोड झाला असा इतिहास आहे.

## युद्धारंभाचा स्मारकदिन.

ता. ४ आगष्ट १९१४ रोजीं ब्रिटिश सरकारनें न्यायाचें रक्षण व भूतदया यांनीं प्रेरित होऊन जर्मनीशीं युद्ध जाहिर केलें, त्याला येत्या चौथ्या तारखेस बरोबर एक वर्ष होईल. या दिवसाचें महत्त्व आणखी शेपंनास वर्षें तरी कोणाच्या ही स्मरणांतून जाणार नाहीं, अशी वस्तुस्थिति असली तरी या युद्धारंभाचा स्मारकदिन विशेषरीतीनें लोकांनीं पाळावा व त्या दिवशीं ब्रिटिशराष्ट्राविषयींचें आपलें प्रजेचें कर्तव्य काय आहे याची जागृति लोकांना करून द्यावी हें इष्ट आहे असा सद्धेतु मनांत धरून हा दिवस विशेष रीतीनें पाळला जावा अशा विषयीं कित्येकांनीं चळवळ चालविली आहे. आमच्या मतें ही चळवळ अगदीं समयोचित व रास्त असून प्रत्येक हिंदी मनुष्य तिला आपली पूर्ण संमति देईल अशी आमची खात्री आहे. प्रस्तुत युद्धाचा अखेर केव्हां व ज्या प्रकारें व्हावयाचा असेल तो होईल; ईश्वराची इच्छा जशी अगम्य आहे तशी अनुल्लंघनीय ही आहे. पण हें युद्ध इतिहासांत क्रांतिकारक होईल ही गोष्ट आतां अगदीं निर्विवाद आहे. या युद्धानें ब्रिटिश राज्य व हिंदुस्थान यांच्यांतलें प्रेमबंधन दृढ केलें आहे; हिंदिप्रजेच्या उज्ज्वल राजनिष्ठेविषयीं ब्रिटिश राष्ट्राची पूर्ण खातरी करून दिली आहे; परस्परांविषयींचे परस्परांच्या मनांतले किंतु पार घालविले आहेत; राजनिष्ठा, समता व भ्रातृभाव या भावनांना उत्तेजित केलें आहे; व हिंदुस्थानच्या भाविष्यकालीन स्थितीवर स्वच्छ प्रकाश पाडला आहे. हें येवढें कार्य ज्या एका गोष्टीनें इतक्या अल्प अवधींत घडवून आणिलें त्या गोष्टीचें खरें महत्त्व हिंदीप्रजा ओळखते व अशा प्रसंगीं कडकडीत राजनिष्ठा, व तिला साजेलसें वर्तन ठेवण्याची तिची तयारी आहे हें राज्यकर्त्यांना कळविणें व अशा राष्ट्रीय संकटाच्या प्रसंगीं आपला पूर्ण पाठिंबा देऊन ब्रिटिश राज्याच्या सिंहासनाचा पाया मजबूत करणें हें हिंदी प्रजेचें अवश्य कर्तव्य आहे, ह्मणून ता. ४ आगष्ट हा दिवस गंभीर रीतीनें पाळून त्या दिवशीं राजनिष्ठेच्या शपथा धार्मिक पद्धतीनें घेऊन त्या पाळण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें द्यावें ह्मणून जगदीशाची प्रार्थना करावी अशी आमची सूचना आहे. मनोगत भावनेला बाह्य दृश्य प्रकारानें दृढता येत असते असा नियम आहे. तोच नियम आमच्या राजनिष्ठेच्या भावनेला लावून आह्मी तिला दृढ केलें पाहिजे. यासाठीं युद्धारंभाचा स्मारकदिन ह्मणून ता. ४ आगष्ट हा दिवस साऱ्या हिंदुस्थानभर गंभीर रीतीनें पाळला जाईल अशी आह्मी आशा करतों.

## अमेरिकेचा खलिता.

जर्मनीनें अमेरिकेची वारंवार केलेली आगळीक मुकाट्यानें सहन करून नुसता शद्बच्छळ ऐकून घेण्यांत प्रे. विल्सन हे निवळ अजागळपणा दाखवीत आहेत अशा प्रकारची सर्वत्र टीका झाल्यानंतर तरी जर्मनीला हडसून खडसून सणसणीत खलिता लिहिण्याची व झालेल्या नुकसानीची भरपाई व पुढें अशी चूक न होऊं देण्याविषयींची ग्यारंटी मागण्याचें अवसान प्रेसिडेंट वेल्सन यांच्या अंगीं आलें या बद्दल त्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे. हा आमचा शेवटचा मित्रत्त्वाचा खलिता आहे. याचा अनादर झाल्यास मित्रत्त्वाचा संबंध तुटेल अशी धमकावणी ही सदर खलित्यांत आहे. तेव्हां आतां जर्मनीला लटपटपंची करतां यावयाची नाहीं हें उघड आहे. आतां अमेरिकेच्या मागण्या मुकाट्यानें कबूल तरी कराव्या, नाहीं तर लढाईला तयार व्हावें, या शिवाय अन्य मार्ग उरला नाहीं.

## रम्य दर्शन.

गेल्या १८ वे तारखेला संध्याकाळचा देखावा फार मनोहर व रमणीय होता. पश्चिम क्षितीजाच्या मध्यभागीं मेघ गर्द होते. विखरलेले होते आणि त्यांच्या जलमय श्याम मूर्ती संधिप्रकाशानें इतक्या चित्रविचित्र अनंत रंगांच्या मिश्रणांनीं सुरम्य, आल्हादकारक व स्फूर्तीदायक बनल्या होत्या कीं त्या घटकेला सर्व विश्व एकीकडे आणि आकाशांतील त्या दीव्य, प्रकाशमान व उज्वलित मेघमूर्ती एकीकडे! असे मुहूर्त ह्मणजे आयुष्यांतील या नेत्रासौख्याच्या व समृद्धीच्या अमृतवेलाच होत. या वर्षाकालीं प्रभातचे व सायंकाळचे आकाशाचे देखावे सर्व सृष्टींतील सौंदर्यांनीं व रगांनीं एकवटलेले असतात. इतर ऋतूंमध्यें असे सुंदर आकाशाचे फलक क्वचितच बनत असतात. आकाशाकडे डोळसपणानें पहा, शोभा पाहण्यास शिका आणि नंतर आपल्या मनःसृष्टीच्या पटावर हीं आकाशाचीं रम्य दर्शनें चितारून घ्या. चित्रकार सृष्टींतील गुलाब, मोगरा, सोनचाफा, जास्वंद, कण्हेर, कमळ इत्यादि पुष्पाची बहारी एका कलमानें आपल्या चित्रांत अशी संकलित करूं शकेल काय! रंगाऱ्यानें या रम्य आकाशांत कोट्यावधि रंगारंगाचीं मिश्रणें शिकावीं. कवींनीं व तत्ववेत्यांनीं या आकाशाची सुरम्यता व हृदयंगमता आपल्या विचारसृष्टींत व वर्तनक्रमांत उतरण्याची स्फुर्ती सर्व जगास अचूक रितीनें देण्यास विसरू नये. ईश्वर कसा नटला आहे हें पाहण्यास सांप्रतची आकाशशोभा— आणि ती मुख्यत्वेंकरून संधिकालची शोभा—मनुष्यमात्रास आपली मुर्की व्याख्यानें देत असते ह्मणून वर्षाकालाच्या निरनिराळ्या आकांक्षा मध्यें आकाश—निरीक्षण हा विषय मुद्दाम मौजेनें व हौसेनें घालण्यासाठीं ही शिफारस आहे.

## निवडक वर्तमानें

गेल्या पांच वर्षांत पोलिसखात्याचा खर्च शेंकडा १४ याप्रमाणानें वाढला आहे. हें एकंदर हिंदुस्थानचें प्रमाण झालें. प्रांतवारी ही खर्चाची वाट ४ आर्ण. आत ३ ब्रह्मदेश १७, बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३ पंजाब ११, मद्रास ४३, व मुंबई २९. या वाढीच्या मानानें पोलिसाच्या वर्तनांत व कामांत मात्र सुधारणा दिसत नाहीं.

फटके मारण्याच्या शिक्षेविषयीं हिंदुस्थानसरकार व स्टेटसेक्रेटरी यांनीं आपली नापसंती वेळोवेळी दर्शविली आहे, तरी बगाल्यांत ही शिक्षा अद्याप देण्यांत येते.

जर्मन लोकांनीं युद्धांत पकडून नेलेल्या हिंदी शिपाई व आफिसर यांच्या विषयीं ब्रिटिश सरकारला अमेरिकन वकिलातीमार्फत ही चांगलीशी माहिती मिळत नाहीं हें पाहून सदर हिंदी लोकांसंबंधानें सर्व हिंदुस्थानभर काळजी वाटत आहे. शत्रुच्या हातीं हिंदीलोक लागले किती, त्यांना कोठें ठेवण्यांत आलें आहे व कशा रीतीनें वागविण्यांत येत आहे या विषयींची माहिती सरकारनें मागवून प्रसिद्ध केल्याखेरीज ही काळजी दूर होणार नाहीं.

हल्लीं युद्धाची खरी बातमी लोकांना कळावी ह्मणून सरकारानें प्रेस ब्युरो नांवाचें खाते ठेविलें आहे. या खात्यामार्फत रोज तारा प्रसिद्ध होतात. पण अशाच तारा दैनिकपत्रांतूनही लोकांनीं वाचण्यास मिळतात. तेव्हां या खात्याचा सालिना ३२ हजार रुपयाचा खर्च प्रजेवर निष्कारण लादला जात आहे. तो बंद करून नवीन शिक्षण संस्था काढण्याकडे या रकमेचा उपयोग व्हावा असें लीडर पत्र सुचवितें.

प. वा. ना. गोखले यांच्या संबंधानें मि. लाला लजपतराय यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे, तो अत्यंत हृदयद्रावक आहे.

जर्मनी व आस्ट्रिया यांच्या आर्थिकास्थिती संबंधानें माहितगार अशा एका माणसानें पुढील माहिती प्रसिद्ध केली आहे—आस्ट्रियांत पैसा रगड आहे, पण तो चांदीचें किंवा निकलचें नाणें आणि नोटा यांच्या रूपानें आहे. सोन्याचा तोटा आहे. आस्ट्रियाच्या नोटांची किंमत सारखी उतरत आहे. मध्यें तर ती शेंकडा ४० पर्यंत गेली होती. जर्मन इंपीरियल ब्यांकेनें ८० लक्ष पौंड सोन्याच्या नाण्याच्या रूपानें आस्ट्रियाला कर्जाऊ ह्मणून दिले होते, त्यावर इतके दिवस निभावण्यांत आले. समजा, आज लढाई संपली, आणि उद्या सर्वत्र शांतता झाली, तरी जर्मनी व आस्ट्रिया या दोन्ही राष्ट्रांचें दिवाळें वाजणार हें निश्चित आहे. या युद्धांत आपला विजय होऊन दोस्तराष्ट्रापासून दंडादाखल खूप जंगी रकम आपणांस मिळेल, आणि त्यांतून लोकांचें कर्ज फेडतां येईल असें जर्मनी व आस्ट्रिया हे मनांतल्या मनांत मांडे खात आहेत!

## युद्धाच्या बातम्या.

'युद्धस्य वार्ता रम्या.' पण कोणाला? घरीं आरामखुर्चीवर जांभया देत पडून वाचणारांना. प्रत्यक्ष लढाईत शत्रूशीं त्यांतल्या त्यांत निर्दय, राक्षसी अनन्वित कृत्यें करण्यास यत्किंचित् माघार न घेणाऱ्या जर्मन सारख्या शत्रुशीं—लढणाऱ्यांना त्या खरोखर 'रम्या' आहेत कीं काय हें त्यांचें त्यांनाच विचारावें. गेल्या दोन अडीच आठवड्यांपासून पोलंडमध्यें वार्सापाशीं जें घनघोर युद्ध चाललें

आहे तें प्रस्तुतच्या काळांत अगदीं अद्वितीय गणिलें जाईल इतकें भयंकर आहे. जयापजय कोणाच्या वांट्याला येईल हें कांहींच सांगतां येत नाहीं. गेल्या आठवड्यांत एक दोनदां तर शत्रूची जीत होईल कीं काय असा रंग दिसत होता. जर्मन बादशाहानें तर वार्सा घेण्याचा पणच केला आहे. जर्मन शिपाई आपल्या बादशाहाची ही हौस पुरी करण्यासाठीं स्वतःचे असंख्य प्राण खर्ची घालीत आहेत. रशियन शिपाई ही तितक्याच दृढ निश्चयानें त्या शहराचें रक्षण करून जर्मनीचे हल्ले हटवीत आहेत. असा प्रकार आज कित्येक दिवस चालला आहे. गेल्या दोनचार दिवसांत आलेल्या तारांवरून रशियन शिपायांनाच रणश्री माळ घालील असा सुमार दिसतो. पश्चिम रणक्षेत्रांत मध्यंतरीं कांहीं दिवस युद्धाच्या उत्साहांत थोडीशी शिथीलता आलेली दिसली. तथापि ती फार वेळ टिकली नाहीं. तेथें जर्मनीचा उत्साह जरी शिथील झालेला आहे तरी वारंवार हल्ले करून ते आपलें वास्तव्य व शक्ति भासविल्यावाचून राहत नाहींत. ब्रिटिश फौजेच्या उत्साहांत मात्र बिलकुल खंड किंवा शिथील्ता नाहीं. ते जर्मनांच्या हातांतले खंदक एकामागून एक काबीज करीत चालले आहेत. गेल्या आठवड्यांत ब्रिटिश वैमानिकांनीं ही आपली शिताफी दाखवून शत्रूचें नुकसान केलें. दक्षिण आफ्रिकेंत जनरल बोथा यांनीं केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल सगळ्या ब्रिटिश साम्राज्यांतून त्यांना अभिनंदनपर पत्रें अद्याप जात आहेत. हिंदी लोकांनीं सध्याच्या युद्धांत जी राजनिष्ठापूर्वक सहकारिता दाखविली तिजवरून तिच्या सद्धेतूविषयीं खात्री होऊन हिंदी गार्डाची एक पल्टण तयार करण्याचा विचार स्टेट सेक्रेटरी करीत आहेत. सध्याच्या युद्धांत पुष्कळ ब्रिटिश पुरुष मारले गेल्यामुळें इंग्लंडमध्यें पुरुषांच्या जागीं बायकांना नेमण्याची वहिवाट बहुतेक सगळ्या कचेऱ्यांतून पडत चालली आहे. ब्रिटिश सेनापति जनरल फ्रेंच यांनीं आज वर्षभर युद्धाचें काम फार उत्तम धोरणानें चालविलें. त्यांत त्यांना फार परिश्रम झाले. ते हलके करण्याकारितां व त्यांना थोडे दिवस विश्रांति देण्यासाठीं दुसऱ्या सेनापतीची नेमणूक कांहीं दिवसांकरितां होणार आहे असें ह्मणतात. ब्रिटीश सरकारनें चालू युद्धासाठीं जी कर्जाऊ रकम जनतेपाशीं मागितली आहे तिच्यापेक्षां पुष्कळ अधिक रकम देण्यास जनता तयार आहे हें विलायतेंत व हिंदुस्थानांत कर्जरोखे घेण्यासाठीं हुंड्या घेणारांच्या संख्येवरून स्पष्ट झालें आहे. इटालियन लोकांनीं लढाईला सुरुवात केल्यापासून ते एकसारखे विजयीच होत चालले आहेत. त्यांनीं गेल्या आठवड्यांत शत्रूंच्या दोन तीन टेकड्या सर केल्या असून दोन तीन हजार आस्ट्रियन कैद केले आहेत. सारांश, युद्धाचा रंग दोस्त राष्ट्रांना सर्वथा अनुकूल असा आहे, आणि 'यतो धर्मस्ततो जयः' हें वाक्य अक्षरशः खरें ठरेल असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं.

---

## साउथ अफ्रिकन इंडियनफंड.

या फंडाचा नुकताच प्रसिद्ध झालेला सन १९१३ व १९१४ सालाचा रिपोर्ट आमचेकडे आला आहे. सन १९१३ च्या ऑक्टोबर १७ तारखेस सर करीमभाई यांचे आफिसांत दक्षिण आफ्रिकेंतील स्थितिविषयीं मुंबईच्या नागरिकांची सभा होऊन तींत नामदार गोखल्यांचें जें भाषण झालें त्या वरून पूर्वींच्या बॉम्बे साउथ आफ्रिकन कमिटिची पुनर्घटना होऊन नवीन कामिटी नेमण्यांत आली. या कमिटीचे सर्व सभासद मुंबईचे नामांकित वजनदार व धनिक सद्गृहस्थ होते. या कमिटीनें एकदम फंड गोळा करण्यास सुरवात केली व ता० १० डिसेंबर १९१३ रोजीं नामदार आगाखान यांचे अध्यक्षतेखालीं शेरीफाची सभा भरवून दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिती जनतेस समजावून सांगण्यांत आली आणि त्यांच्या मदतीसाठीं फंडाची याचना करण्यांत आली. याच सुमारास नामदार व्हाइसरॉय साहेबांनीं मद्रास येथें याच संबंधांत सहानुभूतिपर जोराचें भाषण केलें. याच्या परिणामीं अर्थातच चोहोंकडून वर्गण्यांची उदार वृष्टी होऊन एका बॉम्बेकमिटीच्या हातून ४,४९,७९९ इतके रुपये गेले. रकमा वेळोवेळीं नामदार गोखले यांच्या सांगीप्रमाणें त्यांच्याशीं पत्रव्यवहार करीत असलेले देशभक्त गांधी व दक्षिण आफ्रिकेंतील इतर पुढारी यांजकडे पाठविण्यांत येत असत. देशभक्त गांधी यांजकडे गेलेल्या रकमांचा हिशेब लवकरच प्रसिद्ध होणार असल्याचें कळतें. हिंदुस्थानांतून गेलेल्या रकमांपैकीं दक्षिण आफ्रिकेंत बरीच शिल्लक असावी असा या कमिटीचा अजमास आहे. वर्गणीदारांची साग्र यादी नांवानिशीसह रिपोर्टाचे शेवटीं दिली आहे.

ता० ३ नोव्हेंबर १९१४ रोजीं सर करीमभाई इब्राहिम यांच्या ऑफिसांत त्यांचेच अध्यक्षतेखालीं वर्गणीदारांची सभा होऊन फंडाचा अहवाल पास करण्यांत आला. शिल्लक रु. १,४७,८६७ या रकमेचा विनियोग योग्य खर्च वजा जातां हिंदी लोकांना इतर ब्रिटिश वसाहतींच्या समान हक्क मिळविण्याचे कामीं खर्च करण्याचा ठराव झाला, फंडाचे पंच नेमण्यांत आले व रा. रा. रतन टाटा, अध्यक्ष ना० सर फेरोजशहा मेहता, उपाध्यक्ष वगैरे प्रमुख प्रमुख, धनिक आणि वजनदार मंडळीची "साउथ ऑफ्रिकन इंडियन फंडा"ची कामिटी नेमण्यांत येऊन तिजला काम करण्यास योग्य ते अधिकार देण्यांत आले. रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्या तारखेस कमिटीच्या हातीं रु. १४८७४४—७—१० इतकी रक्कम शिल्लक होती. ती सर जमशेटजी जिजीभाई, रा. रा. एच. ए. वाडिया आदिकरून पंचांच्या स्वाधीन करण्यांत आली.

शेवटीं या कामांत ज्यांनीं केवळ स्वतःच्या चिकाटीनें व बळानें—अशीं दुसऱ्याच्या अंगीं क्वचितच असतील— सर्व देशभर जोराची व स्तुत्य चळवळ चालविली, इतकेंच नव्हे परंतु स्वतःच्या बऱ्याचशा खर्चानें, प्रकृति नुसती अस्वस्थच काय पण नाजुक झालेली असतां आणि त्यामुळें जीवास धोका असतां ही दक्षिण आफ्रिकेंत जाऊन हल्लींची तडजोड होण्यास मदत केली आणि आपल्या स्वतःच्या वजनानें त्या झगड्याचा शेवट समाधानकारक घडवून आणिला त्या महात्म्या कै० नामदार गोखल्यांच्या अमूल्य कामगिरीबद्दल कमिटीच्या मनांत वसत असलेली पूज्यबुद्धी मोठ्या गोड व जोरदार भाषेंत व्यक्त केली आहे. हा पॅरिग्राफ अस्सल वाचण्या सारखा आहे. तो वाचून कै० नामदार गोखले यांच्याबद्दल अंतःकरण गहिंवरल्यावाचून रहात नाहीं.

अगदीं आरंभापासून मुख्य तीन फंड व त्या शिवाय किरकोळ ठिकठिकाणच्या देणग्या मिळून जवळ जवळ साडेसात लाख रुपये दक्षिण ॲफ्रिकेंत गेले असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. यांत खुद्द दक्षिण ॲफ्रिकेंतील हिंदी लोकांचा बराच पैसा हा झगडा चालविण्यांत खर्च झाला व डुबला तोही मिळविला पाहिजे. या शिवाय कुटुंबेंची कुटुंबें उध्वस्त झालीं, धंदे बुडाले, खाजगत इस्टेटीची राख रांगोळी झाली आणि हिंदीलोकांचा व्यापार धंदा सरसगट बसला हें नुकसान धरतां येत नाहीं. या सर्व नुकसानींचा आंकडा काढणें अशक्य आहे परंतु तो परिणामीं जितका गहजब उडविणारा तितकाच जबर असला पाहिजे यांत शंका नाहीं !

या फंडाबद्दल आतां निराळी शिफारस करण्याचें प्रयोजन उरलें नाहीं कारण त्याचें महत्व देशाच्या पूर्व पश्चिम व दक्षिणउत्तर या सर्व टोंकापर्यंत आबाल वृध्दांना पटलेलें आहे. फंडाशीं प्रत्यक्ष संबंध असलेले सर्व सद्गृहस्थ थोर थोर, नामांकित व धनवान असे असल्यानें त्याच्या सुव्यवस्थेबद्दलही शंका घेण्याचें कारण नाहीं. या कामगिरीचें महत्व जाणून देशबांधवांच्या दुर्दशेनें अंतःकरण कळवळून उदार बुद्धीनें ज्यांनीं ज्यांनीं फंडास वेळोवेळीं व ठिकठिकाणाहून मदत केली ते धन्य होत. त्यांच्या हातून सत्पात्रीं घडलेला हा धर्म ईश्वरापाशीं रुजू झालाच पाहिजे असें कोण ह्मणणार नाहीं!

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—गेल्याच्या मागील मंगळवारीं पुष्याच्या पावसाला सुरुवात झाली तेव्हांपासून बहुतेक रोज पाऊस पडत जाऊन या सप्तकाच्या अखेरीस दोनतीन दिवस सारखी झड लागली. शनिवारपासून उघाडीस थोडा आरंभ होऊन कालच्या रविवारपासून तर आकाश स्वच्छ होऊन चांगलें ऊन पडलें. एकसारखा पाऊस पडत गेल्यामुळें कृषिकर्मास अर्थातच बराच अडथळा होत होता. तो आतां दूर झाल्यामुळें कृषिकर्म निर्वेध चालण्यास हरकत नाहीं. एकंदर पाऊस अजमासे १९।१६ इंच झाला. रोगराई विशेष नाहीं.

आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं रा. रा. नारायण रामचंद्र भट, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, बुलडाणा, यांस अलीकडे कांहीं दिवस कामावरून तहकूब करण्यांत आले होते व त्यांच्या कांहीं पूर्ववृत्तांतासंबंधीं चौकशी चालू होती. चौकशी अंती अशा वर्तनाचा चाकर सरकारला आपल्या पदरीं नको असल्याबद्दल ठराव करण्यांत आला. मनुष्य अधिकारच्युत होतो तेव्हां त्या पतनासंबंधानें लोक स्वाभाविकपणें चिकित्सा करितात, ती तृप्त करण्यास आमच्या जवळ साधनें नाहींत आणि त्यापासून तादृश फायदाही नसतो.

रा. रा. जयनारायण, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, आकोला, यांस डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रारचे अधिकार देण्यांत आले आहेत.

चुकीची दुरुस्तीः— आजच्या अंकाच्या पान दोनवरील नोटीस नं. ३१४ मध्यें पहिल्या ओळींत बळीराम जानकीराम वाडी, याबद्दल 'माळीराम जानकीराम मारवाडी' असें वाचावें.

---

## पत्रव्यवहार

### रेल्वे कंपनी लक्ष देईल काय ?

आकोल्यास जिल्हा कचेरी व दिवाणीची व फौजदारी कामाची मुख्य जागा असल्यामुळें बाळापूर आणि बोरगांव, काटेपुर्णा मुर्तिजापूर, माना, कुरुम, कारंजा या ठिकाणचे लोकांना कचेरींत यावें लागतें. आकोल्याहून परत जाण्याकरितां रात्रीं १२ वाजेपर्यंत गाडी नाहीं. त्यामुळें सकाळीं गाडीनें येणाऱ्या पक्षकारांस रात्रीं १२ वाजेपर्यंत कुचंबुन बसावेंच लागतें. व घरीं पोचण्यास दुसरा दिवस लागतो. पूर्वीं शेगांव पासून बडनेरापर्यंत सायंकाळी "Road Van" जात असे. तसें प्रकारचें पुन्हा सुरू झाल्यास सर्व पक्षकारांचा कंपनी दुवा घेईल. तें बंद करण्यांत फायदा नसून उलट कंपनीचा तोटाच आहे.

मुर्तीजापुरास जंक्शन झाल्यामुळें स्टेशनचा विस्तार फारच वाढला आहे. व अधीकही वाढण्याचा संभव आहे. रेल्वे कंपनीस अर्थातच फायदाही त्याप्रमाणें वाढलाच आहे. ही सर्व गोष्ट ठीक आहे. परंतु उतारूंच्या सोयीचे नांवानें आवळ्या येवढेंच पुज्य दिवसा कसें बसें निभते परंतु दुपारच्या पासेंजरांचे व सायंकाळच्या छोट्या लाईनच्या पासेंजरचे हाल त्यांनाच विचारावेत. रात्रीं बसण्यास जागा नाहीं. अगर कोठेंही स्वतःची दुसरी सोय नाहीं. भुसावळ प्रमाणें एखादी वेटिंगरूम या ठिकाणीं जरूर जरूर पाहिजे आहे. कंपनी अगर दुसरे कोणी संभावीत गृहस्थ ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन उतारूंचे हाल दूर करितील, काय?

"प्रवाशी"

---

## पत्रव्यवहार.

### नागपर विश्वविद्यालय आणि उमरावती कॉलेज.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपण आपल्या पत्रांत जागा द्याल अशी आशा आहेः—

नागपूर प्रांताला यंदा युनिव्हरसिटी मिळणार असा सरकारी ठराव प्रसिद्ध झाला आहे. त्याच वेळीं वऱ्हाड प्रांताला उमरावती येथें कॉलेज देण्याची योजना होणार आहे अशी वार्ता आहे. येथपर्यंत ठीक झालें. नागपूर प्रांताला कौन्सिल मिळाल्यामुळें ही इतर बाजुंनी वाढ होत चालली आहे.

या पुढील मजकूर पुरवणीवर पहा.

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

पेज चार वरून पुढें चालूं.

यांच वेळीं आह्मी एक सूचना सरकारपुढें व इतर वांचकांच्यापुढें मांडतो ती ही कीं, उंमरावतीस जागा पसंत करून कॉलेज स्थापन करणार ही गोष्ट खरी आहे. उमरावती हे वऱ्हाडप्रांताचें केंद्रस्थान आहे ह्मणूनच या ठिकाणीं कॉलेज इमारत बांधणार ही प्राधान्य गोष्ट आहे. परंतु आमच्यामतें उमरावती येथें कॉलेज न बांधतां इलिचपूर येथें बांधलें जाईल तर फारच सोयकर होईल तेः—

(१) एकतर उमरावतीपेक्षां इलिचपूरची हवा थोडी थंड आहे. ह्मणून तर सरकारांनीं लष्करी ठाणें ठेविलें होतें व हवा स्वच्छ आहेच. सडका रस्ते सर्व तयार आहेत.

(२) उमरावतीपेक्षां इलिचपुरीं पाणी जवळ आहे. उमरावतीचें नळाचें पाणी व इलिचपूरच्या विहिरीचें पाणी याची तुलना केली तर उमरावतीपेक्षां इलिचपूर हें जास्त चांगलें.

(३) उन्हाळ्यांत सरदार लोक मार्च पासून चिखलदऱ्यांस जातात. तेव्हां कॉलेज पाहण्यास सोयवार होण्यासारखें आहे. रेलवेचा फाटा आहेच.

(४) उमरावतीपेक्षां इलिचपूरच्या सातपुड्याचा देखावा, सृष्टिसौंदर्य व निरामय असा शांत भाग जास्त आहे.

(५) बोटॅनिकल गार्डन वगैरेच्या दृष्टीनें इलिचपूर जास्त चांगलें आहे. बगीच्यास विहिरीचें पाणी जवळ आहे.

(६) कॉलेजांतील शिक्षक वर्गास थंड हवेचा लाभ सुलभरित्या होईल.

(७) विद्यार्थी वर्गास उघड्या, स्वच्छ, हवेंत खेळण्यास मैदान चांगलें तयार आहे. लष्करी लोकांसाठीं कवाईतीची जागा उत्तम आहे.

(८) ज्यासाठीं शहर सोडून कांहीं अंतरावर मुद्दाम कॉलेज इमारती बांधण्याची योजना चालू आहे, शहरच्या लोकांचा संपर्क नको, ह्मणजे मुलें राजकीय चळवळींत पडणार नाहींत, या सर्व दृष्टीनें विचार केला तर उमरावतीपेक्षां इलिचपूर फार चांगलें आहे. हें चौकशी अंती कळून येईल.

(९) इलिचपूर येथें हल्लीं हायस्कूल सूरूं झाले आहेच.

वार्षिक मॅट्रिक परिक्षा उमरावती येथें होते ती इलिचपूरास कॉलेज सुरूं झाल्यावर घेतली जावी. कारण कॉलेजांतील शिक्षक वर्गाचा उपयोग होईल. शिवाय परीक्षा उन्हाळ्यांत होते तेव्हां मंडप देऊन त्यांत सर्वांची परीक्षा घेत गेल्यास कांहीं वाईट होणार नाहीं. व विशेष खर्चही येणार नाहीं.

या सर्व दृष्टींनीं विचार करून आह्मी आपली सुचना पुढें ठेविली आहे. इमारत सुरूं होण्यापूर्वी आह्मी ही सुचना केली आहे. या सुचनेचा विचार सरकार, युनिव्हार्सिटिच्या नियमासाठीं नेमिलेली कमिटी व इतर विद्वान नेते याजबद्दल पूर्ण विचार करतील अशी पूर्ण उमेद आहे. याशिवाय तेथें ह्मणजे इलिचपुरीं धंदेशिक्षण देण्यासाठीं सावकाश रीतीनें शास्त्रीय पद्धतीची शाळा सरकारांनीं काढल्यास चांगला फायदा होईल. चामड्याचा कारखाना, लाखेचा कारखाना, हिरडा, बेहडा, आवळकटी वगेरे फुल, फळ व सालीचा रंग करण्याचा कारखाना, गवतापासून, वेळूपासून कागद तयार करण्याचा कारखाना, कुंभारी काम, लांकडीकाम, ल्हानप्रमाणावर सुरी, चाकुच्या मुठाकरणें, होल्डर्स ( टांकाचें दांडे ) करणें, वगैरे वगैरे धंदेशाळा काढण्या सारखी जागा आहे. या सर्व गोष्टींचा विचार व्हावा ह्मणून साम्र गोष्टी तपशीलवर वाचकांच्या पुढें ठेविल्या आहेत.

येत्या नवंबर महिन्यांत युनिव्हर्सिटीबद्दल नागपूर येथें सभा भरून अलिशान चिफ कमिशनर साहेब बहादूर हे स्वतः या समेस हजर राहणार आहेत. अशी वदंता आहे. ह्मणून ही सूचना आगाऊ लोकांपुढें व सरकारपुढें मांडली आहे. याजबद्दल विचार होईल अशी आशा आहे. कळावें. तारीख २९-७-१९

आपला.

क्ष.

## नोटीस

### मुद्दे ठरविण्याचें समन्स.

(कानू १ व ५, आर्डर ५, एक्ट ५ सन १९०८ ई०)

दिवाणी मुकदमा नं. २४ सन १९१५ ई. विद्यमान मुनसफ साहेब नंबर १ यांचे कोर्ट

मुक्काम आकोला

वादी

रामगोपाळ दानमल मारवाडी रा. अकोला

प्रतिवादी

मार्तंड व्यंकटी सोनार रा. आकोला

दावा

नांव मार्तंड

वल्द व्यंकटी

जात सोनार रा० आकोला

तहसिली आकोला जि. आकोला

ज्यापेक्षां वादी यानें तुह्मावर मुद्दे बद्दल दावा केला आहे; त्या पेक्षां सदरहु दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख २९ माहे ८ सन १९१५ ई० रोजीं दिवसा १० वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्या संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा आसामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर होण्या विषयीं या लेखावरून तुह्मास समन्स करण्यास येत आहे; व ज्या वरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तें सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्या विषयीं तुह्मास फर्माविण्यांत येत आहे.

तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज ता. ३१-७-१९१५ ई० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्या निशीं दिले.

शिक्का. Sd/ M. C. Shukla.
मुनसफ नं. १
आकोला.

नो. नं ३१६

---




सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

**ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.**

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! **ओटो मुरंगी** ! एकच भाव!!

**आमचेकडे मिळणारा माल**

**ओटो मुरंगी**

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगबराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळताल दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आयुर्वर्धक कार्डस, बिझिक, इसापिके, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्टें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | ,356 | 8.88,02,223 |
| 1914 | ,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,043 | 4,96,86,509 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a record for the company. The next Division of profits will be madea s at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

***M. deSOUZA,***
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25


ही पुरवणी आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केली.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ९ माहे आगष्ट सन १९१५ ई० [ अंक ३१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

## अस्सल अंगरी.

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### नोटीस

#### मुद्दे ठरविण्याचें समन्स.

(कानू १ व ५, आर्डर ५, एक्ट ५ सन १९०८ ई०)

दिवाणी मुकदमा नं. २४ सन १९१५ ई.
विद्यमान मुनसफ साहेब नंबर १ यांचे कोर्ट

मुक्काम आकोला

वादी

रामगोपाळ दानमल मारवाडी रा. अकोला

प्रतिवादी

मार्तंड व्यंकटी सोनार रा. आकोला

दावा

नांव मार्तंड

वल्द व्यंकटी

जात सोनार रा० आकोला

तहसिली आकोला जि. आकोला

ज्यापेक्षां वादी यानें तुह्मावर मुद्दे बद्दल दावा केला आहे; त्या पेक्षां सदहु दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख १४ माहे ८ सन १९१५ ई० रोजीं दिवसा १० वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व त्याच्या संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा आसामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर होण्या विषयीं या लेखावरून तुह्मास समन्स करण्यास येत आहे; व ज्यावरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तें सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्या विषयीं तुह्मास फर्माविण्यांत येत आहे.

तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज ता. ३१-७-१९१५ ई० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्या निशीं दिले.

शिक्का. Sd/ M. C. Shukla.
मुनसफ नं. १

नो. नं ३१६ आकोला.

## NOTICE

*Grass.* Grass. Grass.

Season cut fodder grass of the best quality delivered on the rails at Rs. 24 -per ton.

Grass baling operations on a limited scale will be started at Warora Station on the G. I. P, Railway, soon after the monsoons, and in order to avoid disappointment, all intending purchasers are requested to send in their indents to the undersigned before the 31st August 1915.

Sd/ W. J. Anthony.
Divisional Forest Officer,
N. N. 312 North Chanda Division

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### सचित्र कोकशास्त्र.

रसिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ कालपर्यंत आहों व जो अतिशय परिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरुषांचीं जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरुषांच्या अनेक रोगांची औषधी चिकित्सा व त्यांचें निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचें एक भांडारच आहे. किंमत रू.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बालबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा, अलीगढ.

नो. नं २७०

### नोटीस

नोटिस बेशमी चतरु व रामुलाल वा॥ जिगुलाल मारवाडी रा० आकोला माळीपुरा

यांसः—

खालील सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी तुमच्या माडीच्या वळचणीचें पाणी आमचें घर नंबर ३६ च्या जिन्यावर पडून लाविलें आहे. त्यामुळें आमच्या इमारतीची नुकसानी होऊन त्या ओलानें मनुष्य आजारी पडण्याचा संभव आहे. ह्या सर्वत्र कारणामुळें मी ह्या नोटिशीनें आपण इकडील वळचण दुसरीकडे घालावी. व घालण्याची सोय ही आहे. तसें केल्यास ठीक होईल. नाहींतर केलेली इमारत विद्यमान डे. क. सा. यांचे कडून अर्जद्वारा पाडवून घ्यावी. लागून तुह्मास नुकसान सोसावें लागेल याचा विचार करावा हे या नोटीशीनें कळवित आहे. याचा विचार करून जबाब द्यावा. सही

किसन सोनाजी दं. हनवती चहादाजी पा. रा. आकोला माळीपुरा

नो० नं० ३१९

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १४ शके १८३७

## स्वदेशी आणि परदेशी औषधें.

थोड्या दिवसांपूर्वी पुण्यास तेथील म्युनिसिपालिटीचा स्वदेशी औषधांचा दवाखाना बंद ठेवणें भाग न पडेल अशा रीतीनें मेडिकल रेजिस्ट्रेशन कायद्यामध्यें फेरफार करण्यासंबंधानें सरकारास विनंति करण्यासाठीं एक जाहिरसभा भरली होती. या सभेला पुण्याच्या मवाळ व जहाल अशा दोन्ही पक्षांचे पुढारी आले होते व दोन्ही पक्षांचें या बाबतींत एकमत होतें. रा. हरीभाऊ आपटे हे अध्यक्ष व रा. टिळक हे वक्ते असा विचित्र योग आश्चर्यकारकच होता. तथापि त्याच्या विचित्रतेशीं आज आपणास कर्तव्य नाहीं. या गोष्टीच्या मुळाशीं जें एक मोठें तत्त्व होतें तें विचारणीय होतें. तें तत्त्व हें कीं सरकार नवे नवे कायदे करून आमच्या सर्वोत्कृष्ट अशा आयुर्वेद वैद्यकपद्धतीची पीछेहाट करीत आहे ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे ही भावना मवाळ व जहाल या दोन्ही पक्षांच्या मनांत पूर्णपणें जागृत आहे. आयुर्वेदपद्धति ही सर्व प्रकारें आमच्या देशाला सोयीची आहे. या पद्धतीची काथ्यामेध्याचीं औषधें सगळीं या देशांत होणारीं, ताजीं मिळण्यासारखीं, गुणांत परदेशी औषधांच्या बरोबरीचीं किंबहुना सरस, आणि अत्यंत स्वस्त असतात या गोष्टी बद्दल वाद नाहीं, असें असतां देशी औषधांच्या प्रचाराला विरुद्ध जाणारे कोणत्या आधारावर मेडिकल रेजिस्ट्रेशन कायद्यासारख्या हत्याराचा आधार घेऊन आयुर्वेदपद्धतीचा नायनाट करण्यास सिद्ध होतात तें सांगणें कठीण आहे. देशी औषधांबद्दल एक आक्षेप असा आहे कीं या औषधांचा उपयोग करण्यास सांगणारे पढिक व अनुभवी वैद्य थोडे असतात. अशिक्षित बायाबापड्या व अंधपरंपरेनें चालणारे लोकच बहुधा ज्यास्त असतात. औषधें घेणारांना तर औषधांची पारख नसतेच, पण औषधें देणारांना ही ती नसते. या आक्षेपांत कांहीं सत्याचा भाग आहे ही गोष्ट कोणी ही सत्याग्रही मनुष्य कबूल करील. आयुर्वेदाची अवनति यामुळेंच झाली आहे व होत आहे हें सर्वांना दिसत आहे. पण त्याला खरा उपाय ह्मणजे लोकांना खरीं अस्सल शुद्ध औषधी वनस्पति मिळतील असा औषधीडेपो सरकारनें किंवा जाग जागच्या पुढाऱ्यांनीं काढावा हा आहे. शरीराला रोग झाला ह्मणजे तो रोग दूर करावयाचा कीं शरीराचाच त्याग करावयाचा? तसें, शुद्ध देशी औषधें मिळत नाहींत ह्मणून आयुर्वेदपद्धतिच बंद करावयाची, व आज हजारों वर्षें लोकांना मानवलेली व त्यांच्या गरीबीच्या स्थितींत त्यांना अत्यंत सोयीचीं ह्मणून ठरलेली वैद्यकपद्धति काढून लोकांना आरोग्यासाठीं सुद्धां परकीयांच्या तोंडाकडे पाहण्यास लावावयाचें हा शहाणपणा कुठला? दुसरी गोष्ट अशी आहे कीं खरीं औषधें मिळत नाहींत. तीं विकणारे लोक लबाड्या करून लोकांकडून पैसा काढतात आणि भलतीं सलतीं कांहीं तरी औषधें पुड्यांतून बांधून देतात, त्यांची परीक्षा विकणारांना व तीं घेणारांना दोघांनाही नसते असा जो आक्षेप आहे, त्या आक्षेपांतून कोण सुटले आहेत ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. इंग्रजी औषध वापरा ह्मणून सांगणारे आमचे डाक्तर लोक तरी परदेशी औषधांची कृति कितपत जाणतात? त्यांना तरी औषधांची परीक्षा कितीशी असते? परदेशांतून येणारी औषधें ही ताजीं व शुद्ध असतात काय? या बाबतींत आह्मी स्वतःचें मत न देतां पाश्चात्य वैद्यकपद्धतीची तारीफ करून तिची बाजू नेहमी उचलून धरणाऱ्या कलकत्त्याच्या 'स्टेट्समन' पत्राचीच साक्ष देतों. सन १९११ सालीं जेव्हां मेडिकल रजिस्ट्रेशनचा कायदा करण्याविषयींची चर्चा नुकतीच सुरू झाली होती तेव्हां या विषयासंबंधानें लिहितांना या पत्रानें परदेशी औषधांसंबंधानें जें ह्मटलें होतें तें विचार करण्यासारखें आहे. तेव्हां या पत्रानें ह्मटलें होतें कीं हिंदुस्थानांत येणारीं औषधें बहुधा नकली किंवा भेसळीचीं अतएव हीन गुणाचीं असतात. मि. नॉर्मन् हर्स्ट नावाच्या एका शास्त्रज्ञाचें असें ह्मणणें आहे कीं हिंदुस्थानांत येणारीं परदेशी औषधें अगदीं हलक्या प्रतीचीं असतात. पावर रामबाण ह्मणून ठरलेलें क्विनीन सल्फेट याचा हिंदुस्थानांत प्रचार पुष्कळ आहे पण इकडे मिळणारें क्विनीन खरें क्विनीन नसतें. सिंकोना झाडाच्या साली पासून निघणारे सिंकोनाइन किंवा सिंकोनिडाइन यांसारखे पदार्थ त्यांत मिसळलेले असतात. सार्सापरिला या नांवानें जें औषध हिंदुस्थानांत विकतें तो ग्लुकोसचा पाक असतो. मि. हर्स्ट असें ह्मणतात कीं हिंदुस्थानांत औषधें मोठ्या प्रमाणावर मागविणाऱ्या रेलवेकंपन्या, चहाचे मळेवाले वगैरे संस्था औषधें पुरविणारांकडून टेंडरें मागवितात, व सर्वांत कमी असेल तें टेंडर पसंत करतात. त्यामुळें सर्वांत स्वस्त अर्थात हीन प्रतीचा माल हिंदुस्थानांत येतो. कलकत्त्याच्या एका कंपनीनें स्टेट्स्मन् पत्रांत असें लिहिलेलें आह्मांस स्मरतें कीं जसा माल ब्रिटिश व्यापारी हिंदुस्थानाला पुरवितात तसा तो ते विलायतेस विकतील तर ते फौजदारी गुन्हेगार ह्मणून शिक्षेस पात्र होतील. पण हिंदुस्थानांत मात्र हा प्रकार राजरोसपणें खपतो! सांटोनाइन मध्यें बोरिक आसिडची पूड मिसळलेली आढळते. सांटोनाईनचा भाव शेरास ६८ रुपये आहे तर बोरिक आसिड १० आणे शेर मिळतें. मग असें मिश्र सांटोनाईन हिंदुस्थानांत विलायतेंतल्या पेक्षां ही हलक्या भावानें विकलें जातें यांत कोणतें आश्चर्य आहे! त्याप्रमाणें आयोडोफार्म नांवाच्या औषधांत गंधक व बोरिक आसिड यांची पूड मिळविलेली असते. कलकत्त्यांत बाथगेट नांवाची एक मोठी औषधी विकणारी कंपनी आहे. तिनें ही अशा कित्येक गोष्टी उघडकीला आणिल्या आहेत. खुद्द इंग्रज व्यापाऱ्यांनीं व स्टेट्स्मन् सारख्या इंग्रजी पत्रांत अशा प्रकारचीं विधानें करून परदेशी औषधांच्या शुद्धत्वासंबंधानें आक्षेप घेतल्यावर देशी औषधांना नांवें ठेवणारे कोणत्या नाकानें काढे सोलण्यास तयार होतील तें पाहिलें पाहिजे. परदेशी औषधें कशीही असलीं तरी त्यांच्या शुद्धत्वाबद्दल आमचे डाक्तर लोक कधीं शंका काढावयाचे नाहींत! ते फक्त बाटलीवरचें झकपक लेबल पाहतील आणि आंत अमृत भरलें आहे कीं घोड्याचें मूत्र आहे याचा विचार न करतां रोग्यांना पाजतील. पण हेच डाक्तर जेव्हां आयुर्वेदी औषधांच्या शुद्धत्वाबद्दल शंका घेतात, तेव्हां मात्र यांची जिभली चुरुचुरु चालते. याचें कारण परदेशी औषधांसंबंधाची त्यांची अंधश्रद्धा या शिवाय दुसरें काय ह्मणावयाचें?

## युद्ध आणि शास्त्रज्ञान.

सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ व फोनाग्राफादी अनेक शोधांचें मूळ कारण मि. एडिसन यांची एका शास्त्रज्ञानें घेतलेली मुलाखत न्यू हेरल्ड नांवाच्या पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. ती जशी मनोरंजक तशीच बोधप्रद असल्यामुळें तिचा सारांश येथें देत आहों. प्रस्तुतच्या युद्धासंबंधानें बोलतांना मि. एडिसन ह्मणाले कीं तोफाबंदुकांपेक्षां ही अधिक प्राणघातक अशी शक्ति भौतिक शास्त्राचे ठायीं आहे. विषारी वायूपेक्षांही अधिक भयंकर अशी युक्ति शास्त्रज्ञानाच्या जोरावर मला सांगतां येईल. पण मी ती सांगत नाहीं. कारण कीं मनुष्यांची हत्या व्हावी ही माझी इच्छा नाहीं. पूर्वी लोक दगड किंवा लोखंडी पांच्या शस्त्रानें लढत. पुढें बंदुका व तोफा आल्या. नंतर कुलुपी गोळे व विषारी अस्त्रें निर्माण झालीं. या युद्धांत विषारी वायु रणक्षेत्रांत अवतरला. भविष्यकाळीं रासायनिक व विद्युत् शक्तीच्या योगानें अद्भुत कार्यें घडून येतील मि. एडिसन ह्मणाले कीं युरोपखंडांत अद्याप थोडी तरी माणुसकी राहिली आहे. पण दिवसें दिवस तिकडे जंगलीपणा वाढत चालला आहे. टार्पेडोपासून बोटीचा बचाव होईल असें साधन करतां येईल काय? या प्रश्नावर मि. एडिसन ह्मणाले कीं असें साधन आहे आणि हळूं हळूं टार्पेडोमुळें नाश न पावतील अशा बोटी बांधणें भाग पडेल. यानंतर मुलाखत घेणारानें मि. एडिसन यांना एक अत्यंत मर्मभेदक प्रश्न केला कीं 'आपण ह्मणतां कीं हल्लींच्या शस्त्रास्त्रांपेक्षां ही भयंकर अशी नाशाची युक्ति मला माहीत आहे, पण मनुष्य जातीचा वध मला पसंत नाहीं ह्मणून मी ती सांगत नाहीं. पण समजा, उद्यां कोणी एखादें राष्ट्र अमेरिकेवर चालून आलें तर तुह्मी ती युक्ति प्रत्यक्ष अंमलांत आणाल कीं नाहीं? हा मर्मभेदक प्रश्न ऐकतांच मि. एडिसन यांचे डोळे संतापानें लाल झाले, आणि ते ह्मणाले—'अलबत्! अशा प्रसंगीं मी ती युक्ति करून दाखवीन. अमेरिकेला तशा युक्तीची जरूर पडेल तेव्हांच ती मी करीन. पण प्रस्तुतच्या युद्धांत अमेरिकेला पडण्याचें कारण पडण्याचा संभव दिसत नाहीं. भ्रातृहत्येच्या पापकलंकापासून वाचला आहे असा हा आमचा एकच देश साऱ्या जगांत आहे. पण समजा, जर्मनीशीं युद्ध करण्याचा उद्यां प्रसंग पडला, तर शिपायांकडून युद्ध न करवितां आह्मी शास्त्रीय उपायांनीं शत्रूंचा नाश करूं.' यांतल्या मि. एडिसनच्या उद्गारांवरून त्यांची देशभक्ति किती जाज्वल्य आहे तें दिसून येतें.

## देशी धंद्यांच्या शाळा.

हिंदुस्थानाला सध्यां विशेष निकडीची एखादी गोष्ट असेल तर ती उद्योगधंद्यांच्या शाळा उघडणें ही आहे. ही गोष्ट आज बऱ्याच वर्षांपासून सरकारच्या व लोकांच्या ध्यानांत आली आहे. सध्याच्या युद्धानें तर ती निकड अधिक भासमान होऊं लागली आहे. रंगविण्याच्या द्रव्यासंबंधानें सध्या इतकी टंचाई पडली आहे कीं रंगाऱ्यांचा धंदा त्यामुळें बहुतेक बसल्यासारखा झाला आहे व रंगीत कपडा इकडे मिळणें जवळ जवळ अशक्य झालें आहे. ही निकराची स्थिति पाहून हिंदुस्थानसरकारनें लखनौ येथें रंगशाळा स्थापन करण्याची योजना तयार केली आहे. सरकारच्या या स्तुत्य उपक्रमाचें अनुकरण देशी संस्थानिकांपैकीं ग्वालेरचे महाराज श्री. शिंदे सरकार हे करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. माळवा हा प्रांत जुन्या काळांत रंगकामासाठीं विशेष प्रसिद्ध होता वीस वर्षांपूर्वी पर्यंत माळव्यांतले रंग साऱ्या हिंदुस्थानांतल्या लोकांना चकित करून सोडीत होते. मन्दोसर, भेरवगड, साजापूर, महेश्वर वगैरे ठिकाणचीं लुगडीं व छिटें त्यांच्या रंगामुळें अत्यंत प्रिय झालीं होतीं. पण जर्मन एलाजरीन रंग स्वस्त मिळूं लागल्यापासून वरील ठिकाणचे रंगाचे धंदे साफ बसले. ही स्थिति सुधारण्यास हल्लींचा काळ अनुकूल आहे असें पाहून श्री. शिंदे सरकारांनीं उज्जनी येथें एक रंगविद्यालय दोन वर्षांपूर्वीच स्थापन केलें. पण दुःखाची गोष्ट ही आहे कीं त्या शाळेचा फायदा रंगारीलोक फारसा करून घेत नाहींत. हा शाळेंतल्या शिक्षणपद्धतीचा दोष आहे कीं लोकांच्या अज्ञानाचा परिणाम आहे हें आह्मांस ठाऊक नाहीं. उज्जनीच्या रंगविद्यालयाचा शिक्षणक्रम तीन वर्षांचा आहे. पहिल्या वर्षी सूत रंगविणें, दुसरे वर्षी छिटें छापणें, व तिसऱ्या वर्षी रेशीम रंगविणें अशीं कामें शिकविण्यांत येतात. या शिवाय देशी वनस्पतीपासून रंग कसे करावे हें ही शिकविण्यांत येतें. या शाळेच्या शिक्षणाचा फायदा लोकांना समजावून त्यांचीं मनें तो घेण्याकडे वळण्यासाठीं मुद्दाम उपदेशक वक्ते फिरत ठेवण्यापासून कांहीं परिणाम होईल असें वाटतें. या शाळेंत संस्थानाबाहेरच्या विद्यार्थ्यांना घेतात कीं नाहीं हें आह्मांस ठाऊक नाहीं, पण जर घेत असतील तर आमच्या वऱ्हाड प्रांतांतल्या तरुणांनीं रंगकामाचे शिक्षण तेथें जाऊन मिळविण्याची खटपट अवश्य करावी अशी आमची सूचना आहे.

## हिंदुस्थानांतील पैदाशीची वाढ.

( लिहून आलेला मजकूर. )

गेल्या जून महिन्यांत ह्मैसूर प्रांतांत औद्योगिक परिषद भरली होती. त्यावेळीं आर्थिक शास्त्राबद्दल बरीच भवति न भवति झाली. शेतीचें, विणकरीचें, व इतर धंद्याचें उत्पन्न दर माणशी दरवर्षी ३१ रुपयाचें आहे असें दिसून आलें. त्याच प्रमाणें इतर देशांतील दर माणशी वार्षिक उत्पन्न रुपये ३०० ते ६०० पर्यंत आहे. यासाठीं इंडियाचें उत्पन्न व युरोप अमेरिका वगैरे देशांतील उत्पन्नाशीं तुलना करणें बरोबर नाहीं. याचीं कारणें आहेत तीं:—

( १ ) हिंदुस्थानांतील लोकांची यांत्रिक कलेंत, रसायन शास्त्रांत वगैरे युरोप व अमेरिकेतील लोकांप्रमाणें प्रगति नाहीं ह्मणजे अज्ञान.

( २ ) हिंदुस्थानची हवा, अन्न, सामाजिक स्थिति वगैरेच्या मानानें व युरोप आणि अमेरिका येथील हवा अन्न व समाज स्थिति फार भिन्न त्यामुळें कामाच्या मानानें उत्पन्न कमी.

( ३ ) इतर राष्ट्रांच्या व्यापारानें हिंदुस्थानचा व्यापार मागे पडला. टॅरिफचा परीणाम.

( ४ ) हिंदुस्थानांतील जुने हुनर लुप्त झाले. ह्मणजे रंग करण्याची कृति वगैरे हुन्नर मागे पडले.

( ५ ) लढाईचे परिणाम पर्यायानें उत्पन्नावर घडतात. बर्मावार, आफगाणवार, सौथ आफ्रिकावार वगैरे इकडील लढाया व युरोप खंडातील व अमेरिकेकडील रूसोजपान वगैरे लढायांचा पर्यायनें झालेला परीणाम. अशा विषयीं सर फ्रॅन्सिस वेब्स्टर यांनीं अशाप्रकारचे उद्गार काढले आहेत.

या कारणांनीं हिंदुस्थानांतील मजूर व थंड हवेंतील ह्मणजे युरोप, अमेरिकेपैकीं कांहीं भागांतील मजूर यांच्या उत्पन्नांत फरक राहणारच. हिंदुस्थानांतील मजूर ज्यास्त वेळ काम करतील पण उत्पन्न कमीच अशी स्थिति युरोपांतील मजुरांची नाहीं. ते थोड्या वेळांत पुष्कळ काम करून उत्पन्न काढीतात. इकडील मजुरांची आकांक्षां फार मर्यादीत आहे ह्मणजे मुकादम झाले ह्मणजे मोठी मजल मारीली. त्यांना स्वतंत्र तऱ्हेनें काम करण्याची योग्यता नाहीं. याचें कारण अज्ञान यासाठीं शिक्षण त्याच बरोबर अनुभवजन्य ज्ञानाची माहिती पाहिजे. ( Practical Knowledge )

सांप्रतच्या लढाईमुळें हिंदुस्थानच्या व्यापारावर परिणाम कसा होत आहे हें सर्वांना माहित आहेच. जपानराष्ट्र यावेळीं हिंदुस्थानांतील व्यापारावर चैन करीत आहे. ह्मणजे जर्मन वगैरे राष्ट्रांतून व्यापार हिंदुस्थानांत झपाट्यानें चालला होता तो लढाईमुळें बंद झाल्यानें जपान झपाटा मारीत आहे. याचें कारण हिंदुस्थानांतील लोकांना औद्योगिक धंद्याचें ज्ञान नाहीं. जुनें धंदे करणारे लोक मेले गेले; त्यामुळें नवीन प्रक्रेस हुन्नर माहित नाहीं. ह्मणून अडचण आज भासत आहे. ही अडचण दूर झाल्यावांचून औद्योगिक प्रगति कशी होणार? हिंदुस्थानांत कच्चा माल होत असून त्याचे जिन्नस करण्याची माहिती होणें फार इष्ट आहे. यासाठीं ईश्वर कृपेनें लढाईचा लौकर शेवट होवो ह्मणजे औद्योगिक ज्ञाते लोक इंग्लंड कडून आणून इकडील तरुण मंडळीना शिक्षण दिले गेले पाहिजे. अशी योजना होणें इष्ट आहे.

औद्योगिक शिक्षणाची वृद्धि होण्यास्तव काय उपाय योजिले आहेत? सरकारांनीं टेक्निकल शिक्षणाची सोय केली आहे. रसायन शास्त्राची सोय होणें जरूर आहे. शेतकीची सुधारणा करण्यासाठीं सरकारांनीं सोय केली आहे. ठिकठिकाणीं शेतकीच्या शाळा, कॉलेजेस वगैरे चालविली आहेत. परंतु शेतकरी वर्ग, व्यापारी वर्ग, सावकार कारखानदार लोकांनीं आपणहून औद्योगिक बाबींत काय योजना खाजगी रीतीनें केली आहे? नकारार्थी उत्तर येईल, यूरोप, अमेरिका, वगैरे राष्ट्रांतील प्रगतिकडे पाहिले ह्मणजे आश्चर्य भरीत मनुष्य होतो. खाजगी उत्तेजन फार मिळतें. सध्या जपान पहा कसा पुढें सरसावला आहे. तर अशी ह्मण आहे कीं इच्छा आहे तेथें मार्ग सूचतो Where there is Will there is a Way या साठीं औद्योगिक परीषदेनें या बाबींत काय काय व्यवस्था केली आहे बरें? दरवर्षी सभा भरवून पुढें लोकांना ज्ञान काय प्राप्त झालें आहे? ती योजना करण्यास्तव स्वार्थत्यागी लोकांची जरूरी आहे. ज्या प्रमाणें पैसाफंड जमवून कांचेचा कारखाना काढण्याची सोय केली आहे त्याप्रमाणें रंग तयार करणें, चामडी रंगवणें व जिन्नस तयार करणें, वगैरे अनेक धंदे आहेत. ते खेडोपाडी व शहरांतील असें दोन भाग करून व्यवस्था हळू हळूं लाविली पाहिजे कोणतेही काम एकदम होत नाहीं हें जाणून आहों. पण दरवर्षी कांहीं तरी लहानसा कां होईना एखाद्या धंद्याविषयीं प्रांतांतील अनुकुल स्थिति पाहून तो चांगल्या स्थितींत येईपर्यंत त्यामध्यें येणाऱ्या अडचणी दर करण्याची खटपट केली पाहिजे. नाहीतर काय उपयोग ? कोण लोक आपला पैसा व्यर्थ टाकतील बरें ? कारण गिरण्या, जिन प्रेस वगैरे कारखान्यांत ज्यांनीं विभाग घातले त्यापैकीं पुष्कळांना वाईट अनुभव आला ह्मणून लोक भितात. याजबद्दल दुसरा विषय होईल त्याबद्दल पुढें उल्लेख करण्यांत येईल. ज्या ज्या प्रांतांत जे जे धंदे, कारखानें मोडकलीस आले आहेत, यांचीं कारण चौकशीनें शोधून काढून ठेवावीत आणि मग हळू हळूं दूर करण्याची खटपट करण्यास लागावे. अशी चौकशी करून प्रांतानिहाय माहिती औद्योगिक संस्थन जमा करून ठेविली आहे काय ? नसेल तर ती करवावी. तपशीलवार माहिती ग्रंथित करून ठेविल्यानें पुढच्यास ठेस मागिल शहाणा असा उपयोग होईल. आद्योगिक माहिति छापण्याची हाकाहाक होतें. हें दुर्दैव नव्हे काय ? ह्मैसुर प्रांतांतील अधिपतींनीं या बाबींत जशी प्रगति करण्याची इच्छा मनोभावापासून प्रगट केली आहे व तादित्यर्थ श्रेय करीत आहेत अशी योजना भारत औद्योगिक संस्थेनें शक्यनुसार करावी. आणि इतर संस्थानीकांनीं व शेट सावकारांनीं अनुकरण करावे अशी योजना इंडीयन औद्योगिक संस्थेनें करवावी. वर्षभर या बाबतींत श्रम करणारी मंडळी प्रथम शोधून काढावींत. त्यांच्यासाठीं भोजन, वगैरेची व्यवस्था करून त्यांना या कामासाठीं वाहाविले पाहिजे. ज्याप्रमाणें सर्व्हंट आफ इंडिया सोसायटी नामदार कै. गोखले यांनीं काढली आहे त्याप्रमाणें ही संस्था पाहिजे आहे. वार्षिक सभा भरून कागदी मेळ घालून चालत नाहीं. क्रिया घडली पाहिजे. क्रियविण वाचाळतां कांहीं उपयोगाची नाहीं. औद्योगिक काम फार श्रमसाध्य आहे. असा इतिहास इतर सर्व राष्ट्रांतील लोकांचा उपलब्ध आहे त्यावरून सहज ध्यानीं तेईल.

गत गोष्टी नष्ट झाल्यामुळें शोक करीत बसण्याऐवजी कामास लागावे. कृत संकल्प करून निश्चय पाहिजे श्री तुकाराम महाराजानीं निश्चयाचे बळ यावर जोर देऊन फलप्राप्ति होतें असें प्रतिपादन केलें आहे. तर कोणतेंही काम करण्यास पक्का निश्चय पाहिजे ही गोष्ट विद्वानांनीं विसरतां कामा नये. यासाठीं यंदाच्या इंडियन इंडस्ट्रियल परीषदेनें आपल्या हाती कांहीं तरी कार्य घ्यावें अशी आह्मी नम्रपणाची सुचना करीत आहों इकडे लक्ष्य जाईल अशी उमेद आहे. ह्मणजे कांहीं कालानें हिंदुस्थानांतील पैदाशीची वाढ थोडी थोडी होत जाईल.

सरकार औद्योगिक बाबींत पुष्कळ मदत देण्यांस तयार आहेत. पण इंडियन लोकांनीं पुढें होऊन शक्य ते धंदे काढून मग अडचणी आल्या त्या सरकारास विचाराव्यात. उदाहरणार्थ—इलिचपूरची मॅच फॅक्टरी ह्या आज मित्तीस बंद पडली आहे. तर इंडियन इंडस्ट्रियल कानफरन्सनें या बाबींत काय केलें बरें ? प्रांतानिहाय चौकशी तरी केली काय ? केली असेल तर काय तपशिलवार माहिती आहे बरे ! अशी अव्यस्था कां असावी. या वेळीं तरी पुढें होऊय ज्या ज्या अडचणी असतील त्या तरी या संस्थेमार्फत अगर स्वतः [illegible] कांनीं सरकारच्या कानावर अडच[illegible] व्यात. ह्मणजे सरकार शक्य [illegible] देतील.

,200
08,850
8,02,223
37,10,910

अशा प्रकारें हळू हळूं व्यवस्थ[illegible] गेल्यास पुष्कळ फायदा होईल. शिक्षणाची वृद्धि होऊन धंद्याची, कार[illegible] न्याची प्रगति होऊन व्यापार वाढेल त्या मानानें पैदास ह्मणजे उत्पन्न ही सहज वाढेल.

## वार्सा.

गेल्या आठवड्यांतली युद्धाची अतिशय महत्त्वाची बातमी ह्मणजे राशियनांनीं वार्सा शहर सोडलें ही होय. गेल्या तीन चार आठवड्यांपासून वार्सा जवळच्या घनघोर युद्धाच्या ज्या बातम्या येत होत्या, त्यावरून राशियन लोक हे शहर आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं जिवापाड श्रम करीत होते आणि त्या यत्नांत त्यांना आतांपर्यंत चांगलें यश येत गेलें असें दिसत होतें. पण अखेरीस त्यांचा निरुपाय होऊन 'सर्वनाशे समुत्पन्ने ऽर्धं त्यजति पंडितः' या न्यायानें राशियानें शहाणपणाचें वर्तन केलें. कारण, वार्सा त्यांनीं आणखी कांहीं वेळ लढविला असता, तर त्याचा परिणाम राशियालाच फार हानिकारक झाला असता, त्याच्या योगानें राशियाची प्रचंड प्राणहानि होऊन शिवाय राशियन फौजेची रांग तुटली असती, व शत्रूला मारा करण्याला अनेक द्वारें एकदम खुलीं झालीं असती. ही मोठी हानि टाळण्यासाठीं वार्साची हानि राशियानें पतकरली आहे यांत कोणासही कांहीं गैर दिसणार नाहीं. वार्साची हानि ही कांहीं सामान्य हानि नव्हे. वार्सा ह्मणजे विस्तुला नदीच्या तटप्रदेशाचें नाक आहे, आणि तें नाक शत्रूच्या ताब्यांत देणें ह्मणजे सबंध पोलांड प्रांताच्या किल्ल्या त्याच्या हवालीं करण्यासारखें आहे हें खरें आहे, तरी पोलांड ह्मणजे कांहीं सगळा रशिया नव्हे, राशियन राष्ट्रपुरुषाच्या देहाचा तो एक अत्यल्प भाग आहे. तेव्हां सर्व देहाची हानि टाळण्यास्तव त्याचा त्याग युद्धकलेच्या दृष्टीनें विहित होता, आणि राशियनें तो केला. असो. जर्मनीला यापासून चांगला फायदा होईलच पूर्वेकडे गुंतवून ठेविलेले सैन्य आतांपश्चिमेकडच्या रणक्षेत्रांत पाठवितां येईल. पण त्या बरोबर राशीयन सैन्याला ही थोडासा विसावा मिळेल, आणि जर्मनीवर जोरानें उलटून पडण्यास लगणारा उत्साह ही कमावतां येईल.

## पश्चिमेकडील रणक्षेत्र.

यांत ही अलीकडे बरीच गडबड सुरू आहे. जर्मन लोकांनीं नांसीवर बांब टाकले व हूगच्या उत्तरेस व दाक्षिणेस ब्रिटिश खंदकावर जोराचे हल्ले करून जळत्या पेताच्या साह्यानें त्यांनीं ब्रिटिश फौजेची पहिली फळी फोडली. तथापि लढाईत इंग्रजांनीं शिकस्त करून पीछेहाट होऊं दिली नाहीं. जर्मन वैमानिकांनीं ही सेंटपोलवर बांब टाकले, व एका अर्भकाची निष्कारण हत्या करण्याचें पाप संपादलें. उ[illegible] मध्यें

| [illegible] | [illegible]ome. | Total Assets. |
| --- | --- | --- |
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,043 | 4,96,86,509 |

BONUS

ending 31 December 1912, constitutes a next Division of profits will be madea s year when all With Profit Policies effected

FEATURES.

Liberal Conditions.

prosperity.

s, after proviaing for the Reserve

ry 3 years.

Europeans

ना[illegible]
चतुर्थांश[illegible]
रनें जाहिर
सर एडवर्ड[illegible]
पाठवून कळविलें आहे[illegible]
[illegible]्याविषयींचीं इंग्रजांचीं कारणें
ठाऊक आहेतच व अमेरिका जो [illegible]
देईल त्यावर इंग्रजांचीं पूर्ण श्रद्धा ही [illegible]

तथापि या लढाईचा शेवट यशस्वी रीतीनें करून कायमची शांतता होईल आणि स्वातंत्र्य प्रस्थापित होऊन हडेलहपीचें बंड मोडेल तोंपर्यंत लढण्याचा दोस्त राष्ट्रांचा कृतनिश्चय आहे.

## राष्ट्रधर्मप्रचारणासंघ.

या नांवाची एक संस्था आमचे वऱ्हाडप्रांतस्थ डॉ. केतकर यांनीं नुकतीच स्थापिली आहे. या संस्थेच्या उद्देशपत्रकाची एक प्रत त्यांनीं कृपा करून आमचेकडे पाठविली आहे, व तींत आपल्या संस्थेचे उद्देश, कार्य पद्धति, कार्याचें धोरण वगैरे सूत्रपद्धतीनें सांगितलीं आहेत. या संस्थेचे मुख्य तीन उद्देश आहेत. १ भाषानुरोधानें हिंदुस्थानची विभागणी करणें, २ प्रत्येक प्रांताचा राज्यकारभार त्याच्या प्रांतांतल्या देशी भाषेच्या द्वारें चालविणें, ३ युनिव्हर्सिटीमधला संपूर्ण शिक्षण क्रम देशी भाषेतून देणें. या तीन सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें डॉ. केतकर यांची खटपट चालली आहे. ते सद्धेतूनें व राष्ट्रहिताच्या दृष्टीनेंच ही खटपट करीत आहेत याविषयीं आमची पूर्ण खात्री आहे. पण त्यांच्या या उद्देशांच्या सिद्धीनें राष्ट्राचें खरोखर हित कितपत होईल हें अवश्य पाहिलें पाहिजे. पहिला उद्देश तर हितपरिणामी व व्यवहार्यही दिसत नाहीं. प्रांतांची वाटणी भाषांच्या तत्त्वावर केल्यास आज सगळ्या हिंदुस्थानचें एकीकरण करण्याचा सर्व प्रांतमिळून एक हिंदी राष्ट्र बनविण्याचा कांग्रेसकडून जो जंगी प्रयत्न चालला आहे त्याला कांहीं अंशीं अडथळा आल्यावाचून राहणार नाहीं. डॉ. केतकर यांच्या उद्देशसिद्धीनें प्रांताचें एकीकरण कदाचित् साधेल; पण राष्ट्रघटना होणार नाहीं. प्रांताचें एकीकरण साधण्यास देखील एक जबरदस्त विघ्न आहे. तें हें कीं प्रत्येक प्रांतांत मुख्य भाषा जरी एकेक असली तरी [illegible] भिन्न भाषा बोलणारांची संख्याही [illegible] उदाहरणार्थ, महाराष्ट्रांत

नि. हातची बाग.
नो० नं० ३२०

## नोटीस

नोटीस घेणारी यमुना मर्द बाबनराव रा० माकनेर ता० मलकापूर.
यांसः—
नोटीस देणार बाबनराव वा॥ रामु

सतत ९० वर्षांच्या पूर्ण ही पोषक दूषित आहे.

[illegible] नेला बाधक आणि ती व्यवहार्य [illegible] भाषानुरोधानें हिंदुस्थानच्या प्रां[illegible]विभागणी केल्यास कांहीं प्रांत फार [illegible] तर कांहीं फार लहान होतील, [illegible] राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना फार अडचण होईल. लॉर्ड कर्झन साहेबांनीं बंगालची विभागणी लोकांच्या धर्माच्या तत्त्वावर करून एकीकडे सगळी हिंदूंची वस्ती व एकीकडे सगळी मुसलमानांची वस्ती अशी निरनिराळी केली तेव्हां लोकांकडून जबरदस्त विरोध झाला व सरकारला ती विभागणी बदलावी लागली, तसाच प्रसंग डॉ. केतकर यांच्याही योजनेनें येणार. त्यांच्या दुसऱ्या उद्देशाचें ही विफलत्व अशाच रितीनें दाखवितां येईल. प्रत्येक प्रांताच्या राज्यकारभारांत सर्व जातीच्या, धर्माच्या, त्याचप्रमाणें भाषेच्याही प्रमुख लोकांच्या सल्ला मसलतीनें काम होणें अवश्य आहे, या ध्येयाला डॉ. केतकर यांची योजना प्रतिबंधक असल्यामुळें ती त्याज्य म्हटली पाहिजे. आतां राहतां राहिला शेवटचा उद्देश म्हणजे युनिव्हर्सिटीतलें सारें शिक्षण देशी भाषेतून देणें. यासंबंधानें तूर्त इतकेंच करणें शक्य आहे कीं हें ध्येय शिक्षणाधिकाऱ्यांनीं डोळ्यासमोर ठेवावें व हळू हळू अमलांत आणावें. आजच तें ध्येय पूर्णपणें अंमलांत आणण्या सारखी देशी भाषांच्या ठायीं परिपक्वता नाहीं ही गोष्ट कोणी नाकबूल करील असें आम्हांस वाटत नाहीं. युनिव्हर्सिटींत ज्या निरनिराळ्या विषयांचें शिक्षण देण्यांत येतें त्यांतल्या कित्येक विषयावर तर देशी भाषांतून एक ही ग्रंथ नाहीं इतकेंच नाहीं तर त्या विषयाची परिभाषा ही तयार नाहीं. मग शिक्षण कसें देणार? आज इंटरमीजियेट किंवा बी. ए. परीक्षांचें विषय सुद्धां देशी भाषांच्या द्वारें शिकवितां येतील कीं नाहीं यांचा वानवा आहे. मग एम. ए. चें सायन्स किंवा तत्त्वज्ञान यांसारखे विषय कसें शिकविणार? सारांश, डॉ. केतकर यांची योजना आजच्या घटकेला तरी सर्वांशीं अव्यवहार्य आहे असें आम्हांला वाटतें.

## ४ थी आगष्ट

### (विजयश्रीची प्रतिज्ञा)

जगाला हालवून सोडणारें जें रणकंदन चालू आहे त्याला गेल्या ४ थ्या तारखेला एक वर्ष झालें. या तारखेला ब्रिटिश दौलतीनें लढाईचें कंकण बांधलें या गोष्टीचा अनुवाद करताना चक्रवर्ती जॉर्ज बादशाहा यांनीं फ्रेंच सेनापतींना तारेनें [illegible] पाठविला कीं ही लढाई शेवटपर्यंत नेण्याचा आमचा दृढ संकल्प असून [illegible] संयुक्त राष्ट्रांबरोबर खांद्याला खांदा देऊन [illegible] सिद्ध आहोंत. फ्रेंच सेनापतीनें त्यावर [illegible] तार केली कीं जगाच्या शांततेवर [illegible] टाकणारें जर्मन राष्ट्र रसातळाला पोहोंचेपर्यंत फ्रेंच राष्ट्रही ही लढाई चालवीलच चालवील. लढाई शेवटाला पोहोंचविण्याच्या शपथा संयुक्त राष्ट्रें घेत आहेत इतकेंच नाहीं तर ही आपली प्रतिज्ञा विजयश्रीनें अलंकृत होईपर्यंत आपापलें सर्वस्व स्वातंत्र्य देवतेच्या व न्याय देवतेच्या चरणीं अर्पण करण्यास उद्युक्त आहेत. ही सर्वच गोष्ट इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्या सारखी आहे. ईश्वर करो आणि ही राष्ट्राराष्ट्रांची जीवन ज्योती उत्तरोत्तर जगाला आपल्या अद्भुततेनें थक्क करो. इतकेंच नव्हे तर सर्व मानव जातीच्या कल्याणसंपदा जोमानें वृद्धिंगत होवो.

### इंडियाचें प्रोत्साहन

आमच्या चक्रवर्ती बादशाहानें ही भीष्मप्रतिज्ञा वर केला आहे तिला सर्व ब्रिटिश राज्यांतील प्रजाजनांचें आंतून प्रोत्साहन आहे किंबहुना सर्व ब्रिटिश साम्राज्याच्या मनोदयाला बादशहाच्या वाणीनें मूर्त स्वरूप आणिलें आहे. ही अंतःशक्ति किती प्रबल आहे याची कल्पना सर्व साम्राज्यभर ४ थ्या आगष्टच्या ज्या जाहीर सभा भरल्या त्या आपल्या कंठरवानें जगास विस्मित करीत आहेत. इंडियन राष्ट्राचा हा उच्चैःनाद आकाशांत इतका कोंदाटला आहे कीं आमच्या एका विनोदी मित्रानें ध्वनित केल्याप्रमाणें जर इंडियनांच्या व्हॉलेंटियर कोअरा बनू शकतील तर जर्मन राष्ट्रालाच काय पण सर्व पाश्चात्य राष्ट्रांना त्यांच्यापुढें धीर धरवणार नाहीं. शारीरिक शक्ती पेक्षां मनाच्या शक्ती फार दांडग्या असतात आणि त्या आम्ही साम्राज्याच्या दानतीसाठीं अर्पण करीत आहोत ही गोष्ट आमचें सरकार विसरणार नाहीं. ही अर्पण बुद्धि तरी ब्रिटिश उदार राज्यकारभाराची साक्ष देते. पण आम्ही मात्र असें समजतों ही जगड्व्याळ लढाइ म्हणजे राज्यकर्ते व इंडियन लोक यांचीं अंतःकरणें एकत्र करणारी दैवी माया होय. अर्थात् अशा या स्वाहाकाराच्या शेवटीं प्रसादाच्या वाटणीच्या समयीं आम्ही ब्रिटिश लोकांच्या बरोबरीनें हक्काला हक्क मागून घेण्याला तिळमात्रही मागें सरणार नाहीं. ब्रिटिश साम्राज्याखालीं इंडियाचें राज्य हाच आमचा भावी प्रसाद होय. आणि म्हणूनच आम्ही ४ थ्या तारखेचा मनोरथ विजयश्रीच्याकडे मंदिराकडेच चालविला आहे.

### दैवी मनोरथ.

हा दैवी मनोरथ सर्वत्र विश्रुत करण्यासाठीं हिंदुस्थानांतील इतर भागाप्रमाणें आमच्याही नगरींत आम्ही सर्वजण जमलों होतों. त्यावेळीं वऱ्हाडचे कमिशनर रा. ना. स्टँडनसाहेब हे आले होते. अध्यक्ष पदाचा बहुमान लोकांनीं त्यांनाच दिला. पण राजेसाहेबांचे वऱ्हाडचे प्रतिनिधि म्हणून आपण होऊनच तो मान गर्भितपणें घेऊन त्या उच्च आसनावरून त्यांनीं सभेला संबोधण्याला सुरुवात केली. आणि प्राइम मिनिस्टर रा. आस्किथ व कान्सरव्हेटिव्ह पक्षाचे अग्रणी रा. बॉनर लॉ यांनीं विलायतेहून तयार करून पाठविलेला ठरावाचा मसुदा सभेपुढें मांडला आणि पुढील सर्व अवशिष्ट भाग सूत्रधाराच्या हातांतील कांहीं ठळक नागरिकांनीं बाणाच्या सरळ रेषेप्रमाणें सिद्धीस नेला. इंडियन शिष्ट संप्रदायाला ही अधिकारगर्जना इतकी रुचिर वाटत नाहीं. सरकारी मनोभाव व लोकांचे मनोभाव हे भिन्न नव्हते तथापि लोकांच्या मनोभावाला अंतःस्फूर्तीनें व्यक्त होऊं देणें विशेष जरूर होतें. रा. नामदार स्टँडनसाहेब यांच्या वीरश्रीच्या भाषणांत जर्मनीच्या लष्करी दांडपणाचा व तसाच पराकष्टेच्या स्वार्थी व क्रूर तत्वज्ञानाचा निषेध फार जोराचा केला आहे. आणि जर्मनीचें इंडियावर साम्राज्य होईल तर इंडियाच्या स्वराज्याच्या कल्पना व आकांक्षा जर्मनी कशा तुडवून टाकील हें सांगताना आमचा भावी मनोराज्याचा किल्ला त्यांनीं ध्वनिरूपानें जो रेखाटून ठेविला आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे फारफार आभारी आहोंत. या सभेंत रा. रामभाऊ महाजनि, खानबहादर वलायतुल्लाखान, ना. रा. ब. दामले, खानसाहेब अमानखा, व रा. लक्ष्मणराव ओक यांनीं आपापल्या वक्तृत्वानीं ४ थ्या आगष्टच्या ठरावाला विशेष शोभा आणली होती.

## इनाम--जाहागीर.

वऱ्हाडांत पुष्कळशीं इनामें हिंदु व मुसलमानी देवस्थानाप्रीत्यर्थ दिलेलीं आहेत, आणि तसेंच कांहीं इनामें धर्मशिक्षण देण्याच्या निमित्तानें काजी, धर्मगुरु व इतर उपाध्याय यांस देण्यांत आलेलीं आहेत. हीं निरनिराळीं संस्थानें अव्याहत चालविण्यासाठीं जी योजना प्रथम करण्यांत आली ती योजना कालगतीनें अगदीं कुचकामाची ठरली असून पुष्कळ अंशीं तिचा दुरुपयोग होत असतो असें कष्टानें कबूल करावें लागतें. मनु पालटला त्या मानानें ही इनामदार मंडळी सुधरत न जातां ती आपल्या कार्याला योग्यशी देखील राहिली नाहीं. अशा स्थितींत इनाम–कमिशन नवीन बसविलें पाहिजे आणि सध्यांच्या कालाला अनुरूप अशा नव्या गोष्टी प्रचलित करण्यांत येतील तरच पुढें निभाव लागेल. जुन्यांतली सार्वजनिक उपयुक्तता ऱ्हासास पोंचली म्हणजे ही इनामें काढून घेऊन त्याची गंगाजळी शिक्षणाच्या प्रसाराकडे लावावी असा आमचा आग्रह आहे. देवस्थानांचे व्यवस्थापक जवळ जवळ अक्षरशत्रु होऊन आपापल्या चैनीकडे हीं सार्वजनिक इनामें खर्चूं लागले तर ते स्थानभ्रष्ट करण्यालायक नाहींत काय?

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— संतत झडीच्या दुर्दिनाला प्रकाश, ऊन व वारा यांनीं हांसरें रूप आलें आहे; व त्या बरोबर ताप हागवणीचीं व पोटदुखीचीं दुखणीं हीं शमत चाललीं आहेत. थोपलेल्या पेरण्या या उघाडीमुळें पुनः चालू झाल्या.

**स्वागतम्ः**— रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डिपुटी कमिशनर हे पुनः या जिल्ह्याचीं सूत्रें आज आपल्या हातीं घेतील. म्हणून सर्वजण त्यांचें स्वागत आनंदानें करीत आहेत. राजश्री जठार म्हणजे आकोल्याच्या लोकांचा तन्मणीच होय.

नामदार राजश्री स्टँडन साहेब कमिशनर यांचा मुकाम तीन हप्ते येथें होणार असून या जिल्ह्याचें वार्षिक समालोचन ते आपल्या चौकस दृष्टीनें करितील तेव्हां पुढील वर्षी करावयाच्या गोष्टी ते लोकांपुढें नानारितींनीं आंखून देतांना लोकांशीं दळणवळण वाढवितील असा भरंवसा आहे.

पूर्व वऱ्हाडाला व पश्चिम वऱ्हाडाला जसा एक एक निराळा इनस्पेक्टर आफ स्कूल्स देणार आहेत. तशी योजना कमिशनरी संबंधानें होईल तर बरें असें आम्हास वाटतें. म्हणजे अधिकाराची वाटणी नीटशी होऊन लोकांस स्थानिक कारभारांत येण्याला अधिक द्वारें खुलीं होतील.

**धारातीर्थी मरणः**—मेजर ओल्डहाम, सानिटरी इंजिनिअर हे लढाईवर गेले असून त्यांच्या मरणाची दुःखद वार्ता आली आहे. हे गृहस्थ विशेष कल्याणेच्छु सुशील अधिकारी होते म्हणून त्यांच्याविषयीं सर्वत्र हळहळ वाटेल.

हेंपत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

पुरवणी—वऱ्हाडसमाचार ता० ९ आगष्ट १९१५

## नोटीस

नोटीस बेशमी गुंज्या वा॥ अर्जुन्या महार रा. खुदानपूर प्रगणे मजकुर ता. मलकापूर

यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी मजला ता. १९ ११।११ इ॥ रोजीं करारनामा लिहून देऊन माझेशीं गंधर्व केले तुमचे माझे गंधर्व लागल्यापासून तुह्मी मजला फक्त ६ सहा माहिनेच वागविले. त्यानंतर तुह्मी मजला टाकून दिले आहे. आणि करारनाम्याप्रमाणें पाहिली बायको वागू नये अशा बद्दलचा लेख लिहून दिली आहे. त्याप्रमाणें तुह्मी वर्तन न करितां पाहिल्या बायकोस वागावित असून मजला वागावित नाहीं मी ता. १-७-१२ इ॥ पासून ता. मजकूर पर्यंत मी अन्नावस्त्रा करितां मी लोकांचे करजाऊ पैसे घेऊन १०० शंभर रुपये आज पावेतों मी आपला निर्वाह चालविला. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत जळगांव येथील सावकाराचे रुपये देऊन मजला घेऊन जावे. पैसे न दिल्यास व त्याच प्रमाणें तुमची पाहिली बायको इजला न सोडून दिल्यास मी १९ दिवसांत सावकाराचे पैसे देऊन दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. करारनाम्या प्रमाणें माझेवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क दावा राहिला नाहीं. नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत सर्व व्यवस्था करावी. ता. २८-७-१९ इ॥ दस्तुर मार्तंड वाघे शाम रा. नीगांव

सही

कवती मर्दे गुंज्या महार रा. नीगांव

नि. हातची बांगडी

नो० नं० ३२०

## नोटीस

नोटीस बेशमी यमुना मर्दे बाबनराव रा० माकनेर ता० मलकापूर.

यांसः—

नोटीस देणार बाबनराव वा॥ रामु पाटील रा० कजबे पींपळगांवकाळे ता. जळगांव जिल्हे बुलडाणें.

यांजकडूनः—

नोटीस देण्यांत येते कीं तूं माझ्या लग्नाची बायको असून आज १६ वर्षे झाले माझ्याशी तूं संसार केला. आतां तीन महिने झालें. माहेरी सत्यनारायण आहे असें ह्मणून लक्ष्ममण वा॥ रामजी पाटील व नारायण व्यंकटेश जोशी हे उभयतां येऊन मामाचे घरीं ह्मणजे उमाळा येथून घेऊन गेले व तूं यांचे बरोबर गेली मी तुला वागविण्यास तयार आहे. मी दोनतीन वेळा तुला नेण्यास आलो असतां तूं माझे बरोबर आली नाहीं मागाहून येईल असे कईकवेळां सांगत गेली. लक्ष्मण वा॥ रामजी पाटील माकनेरकर व नारायण व्यंकटेश हे उमाळी येथून माझे मामाचे वरून घेऊन गेलों त्या वेळेस तुझे आंगावर ६९० रुपयांचे दागीणें होते तर तूं आतां ही नोटीस पावल्यापासून १६ दिवसाचे आंत दागीनें सुद्धां माझे घरीं यावे दुसरा घरठाव करू नये. मी वागविण्यास तयार आहे. दागीण्यांची यादी सदर दिली आहे. तारीख १८-७-१९ इ.

दागीन्याची यादी.

१ सोन्याची सरी तोळे १० ची.

१ पाटल्या सोन्याच्या ९

१ तोड्याचा जोड चांदीचा १०० भार.

१ गुंडवाळे ५० भार.

१ बाळ्या सोन्याच्या ६

१ नथ सोन्याची एक ६० रुपयाची.

१ कंठी एक चांदाची १९ भार

१ चांदीचा गोफ २० भार

१ चांदीचे घागऱ्याची पिशवी ७ भार-कमरेची.

येणेंप्रमाणें डागीनें आहेत त्यासुद्धां माझे घरीं येणें तारीख १८-७-१९ इ.

सही.

१ बाबन वा॥ रामूपाटील दं. खु.

नो. नं. ३२१


सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाइज्ड.

# सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, सधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक-** डा. गौतमराव केशव, आणि सन्स

ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३



सतत ४२ वर्षे चालेलला कारखाना

## ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच माव! ओटो सुरंगीं ! एकच माव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

**अत्तरें.**- गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

**तेलें.**- चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतक दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिर्के, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करंडे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | ,356 | 8.88,02,223 |
| 1914 | ,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,043 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a record for the company. The next Division of profits will be madea s at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

*M. deSOUZA,*

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh*

NagPUr.

N. N. 25


ही पुरवणी आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केली.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २६ माहे आगष्ट सन १९१५ ई० [ अंक ३२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं ९

---

**अस्सल अंगरी.**

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ८

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेली सर्व प्रकारची सुबक व वाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

---

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो. नं० ३

---

### नोटीस

**मुद्दे ठरविण्याचें समन्स.**

(कानू १ व ९, आर्डर ५, एक्ट ५ सन १९०८ ई०)

दिवाणी मुकदमा नं. २४ सन १९१५ ई.
विद्यमान मुनसफ साहेब नंबर १ यांचे कोर्ट

मुक्काम आकोला

वादी

रामगोपाळ दानमल मारवाडी रा. अकोला

प्रतिवादी

मार्तंड व्यंकटी सोनार रा. आकोला

दावा

नांव मार्तंड
वल्द व्यंकटी
जात सोनार रा० आकोला
तहसिली आकोला जि. आकोला

ज्यापेक्षां वादी यानें तुह्मावर मुद्दे बद्दल दावा केला आहे; त्या पेक्षां सदहहु दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख २९ माहे ८ सन १९१५ ई० रोजीं दिवसा १० वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्या संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा आसामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर होण्या विषयीं या लेखावरून तुह्मास समन्स करण्यास येत आहे; व ज्यावरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तें सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्या विषयीं तुह्मास फर्माविण्यांत येत आहे.

तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज ता. ३१-७-१९१५ ई० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्या निशीं दिले.

शिक्का. Sd/ M. C. Shukla.
मुनसफ नं. १

नो. नं ३१६ आकोला.

---

### NOTICE

*Grass. Grass. Grass.*

Season cut fodder grass of the best quality delivered on the rails at Rs. 24-per ton.

Grass baling operations on a limited scale will be started at Warora Station on the G. I. P. Railway, soon after the monsoons, and in order to avoid disappointment, all intending purchasers are requested to send in their indents to the undersigned before the 31st August 1915.

Sd/ W. J. Anthony.
Divisional Forest Officer,
N. N. 312 North Chanda Division

---

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुर्डे येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्चाचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें** } मॅनेजर

---

*Notice.*

Wanted a teacher in Municipal Anglo Vernacular School, Khamgaon, on Rs 40/- p.m. Apply with testimonials to the undersigned before 20th August 1915.

Non-matrics need not apply.
Dated 10th August 1915. Khamgaon.

M N. Parasnis,
Vice Chairman,
Municipal Committee
N. N. 326 Khamgaon.

---

### नोटीस

रा. रा. सखाराम बिन सदाशिव भट जोसी रा. कापसी ता. आकोला व सारजाबाई जवजे बळिराम भट जोशी रा. कापसी ता. आकोला जि० आकोला.

यांसः—

खालीं सह्या करणार याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मौजे खिरपुरी बुजरूक ता. बाळापूर येथील सेत सर्वे नंबर ५० व ५६ यांतील एकद्वितीयांश $\frac{1}{2}$ हिस्सा आमचे मालकीचा असून आमची इस्टेट अविभक्त एक जागी आहे ती तुह्मी चालू सालीं अन्यायानें जबरीनें ताब्यांत घेऊन पेरले तरी सदरहु सेत आमचे आह्मास पिकासुद्धां ताब्यांत द्यावें न दिल्यास कायद्याप्रमाणें व्यवस्था करू व या नोटिसीचा खर्च व पुढें होणारे सर्व खर्चाचा व शेताचे पिकाचा बोजा तुमचेवर राहील कळावें तारीख ९ माहे ८ आगष्ट सन १९१५ इसवी द. खु.

सह्या.

गोपाळ मोतीराम चीने द. खु.
लक्ष्मण मोतीराम चीने द. खु.
राहणार वाडेगांव तालुके बाळापूर.

नो नं. ३२२

## नोटीस

मी प्रभु वा। येमजी इनामदार मौजे बोरव्ह ता० मंगरूळपीर जि० आकोला

यांजकडून

ध्यानकी मर्द येमजी इनामदारीन मौजे बोरव्ह ता० मंगरूळपीर जि० आकोला

ईस:—

नोटीस देतो अशी कीं मी तुझा दत्तक मुलगा असून सरासरी २०-२५ वर्षे झालीं वहिवाट करीत आहे. परंतु तूं जिल्हा आकोला येथें ता० १०-५-१९ इ. रोजीं मौजे मजकुरी येथील चंद्रु वा। हेमला बंजारी याजला कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन रजिस्टर माझे पश्चात करून दिले. तरी त्याजबद्दल मजला मुळींच माहित होऊं दिले नाहीं. हल्लीं मजला माहीत झाल्यावरून तुजला या नोटिशीनें समज देतो ती येणें प्रमाणें.

क्लास नंबर ११ मिसल नंबर ३३ सन १९१९ वि० सबडिव्हीजनल साहेब कोर्ट वाशीम क्लास नंबर २ मिसल नंबर ३ ता० १०-५-१९१९ वि० डिपुटी-कमीशनर साहेब जि० आकोला यांचे कोर्टांत व क्लास नं० २१ मिसल नंबर ४ नि० ता० २६-१-१८९७ जनाब रेसिडेंट साहेब बहादूर प्रांत यांचे जाहीरातीत क्लास नं० २१ मिसल नंबर ७ सन १८८८-८९ सालीं वि० सबडिव्हीजनल साहेब कोर्ट वाशीम यांचे कोर्टांत व क्लास नंबर ११ मिसल नंबर ८७ नि० ता० २३-७-१९१९ सबडिव्हीजनल कोर्ट वाशीम वरील या सर्व कोर्टांत मी दत्तक मुलगा आहे असें ठरलो आहे.

येणें प्रमाणें पांच कोर्टांत कागद पत्राचे आधारानें दत्तक ठरलों आहे तरी तूं प्रत्येक कोर्टांत तुझा कबूल जबाब होऊन हुकूम मिळाले आहेत त्याप्रमाणें मी वहीवाट करीत आहे. हल्लीं माझा अधिकार दत्तकाचे संबंधानें पूर्ण झाला आहे. तरी वरील चंद्रु वा। हेमला याजला कुलमुखत्यारपत्र जें दिलें आहे तें मी दत्तकाचे आधारें रद्द समजून तूं फक्त अन्नवस्त्र चीच मालकीण आहेस. हल्लीं तूं आज तारखेपासून माझे पश्चात कोणतेही काम ह्मणजे लेखी दस्तऐवज सावकारापासून पैसा आणणें देणें हा व्यवहार केल्यास व इनाम्या-संबंधानें कोणतेही लेखी दस्तऐवज केल्यास ते रद्द समजून मी मुळींच जबाबदार नाहीं व मी लागूं करणार नाहीं ते रद्द समजले जाईल या संबंधानें साहूसावकारास आणि सरकारास वऱ्हाडसमाचारांत जाहिर केलें आहे. कळावें ता० ९-८-१९

द० दत्तात्रय श्रीधर ब्राह्मण रा तळप

सही

प्रभु वा। येमजी इनामदार

नि० मोहर

नो० नं० ३२३

## नोटीस

कन्हयालाल वल्लद मोतीलालजी भंडारी रा. आकोट हल्ली मु. नागोर जि. जोधपूर

यांस:—

खेमराज दामोदरदास दु. आकोट याजतर्फे नोटीस देण्यांत येते कीं सन १९१३ चे एप्रील महिन्याचे १९ तारखेस तुह्मी मयत देविलाल दलाल यांचे मार्फतीनें आमची असामी सूर्यभान वल्लद रावजी रा. चिंचोली याचे १९॥ बोजे रुई २ दोन लाटांत दर रु. ८३॥ च्या भावानें विकत घेतले.

लाट १ बोजे ५ मण ६४८९
व लाट १ बोजे १४॥ मण १६३-४

गिरधरिलाल दामोदरदास जिनिंग फ्याक्टरी नांवाच्या आमच्या जिनांत सूर्यभान कापुस आणीत असे व तो माल डिपाझिट समजून त्यावर रक्कम आमचे दुकानांतून नेत असे. व त्याचे बोजे विकल्यावर त्या बोज्याच्या तकपटींत आमच्या मार्फतचा दाखला दिला जाऊन त्या तकपटीवरून येणारी रक्कम सदर्हू असामीचे खात्यांत जमा होत असे.

वर लिहिल्याप्रमाणें तुह्मी १९॥ बोजाचा सवदा केल्यानंतर देविलाल यानें सदर्हू जिनचे म्यानेजर नारायणराव ढोबरे याजपासून सदर्हू बोजाबद्दल कच्ची तकपटी करून घेऊन तुमचे नांवानें गेटपासही करवून तुह्मांस दिली. हा माल तुमचे कडेस त्या गेटपासचे आधारानें पोहोचला. कच्ची तकपटी आणि गेटपास तुह्मांस दिली त्याचवेळीं देविलालनें त्या कच्च्या तकपटीवर तुमची सही करून परत मागितली. परंतु तुह्मी ह्मणाले सध्या मला फुरसत नाहीं. थोड्या वेळानें लवकरच पक्की तकपट्टी करून खेमराज दामोदरदासचे दुकानावर देऊन देईन. याप्रमाणें तुमच्या सहीची कच्ची तकपट्टी आमचे जिनचे म्यानेजरपाशीं अगर आह्मापाशीं परत न येतां तुमचे जवळच राहून गेली. माल तुह्मी नेला व तुमचे सहीची कच्ची तकपट्टी आह्मांस मिळाली नाहीं. ह्मणजे याबद्दल तुमचे हातचा दस्तऐवज आमचेपाशी राहिला नाहीं असें समजून तुह्मी पक्की तकपट्टी आह्मास दिली नाहीं ही गोष्ट २।३ दिवसांनीं आमचे दुकानदारास कळाल्यावर पक्की तकपट्टी करून देण्यास तुह्मांस सांगितलें असतां तुह्मी ह्मणाले तकपट्टी घेऊन तरी रुपये मागाल तर मी आतां तकपट्टी देत नाहीं. चारपांच दिवसांनीं चुकती रक्कम देऊन देईन. तुमच्याशी आमचे मागिल मुनीम हरसुखदासजी यांचा फारच स्नेह असल्यामुळें व तुह्मी आमचे आप्तवर्गांत असल्यामुळें याविषयीं रिपोर्ट पोलीसमध्यें वगैरे न देतां ह्या भानगडीचा निकाल केव्हां तरी आपसांत होऊन जाईल असें समजून तुह्मांस रकमेबद्दल पुष्कळवेळां तगादा सुरु ठेविला. परंतु तुह्मी टाळाटाळीचा जबाब देत जाऊन रक्कम दिली नाहीं. ह्मणून वाटते कीं तुमचे कडून सदर्हू रक्कम वसूल होण्याचा कांहींच संभव दिसत नाहीं.

वर लिहिल्याप्रमाणें तुह्मी कारस्थानी केल्यामुळें सूर्यभानचे खात्यांत आमचे रु० १६८९ -। अक्षरी सोळाशे एकोणनव्वद सव्वा आणा मुद्दल घेणें, शिवाय व्याज घेणें राहून गेले ह्मणून या नोटीशीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं सदर्हू १९॥ बोजे रुईची रक्कम तुह्मी आमचेकडेस जमा केली पाहिजे होती ती व्याजासुद्धां दरमहा दरशेकडा १ रुपया प्रमाणें सन १९१९ चे आगष्ट महिन्याचे ३१ तारखेचे आंत देऊन आमची पावती घ्यावी. तसें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून व्याजासुद्धां व नोटिशीचे खर्चासुद्धां वसूल करण्यांत येईल. कोर्टखर्च तुह्मास सोसावा लागेल. ता० ११ आगष्ट १९१९ इ.

सही

खेमराज दामोदरदास तर्फे

नथमल सदानी

नो. नं. ३२४

## नोटीस.

मी प्रभु वा। येमजी इनामदार मौजे बोरव्ह ता० मंगरूळपीर जि० आकोला

यांजकडून

चंद्रु वा। हेमला बंजारी रा० मौजे बोरव्ह ता० मंगरूळपीर जि० आकोला

यांस:—

नोटीस देतो अशी कीं मी ध्यानकी मर्द येमजी हिचा दत्तक मुलगा आहे अशावरून मी खालीं लिहिल्याप्रमाणें दिले असून माझी आई ध्यानकी हिनें माझे पश्चात तुजला कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन जिल्हा माजीस्ट्रेट कचेरींत नोंदून दिलें आहे. त्याजबद्दल मला मुळींच माहीत होऊं दिले नाहीं. हल्लीं मजला माहीत झाल्यावरून तुजला या नोटिशीनें समज देतो ती येणें प्रमाणें.

क्लास नं० ११ मि० नं० ३३ वि॥ सबडिव्हीजनल कोर्ट वाशीम क्लास नं० २ मि० नं० ३ वि॥ डिपुटीकमीशनर सा० जि० आकोला क्लास नं० २१ मि० नं० ४ नि० ता० २६-१-१८९७ जनाब रेसीडेन्ट साहेब बहादूर प्रांत वऱ्हाड यांचे जाहीरातींत. क्लास नंबर २१ मि० नंबर ७ सन १८८८-८९ सालीं वि॥ सबडिव्हीजनल सा० कोर्ट वाशीम. क्लास नं० ११ मि० नं० ८७ ता० २३-७-१९ वि॥ सबडीव्हीजनल साहेब कोर्ट वाशीम या सर्व कोर्टांत मी दत्तक मुलगा ठरलों आहे. मी कागदपत्राचे आधारानें दत्तक ठरलों आहे. हल्लीं वरील माझे आईनें जे तुजला कुलमुखत्यारपत्र लिहून दिले आहे तें मी दत्तकाचे आधारानें रद्द केले आहे. या पुढें माझे आईबद्दल कोणतेही लेखी दस्तऐवज किंवा तोंडी किंवा कोर्टांत कोणतेही प्रकारें काम केल्यास तें रद्द समजून मी मुळींच जबाबदार राहणार नाहीं.

तसेंच तूं माझे आईला स्त्रीची जात तिजला फंद फितूर देऊन कुलमुखत्यारपत्र घेतले आहेस तें मी हुकूमाचे आधारें आज रोजीं या नोटीशीनें रद्द केले आहे. कळावें ता० ९-८-१९१९ इ.

द० दत्तात्रय श्रीधर ब्राह्मण रा० तळप

सही

प्रभु वा। येमजी इनामदार

निशाणी मोहर

नो० नं० ३२५

## नोटीस

सरस्वती मर्द गोविंदा मुलतान रा. डोंगरगांव ता० बाळापूर

ईस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझे मुलाची मोहतराची बायको असून तूं आज पर्यंत माझे येथें राहत होतीस. सरासरी आठनव महिने झाले तूं आपले आईबापाचे घरीं दिवाळी करतां ह्मणून गेलीस त्यावेळेस तुझे अंगावर सोनें वजन तोळे ६० व चांदी वजन तोळे ४०० चारशे आहे. तुला मी वागविण्यास तयार असतांना तूं लोकांच्या भुलथापीत येऊन तूं माझे घरीं राहण्यास येण्यास इनकार करतेस. व दागदागीन्याची अफरातफर करण्याचे विचारांत आहेस. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे घरीं राहण्यास यावे. व ते दागदागीने ही घेऊन यावे. त्या दागीन्याची अफरातफर केल्यास तुजवर योग्य तजवीज केली जाईल. तुला कोणत्याही तऱ्हेची खर्चाकरिता पैशाची अडचण पडल्यास मी तुला देण्यास तयार आहे. कळावें.

सही

कृष्णाजी वा। दर्याजी मुलतान डोंगरगांव दस्तुर तुकाराम गुमास्ते

डोंगरगाव

नो० नं० ३२७

## नोटीस

नोटीस बेशमी गणपत व. विठोबा खडकर कुणबी रा. निमकर्दा व भुकाई मर्द बापूजी कुणबी रा० आलेगांव ता० बाळापूर

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, जनाबाई ही तुमची मुलगी असून माझी लग्नाची बायको आहे. आणि भुकाई ही तुमची बहिण आहे. भुकाई यानीं माझी बायको जनी इजला माझे घरून ता० ४।७।१९१९ रोजीं कोणासही न विचारतां तिचे अंगावरील दागिन्यांसह घेऊन गेली. ते दागिने येणें प्रमाणें:—

| | |
|---|---|
| चांदीचे तोडे वजन तोळे | ८० |
| पायजीबा चांदीच्या " " | ४० |
| कंठी चांदीची वजन तोळे | २० |
| पुतळ्या गाठलें सोन्याचे वजन तोळे | ४ |
| पाटल्या सोन्याच्या वजन तोळे | ८ |
| नथ मोत्यांसह वजन मासे | ९ |

येणें प्रमाणें अजमासे चारशे सवा चारशे रुपये किंमतीचे दागिने तिच्या अंगावर होते. तुह्मी तिला दुसरा घरठाव करून देण्याच्या विचारांत आहांत असें कळतें. ही गोष्ट मला बिलकुल पसंत नाहीं. वरील प्रमाणें तिच्या अंगावर असलेल्यादागिन्यांबद्दल व नकळत तिला काढून नेल्याबद्दल तुह्मा दोघा बहीणभावास जबाबदार धरलें जाईल. मी तिला वागविण्यास कबूल आहे. तेव्हां पुढें मागें तिच्या खावटीबद्दल वगैरे पैसे मागाल तर मी त्याबद्दल जबाबदार रहाणार नाहीं. ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसाचे आंत

माझ्या बायकोस तिच्या अंगावरील सर्व दागदागिन्यांसह आणून घालावी. तसें करण्यास चुकाल तर तुह्मा उभयतां बहिण भावावर फौजदारी व दिवाणी कोर्टांत दावा करीन. व या नोटिशीचा व दाव्याचा सर्व खर्च तुह्मांकडून भरून घेईन. कळावें. ता० ६-८ १९१५

सही

वामन अवधूत रा० आलेगांव द. खु.

नो० नं० ३२८

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण माधव पांडे मुक्काम मौजे कौठ ता० वाशीम पो० रिसवड जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची पुतणी नामे मथुरा ही माझी बायको असून आपले वडील बंधु तात्या साहेब हे आजारी आहेत त्यांचे भेटीकारितां मुद्दाम आपण गणपतराव पांडे पेनबोरीकर यांस मुळ पाठविलें. गणपतराव यांनीं दिपवाळी झाल्यावर मी स्वतः जातीनें माझी बायको मथुरा हिजला आणून घालीन असें सांगितलें वरून मी रवाना केलें. दिपवाळी झाल्यावर बरेच दिवसानंतर मी येथून लक्ष्मण चेके आरेगांवकर याजला मूळ पाठविलें त्याज बरोबर ही आपण रवाना केलें नाहीं. नंतर लगेच मी स्वतः गाडी मनुष्य घेऊन मूळ आलो ते वेळीं आपण गांवीं नव्हते आपले वडील बंधु तात्या साहेब हे गावीं होते. त्यांनीं माझी बायको रवाना न करितां जे बोलूं नये ते वाईट शद्ब बोलून माझे मनास फारच दुखविलें पुढें आपण नजरा न विचारता माझे बायकोस तीर्थ यात्रेस घेऊन गेले हाही अपशद्ब आपणावर आहे. तसेंच परस्परेकडून ऐकण्यांत येते कीं, तुमची पुतणी हिचे व आपले ह्मणणे आहे कीं, तुह्मी आपले आईबापांतून विभक्त राहाल तर आह्मी रवाना करूं नाहींपेक्षां आह्मी रवाना करित नाहीं. सबब या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, माझे आई बाप वृद्ध असून भाऊ ही पंगु आहे. मी त्यांच्यांतून निराळा राहूं इच्छित नाहीं, तरी आपणास नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत ह्मटलेल्या दोषाचा निकाल करून माझे बायकोस स्वतः माझे घरीं आणून घालावे तसें न केल्यास तिचे अन्न वस्त्राबद्दल व कर्ज वगैरे काढल्यास कोणतेही प्रकारचा मी जबाबदार राहणार नाहीं. व मी दुसरें लग्न करण्यास मोकळा होईन कळावें ता० २९-७-१५ इ.

सही

बाळकृष्ण अंबादास पांडे रा० आरेगांव पो. व त. मेहेकर

दस्तुर खुद्द

नो० नं० ३२९

## नोटिशीचें उत्तर,

अमृता वल्द बापुजी पाटील रा मनबद ता. आकोट.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे पक्षकार गणपत वल्द पताजी पाथरकर रा. मनबद ता. आकोट यास तारीख १९ जुलाई १९१५ च्या वऱ्हाड-समाचार पत्रांतून नोटीस दिली ती पोहोचली. सदरहु नोटिशात तुह्मी दर्शविलेला मजकूर निव्वळ खोटा आहे. मोतीराम योग्य रीतीनें दत्तक घेऊन त्यांचे नांव आनंदा तुह्मी स्वतः ठेविलें. असे असून आतां त्याचें दत्तक पत्र रद्द करण्यास तयार होता हें तुमचें वर्तन बेकायदेशीर आहे. तुमच्या जींदगी संबंधानें कोणत्याही तऱ्हेची अफरात फर आमचे पक्षकार करीत नसून तुमचेच वर्तन अज्ञान मुलाच्या हिताविरुद्ध चलू आहे. कळावें ता. ११।८।१९१५ इ.

सही.

गणपत वा। पताजी पाथरकार ह्याचे तर्फे वकील रामचंद्र विष्णु महाजनी

नो. नं. ३३०

---

# वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुद्ध ६ शके १८३७

---

## मितव्ययितेचा उपदेश.

काळ हा मोठा सुधारक आहे असें बेकननें आपल्या एका निबंधांत ह्मटलें आहे. खरें पाहिलें तर तो नुसता सुधारकच नाहीं, तर उत्तम गुरुही आहे. मनुष्याच्या अंगीं ज्या सवयी जन्मोजन्मीं जडलेल्या आहेत, त्यासुद्धां एका विकट प्रसंगामुळें सुटल्याचीं उदाहरणें आहेत. इंग्लंडांतल्या पुष्कळ मद्यपी लोकांना सध्याच्या युद्धप्रसंगीं आपलें व्यसन सोडावें लागलें. इंग्लंडचें दुसरें एक व्यसन—अमितव्यय—ही याच प्रसंगानें सुटेल असा रंग दिसतो. इंग्लंडचे लोक उद्योगाच्या व कांहीं अंशीं नशिबाच्या जोरावर श्रीमान् होऊन बसले आहेत. पैशाची त्यांना पर्वा वाटत नाहीं. हिंदुस्थानांतल्या लोकांना एक आणा खर्चतांना जेथें मनाला कष्ट होतात तेथें इंग्लंडांत एक पौंड खर्चण्यास सुद्धां दिक्कत वाटत नाहीं. पण सध्याच्या लढाईंत पाण्यासारखा पैसा खर्च झाल्यामुळें आतां त्यांचे डोळे उघडले आहेत. रोजचा ४॥ कोट रुपयांचा खर्च असें एक वर्ष चाललें, पण पुढें आणखी किती दिवस चालणार ? इतका पैसा कोठून आणणार ? लढाई तर चालू ठेविलीच पाहिजे. तेव्हां आतां विलायतेच्या लोकांना हात राखून खर्च करण्याचा उपदेश तेथील शास्त्रज्ञ करूं लागले आहेत. इंग्लंडच्या आरमारखात्याचे भूतपूर्व प्रधान व शेतकी खात्याचे सध्याचे मुख्य मंत्री लॉर्ड मेल्बोर्न यांनीं नुकतेच इंग्लंडच्या सांपत्तिक स्थितीचें उत्कृष्ट चित्र आपल्या एका भाषणाच्या द्वारें जगापुढें मांडिलें. ते ह्मणाले—जर्मनीच्या पानबुड्या बोटींचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे व तो तसाच वाढत राहणार. कारण कीं ते लोक पानबुड्या बोटी ( सबमरीन ) बांधण्याचे कामीं फार हुशार आहेत. त्यांच्यासारख्या उत्तम सबमरीन बोटी दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राजवळ नाहींत. जर्मनींत या बोटी तयार करण्यांत कित्येक कारखाने रात्रंदिवस गुंतले आहेत. इंग्लंडच्या चारी बाजूंस मुख्यमुख्य नाक्यांवर या बोटी ठेवून विलायतेच्या जहाजांना बाहेर जाऊं द्यावयाचें नाहीं, किंवा बाहेरच्या जहाजांना विलायतचा किनारा गाठूं द्यावयाचा नाहीं, असा कोंडमारा करून विलायतचा सगळा व्यापार बंद करण्याचा जर्मनीचा इरादा आहे. हें खरोखर घडून आल्यास इंग्लंडची काय स्थिति होईल तें सांगणें कठीण आहे. बाहेरून खाद्यसामुग्री न आल्यास इंग्लंडला आपल्या देशांत जें कांहीं थोडें बहुत धान्य पिकतें त्यावरच निर्वाह करून राहण्याची पाळी येईल. येत्या हिंवाळ्यांत जर्मन बोटींचा गराडा विलायते भोंवतीं पडेल असा सुमार आहे. या भाषणावर टीका करतांना इंग्लंडचें अर्थशास्त्रविषयक पत्र ‘ स्टयाटिस्ट ’ हें ह्मणतें कीं यासंबंधांत लॉर्ड मेल्बोर्न यांनीं उघड करून दाखविलेल्या गोष्टींखेरीज आणखी कांहीं गुह्य गोष्टी आहेत. या युद्धामुळें इंग्लंडचाच एकट्याचा नव्हे तर बहुतेक साऱ्या जगाचा व्यापार व धनव्यवसाय बहुतेक बंद पडला आहे. हुंड्यापुरज्यांचा व्यवहार तर बंदच आहे. जो कांहीं व्यापार चालतो तो सगळा रोकड नाण्याचा. नगदी शिवाय गोष्ट नाहीं. अशावेळीं जितका माल परदेशाहून येईल तेवढ्याच्या मोबदल्यांत विलायतेंतलें चांदी— सोनें बाहेर जाईल. चांदी सोनें बाहेर जाण्यानें युद्धसामुग्री तयार करण्याचे कामीं मोठाच व्यत्यय येणार आहे, व त्यामुळें लढाईतल्या हारजीतीवर परिणाम घडल्याशिवाय राहणार नाहीं. यासाठीं अशाप्रसंगीं जितकें चांदीसोनें संगृहित करतां येईल तेवढें करणें हे प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे. अशावेळीं परदेशी माल जितका कमी मागवितां येईल तितका मागविला पाहिजे. नाहींतर आत्मरक्षण करणें कठीण जाईल. एकोनॉमिस्ट नांवाचें दुसरें एक अर्थशास्त्रविषयक इंग्रजी पत्र आहे. तेंही असाच उपदेश पण निराळ्या तऱ्हेनें करीत आहे. तें पत्र ह्मणतें कीं जे लोक जितक्या कमी खर्चांत राहूं शकतात, व आपलें आरोग्य संभाळून धनसंचय करतात, ते लोक आत्मरक्षणाचे कामीं यशस्वी होतात. रोजच्या कामासाठीं लागणाऱ्या पदार्थांकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग येणें ही लाजिरवाणी गोष्ट आहे— नाहीं, तें पाप आहे. इंग्लंडचे लोक रोटी, मांस, अंडीं, लोणी वगैरे खाद्य पदार्थांकारितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात आहेत. युद्ध सुरू होण्यापूर्वी हे जिन्नस डेनमार्क किंवा हालंड या देशांतून विलायतेस जात. पण आतां तो पुरवठा बंद झाला आहे. समरांगणीं गेलेल्या सैनिकांना तर खाद्यसामुग्रीचा पुरवठा केलाच पाहिजे. अगोदर त्यांच्या पोटाची तजवीज करून मग विलायतेंतल्या लोकांनीं आपल्या पोटाची तजवीज पाहिली पाहिजे. यासाठीं अशावेळीं इंग्लंडच्या लोकांनीं आपले विलासोपभोग सोडून स्वदेशी वस्तूवर निर्वाह करून राहिलें पाहिजे, व जितकी करतां येईल तेवढी काटकसर करून धनसंचय केला पाहिजे. जोंपर्यंत आपल्या देशचा व्यापार बंद आहे, जोंपर्यंत परदेशाहून रोकड पैसा आपल्या देशांत येत नाहीं, जोंपर्यंत आपला माल पानबुड्या बोटींच्या भीतीनें बाहेर जाऊं शकत नाहीं, तोंपर्यंत इंग्लंडच्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं मितव्ययीपणानेंच राहिलें पाहिजे. एरव्हीं त्यांना आत्मरक्षण करणें शक्य नाहीं.

इंग्लंडची सांप्रतची अडचणीची स्थिति प्रसंगवशात् आलेली आहे व ती थोडा काळ पर्यंत टिकणारी आहे. तरी त्या लोकांना मितव्ययाची केवढी अवश्यकता वाटत आहे! पण आमचा हिंदुस्थान देश कायमचा दरिद्री, आणि रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या आगपेट्या, राकेल, मेणबत्या, कांचेच्या चिमण्या वगैरे वस्तूंसाठीं दुसऱ्या देशाच्या तोंडाकडे पाहणारा असतां ही आमच्यांतल्या शहाण्यासुर्त्या लोकांना मितव्ययी राहण्याची अवश्यकता वाटत नाहीं, उलट कॉलर, नेकटाय, सोडावाटर, सेंट, वगैरे विलासाचे अतएव अनवश्यक असे परदेशी पदार्थ वापरण्याची चटक ते दिवसेंदिवस जास्त लावून घेत आहेत. पूर्वींच्या साध्या राहणी कायम ठेवणारास ते मेषपात्र, गबाळ, मामळभट अशीं नांवें मात्र ठेवण्यास तयार होतात, तेव्हां त्यांच्या शहापणाची किती तारीफ करावी ! इंग्लंडांत लॉर्ड मेल्बोर्न सारखे उच्च प्रतीचे अधिकारी व स्टयाटिस्ट, एकॉनमिस्ट सारखीं अर्थशास्त्रज्ञ पत्रें जो उपदेश इंग्लंडच्या लोकांना करीत आहेत, तशा उपदेशाची हिंदुस्थानाला कायमचीच अवश्यकता असतां तिकडे कोणाचें लक्ष जात नाहीं हें कशाचें चिन्ह समजावयाचें ?

---

## खरें नररत्न

अमेरिका देशास स्वातंत्र्याची प्राप्ति करून देणाऱ्या जॉर्ज वाशिंगटनाविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं स्वातंत्र्याकरितां आरंभिलेलें युद्ध यशस्वी रीतीनें संपतांच अमेरिकन लोकांनीं वॉशिंगटनला तुह्मीच आमचे राजे व्हा अशी अत्याग्रहाची विनंति केली होती. परंतु अमेरिकन लोकांनीं इंग्लंडपासून स्वातंत्र्य मिळवून एका व्यक्तीच्या गुलामगिरीखालीं राहावें ही कल्पनाच त्याला असह्य झाली व आयतें चाललेल्या राज्याचा लोभ न धरतां त्यानें त्या विनंतीचा अनादर केला. प्राचीनकाळच्या ग्रीस व रोम या राष्ट्रांच्या इतिहासांत अशीं उज्ज्वल स्वार्थत्यागाचीं अनेक उदाहरणें आहेत. पण तीं सुवर्णयुगांतलीं ह्मणून लोकांना तीं खरीं वाटत नाहींत. गौतमबुद्धानें राज्यत्याग केला होता. पण गौतमबुद्ध अशी व्यक्तिच कोणी झाली नाहीं असा आक्षेप घेण्यांत येत असतो. ह्मणून सांप्रतच्या काळांतलें असें एखादें उदाहरण देणें अवश्य आहे. सध्याचे चीनचे प्रेसिडेंट युआन शिकाई हें असें अप्रतिम नररत्न आहे. चीनचा राजवंश [illegible] वरून काढून तो देश लोकसत्ताक करण्याचें श्रेय त्यांनीं

घेतलें, व तेव्हांपासून आज पांच चार वर्षें ते प्रेसिडेंट ह्मणून त्या देशाचा राज्य कारभार करीत आहेत. तथापि त्यांना राजपद घेण्याची महत्त्वाकांक्षा आहे असें लोक समजत आहेत. या भ्रमाचें निरसन त्यांनीं नुकतेंच सेनापति फत्स्युचांग यांच्याशीं झालेल्या खाजगी संभाषणांत केलें. तुमचा राजपदाचा स्वीकार करण्याची इच्छा असल्यास दक्षिण भागांतले लोक त्या गोष्टीला अनुकूळ होतील असें सेनापतीनें ह्मटल्यावरोबर युआन शिकाई रागानें ह्मणाले 'एकूण तुमचा सुद्धां माझ्या महत्त्वाकांक्षे संबंधानें गैरसमज दिसतो ! मी तुह्मांस निक्षुन सांगतों कीं तसा कांहीं एक प्रकार नाहीं. मी माझ्या मुलांना विलायतेस शिक्षणासाठीं पाठविलें तेव्हांच मी त्यांना असें ही सांगितलें कीं आपणांस राहण्यासाठीं विलायतेंतच एखादें सोईवार घर व शेतीवाडी विकत घ्या. मी राजपद घ्यावें अशी चिनी लोकांनीं इच्छा दर्शवितांच हा देश सोडून मी कोठेंतरी चालता होईन आणि तेथें आयुष्याचे राहिलेले दिवस कसें तरी काढीन; याचें नांव स्वार्थत्याग! अशीं नररत्नें ज्या राष्ट्रांत निर्माण होतात तींच राष्ट्रें उदयास येतात. हिंदुस्थानांत असे पुरुष निर्माण होत होते, तोंपर्यंत त्याचें वैभव टिकलें. पण पुढें कवडीच्या स्वार्थाकरितां देशाचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान करण्यास तयार होणारे व मनुष्यजातीस कलंक लावणारे नरपशु निर्माण होऊं लागले, तेव्हां हा देश अवनतीच्या तळाशीं गेला, यांत काय आश्चर्य !

## सन्माननीयांचा सन्मान.

हिंदुस्थानांतल्या सगळ्या युनिव्हर्सिट्यांत मुंबई युनिव्हर्सिटी सन्माननीयांचा सन्मान करण्यांत मागें आहे. ही युनिव्हर्सिटी स्थापन होऊन ६० वर्षें झालीं, पण येवढ्या काळांत तिच्या हातांत असलेली सर्वांत उच्च अशी एल. एल. डी. ची पदवी तिनें फक्त सात जणांस दिली आहे व या सातांत एकच देशी गृहस्थ सर रामकृष्ण भांडारकर हे आहेत. बाकीचे सहाही युरोपियन आहेत. परलोकवासी रावसाहेब रानडे यांच्या सारखे पदवीधर मुकुटमणि सुद्धां या युनिव्हर्सिटीला एल. एल. डी. च्या पदवीला पात्र दिसले नाहींत! पण ही मागची चूक सुधारण्याचा आतां तरी तिनें उपक्रम केलेला पाहून कांहीं समाधान वाटतें. गेल्या आठवड्यांत हिंदुस्थानचे पितामह मि. दादाभाई नौरोजी व त्यांचे चेले आणि स्थानिकस्वराज्याचे सुकर्णधार सर फेरोजशहा मेथा या दोघांना तिनें एल. एल. डी चा सर्वोच्च मान देण्याचा ठराव मंजूर केला आहे. मि. दादाभाई यांना येत्या सपटेंबरांत नव्वदावें वर्ष लागेल, व सर फेरोजशहा यांचीं याच महिन्यांत ७० वर्षें पूर्ण झालीं. त्यांना मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीधर होऊन यंदाच पंनास वर्षें होत आहेत. तेव्हां त्यांच्या पदवी दानाच्या ज्युबिलीच्या निमित्तानें या दोघांना ही मुंबई युनिव्हर्सिटीनें एल एल डी चा सन्मान अर्पण करण्याचें ठरविलें ही फार उत्तम गोष्ट आहे. वस्तुतः मि. दादाभाई हें नांव आह्मां भारतीयांस जितकें गोड वाटतें तितकें डा. दादाभाई हें नांव लागणार नाहीं, किंवा त्यापासून त्यांची सन्मानाविषयींची पात्रता किंवा लोकप्रियता वाढणार आहे असेंही नाहीं. तथापि युनिव्हर्सिटीनें आपलें कर्तव्य उशिरानें कां होईना, पण बजाविलें असें होईल. मि. दादाभाई हे नुसत्या मुंबईचेच नव्हे तर अखिल भारतवर्षाचे पितामह असल्यानें कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद, वगैरे बाकीच्या हिंदी युनिव्हर्सिट्यांनीं हा त्यांना असाच मान द्यावयास पाहिजे. तो त्या केव्हां देणार?

## विचित्र निष्ठुरता!

हिंदुस्थानांतल्या कित्येक म्याजिस्ट्रेटांच्या अंगीं आश्चर्य वाटण्यासारखा भूतदया व सारासार विचार या गुणांचा अभाव दिसून येतो या विषयींचें ताजें उदाहरण कोणास पाहणें असेल तर तें मुंबई इलाख्यांतील तुरुंगासंबंधाच्या यंदाच्या रिपोर्टांत पाहण्यास मिळेल. एका ११ वर्षाच्या मुलीला आपलें निर्वाहाचें कांहीं साधन दाखवितां आलें नाहीं, ह्मणून माजिस्ट्रेटानें तिला ६ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. दुसऱ्या एका माजिस्ट्रेटानें एका ८ वर्षाच्या मुलाला त्याच्या नातलगाची कांहीं वस्तु चोरल्याबदल एक महिन्याची सक्त मजुरी व १० रुपये दंडाची शिक्षा दिली. ही शिक्षा देतांना येवढ्या मुलानें दंडाची रकम कोठून आणावयाची किंवा सक्तमजुरीची शिक्षा किती कडक असते या गोष्टीचा कांहींच विचार केलेला दिसत नाहीं! भूतदया तर राहोच, पण सामान्य व्यवहार ज्ञान सुद्धां नाहीं अशीं माणसें म्याजिस्ट्रेटासारख्या जबाबदारीच्या कामावर कशीं अधिष्ठित होतात व तीं त्या कामाला कशीं योग्य समजलीं जातात हें नवलच आहे. एखाद्या युरोपियनाच्या हातून देशी माणसाची हत्या झाली तरी त्याला हलक्या दंडाच्या शिक्षेवर सोडणारे व उलट ८ वर्षाच्या अर्भकाला यत्कश्चित् चोरीच्या गुन्ह्याकरितां सक्त मजुरीची शिक्षा सांगणारे असे दोन्ही प्रकारचे म्याजिस्ट्रेटाचे नमुने सरकारच्या संग्रहास आहेत व ते दोन्ही सारखेच निंदास्पद होत. सरकार अशा म्याजिस्ट्रेटांची कानउघाडणी करीत असेलच; पण ती बाहेर आल्यास इतर म्याजिस्ट्रेटांस त्यापासून कांहीं धडा तरी शिकतां येईल.

## युद्धाचा रंग.

गेल्या आठवड्यांत रशियानें वार्सा सोडून देण्याचें निश्चित केल्यापासून तत्संबंधानें निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे तर्क चालले होते. एका बाबतींत मात्र सर्वांचें एकमत दिसलें, आणि ती गोष्ट ही कीं वार्सा सोडावा लागेल ह्मणून रशिया कमकुवत झाला आहे असें अनुमान काढण्यास बिलकुल जागा नाहीं. कारण वार्सा सोडण्याचें ठरल्याविषयींची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर ही कित्येक दिवस तेथें निकराची लढाई चाललीच आहे व रशिया मोठ्या शिताफीनें आणि शिकस्तीनें आपली बाजू संभाळून राहिला आहे. वार्सा शहर सोडलें तें भयानें एकाएकीं सोडलें नसून तेथील सरकार व लोक आपली सगळी चीजवस्त बरोबर घेऊन बाहेर पडले, व जातांना त्यांनीं त्या शहराचे पूल वगैरे जीं दळणवळणाच्या सोयीचीं साधनें होतीं तीं शत्रूंच्या हातीं जाऊं नयेत ह्मणून नष्ट करून टाकिलीं. त्यामुळें जर्मन लोकांना लूट मिळण्याची तर काय, पण धातूचा एखादा तुकडा ही मिळण्याचा संभव राहिला नाहीं. वार्सावरील ताबा सोडल्यापासून रशियन लोकांच्या मनाला दुःख वाटणें स्वाभाविक आहे, पण चालू युद्धाचा शेवट यशस्वी रीतीनें होण्यासाठीं तो स्वार्थत्याग त्यांनीं खुषीनेंच पतकरला आहे. वार्सा सोडल्याबरोबर जर्मन बादशहाकडून रशियाशीं तहाचें बोलणें सुरू झाल्याचें वर्तमान येतें, व रशियानें जर्मनीची तहाची गोष्ट झिडकारल्याचें ही त्याबरोबर कळतें या गोष्टी वरील विधानास पुष्टि देणाऱ्या आहेत. राशियानें आपल्या दोस्त राष्ट्रांना सोडून तह करण्यास कबूल व्हावें आणि दोस्त राष्ट्रांशीं केलेल्या करारनाम्याला हरताळ लावावा अशी जर्मनीची इच्छा असली तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, करारनामे ह्मणजे कागदाचे तुकडे हवे तेव्हां भिरकावून देण्याचें जर्मनीच्या अंगवळणीं पडलें आहे, आणि त्यांत कांहीं गैर आहे असें न वाटण्याइतकी नीतिभ्रष्टता जर्मनीचे ठायीं आली आहे. पण राशियाची गोष्ट तशी नाहीं विशेषतः राशियन बादशहाला आपल्या शब्दाची किंमत पूर्णपणें कळत आहे, व त्यामुळेंच त्या राष्ट्रांचें नैतिक वजन सगळ्या युरोपखंडांत आहे तेव्हां राशियाला दोस्त राष्ट्रांतून फोडून त्याच्याशीं वेगळा तह करतां येईल हा जर्मन केसरचा निवळ भ्रम आहे, आणि हा भ्रमाचा भोपळा फोडून पाहण्यानें जर्मनीनें मात्र आपल्या कौटिल्याची व दुर्बलतेची साक्ष स्वतः देण्यापलीकडे दुसरें कांहीं साधलें नाहीं.

पश्चिमेकडील रणक्षेत्रांत आर्गोन प्रांतांत जर्मनीचे क्राउन प्रिन्स ता. ८ रोजीं फ्रेंच सैन्याची फळी फोडून गेले, पण त्यांना लवकरच मागें फिरावें लागलें. तसेंच व्हासजेस येथें ही जर्मन लोकांचे निकराचे हल्ले तितक्याच आवेशानें मागें परतविण्यांत आले. यांत जर्मन लोकांची बेसुमार हानि झाली, जर्मन लोकांना पळतां पळतां मुष्किल झाली, व तारांच्या जाळ्यांत अडकून सुमारें शंभर जर्मन मेल्याचें आढळून आलें. इटली आस्ट्रियाला शेराला सव्वाशेर भेटला असून तो आस्ट्रियाची डाळ मुळींच शिजूं देत नाहीं; प्रत्येक हल्ल्याबरोबर आस्ट्रियाची पीछेहाट व हजारों आस्ट्रियनांना कैदेचें सुख अनुभवावें लागत आहे. तुर्क लोक तर युद्धाला कंटाळलेले दिसत आहेत. एनव्हर पातशहा व जर्मन सेनापति यांचें जुळत नसल्यामुळें पातशहानें आपली फौज काढून आणिली आहे. व जर्मनीशीं सख्य करून इंग्रजासारख्या उदार व न्यायी मित्राशीं द्रोह केल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. अगोदर बुद्धि जाते व मग भांडवल जातें हें ह्मण तुर्कस्थाननें खरी केली आहे.

प्रस्तुत युद्धरूपी वणव्याच्या ज्वाळांनीं हालंड, स्वीडन, वगैरे राष्ट्रें होरपळलीं जात आहेत. तथापि प्रत्यक्ष ज्वाळांचा संचार तेथें अद्याप झाला नाहीं. तथापि शेजारच्या घराला आग लागली असतां घरधनी स्वस्थ बसेल ही गोष्ट शक्य नाहीं. स्वीडन युद्धाची तयारी करून बसला आहे अशी बातमी आतां आली आहे. आस्ट्रियानें त्या राष्ट्राजवळ कांहीं डाक्तरांची मदत मागितली होती, पण 'आह्मांलाच स्वतःला त्यांची केव्हां जरूर लागेल याचा नेम सांगता येत नाहीं' असा जबाब त्यानें दिला. स्वीडन युद्धांत सामील झालें, तर कोणत्या पक्षाला मिळणार हें अद्याप बाहेर आलें नाहीं. तथापि त्याचें हित दोस्त राष्ट्रांना मिळण्यांतच आहे हें त्या देशाचा इतिहास व भूगोल यांचें ज्ञान ज्यांस आहे ते सहज सांगूं शकतील.

## वार्सा—लढाई.

( सरकारी बाजूचा अभिप्राय. )

वार्सा खालीं केलें आहे व जर्मनीच्या हवालीं झाला आहे तेव्हां संयुक्त राष्ट्रांचा पाडाव झाला असे वितर्क चालतात ह्मणून त्या विचार सरणीचा उच्छेद करण्यासाठीं आह्मी सरकारी बाजूचा अभिप्राय मुद्दाम खालीं प्रसिद्ध करीत आहोः—

### वारसा घेण्याकरितां धडपड.

या आठवड्यांतील बातम्यांपैकीं सर्वांत चित्तवेधक बातमी ह्मणजे पूर्वेकडील रणक्षेत्रावरील होय. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत जवळ जवळ एक हजार मैल लांबीच्या रणक्षेत्रावर बहुतेक सर्व ठिकाणीं हल्लीं मोठ्या निकराची लढाई चालू आहे. वार्साच्या उत्तरेस प्रासनिझ येथें जर्मन व रशिया या दोहोंचीं सैन्यें समोरासमोर येऊन थडकलीं आहेत. जर्मनीनें राखून ठेविलेली नवी फौज आणविली व रशियन सैन्य 'नेरू' नदीच्या तीरावर जागा धरून बसण्याकरितां मागें हटलें. ही नेरू नदी प्रासनिझच्या पूर्वेकडून वहात जाऊन वार्साच्या उत्तरेस 'बग' नदीला मिळते. हल्लीं या शहराच्या आसपास निकराची लढाई चालू असून तें शहर हस्तगत करून घेण्याकरितां जर्मन लोक आटोकाट प्रयत्न करीत आहेत. युद्धाची रेषा कधीं इकडे तर कधीं तिकडे अशी बदलत जाते. केव्हां केव्हां रशियन जर्मनांना मागें रेटीत नेतात तर केव्हां केव्हां त्यांना स्वतःलाच मागें सरकावें लागतें. अखेर सरशी कोणाची होणार हे अद्याप अनिश्चितच आहे. पोलंडच्या आग्नेयीकडील भागांतही आस्ट्रिया व जर्मनीचीं सैन्यें पुढें सरकत आहेत. व्हिस्चुला व बग या दोन नद्यांमध्यें जोराची लढाई चालू आहे. बाल्टिक प्रांतांत 'शावली' नजीक लढाई अद्याप चाललीच आहे व तेथें रशियनांना पाय मागें घ्यावा लागला असून शत्रु पूर्वेकडे सरकत आहे.

### रशियनांच्या मागें हटण्याचें रहस्य.

आतां रशियन लोक जे एकसारखे मागें हटत चालले आहेत यांतील इंगित काय बरें असावें? शत्रूच्या विजयांची किंमत कमी लेखून ते जमेस न धरणें योग्य होणार नाहीं तरी त्याचें फाजील स्तोम न माजविण्याचीही आपणांस खबरदारी घेतली पाहि-

पोलिटिकल एजंट साहेबांनीं प्रतिबंध करणारा नियमच करून टाकला. पंचवीस वर्षांपूर्वी पो. ए. साहेबांस असा मनाई हुकुम करण्यास कदाचित् योग्य कारणें असतील. त्या वेळेस आपली जबाबदारी ओळखून पत्र काढणारे संपादक ही दुर्लभ असतील, किंवा वर्तमानपत्रांतल्या टीकेचा शांतपणें विचार करण्याइतके खंबीर मनाच्या अधिकाऱ्यांची कदाचित् वाण असेल. पण आज पाव शतकानंतर सुद्धां तीच स्थिति कायम राहिली आहे काय ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जर असेल तर या पाव शतकांत शिक्षणाच्या योगानें लोकांची मनें सुसंस्कृत करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांकडून योग्य रीतीनें पार पडली नाहीं असें ह्मणावें लागेल. पण तसें ह्मणण्यास आह्मी तयार नाहीं. मध्यहिंदुस्थानांत उदार शिक्षण घेतलेले, व सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे बाबींचा स्वतंत्ररीतीनें विचार करणारे अनेक पदवीधर अधिकारीमंडलांत व त्याच्या बाहेर ही आहेत. यांना विचारस्वातंत्र्याची चाड नाहीं किंवा त्यांच्या कृत्यांवर केलेली योग्य टिका त्यांना खपावयाची नाहीं असें आमची मनोदेवता सांगत नाहीं. निदान वर्तमानपत्र काढण्यास परवानगी देऊन अनुभव पाहण्यास तरी हरकत नाहीं, असा काळ आतां आला आहे. या प्रांतांत ग्वालेरचे महाराज, व इंदूर आणि रतलाम येथील महाराज यांच्यासारखे सुसंस्कृत मनाचे व विचारस्वातंत्र्याच्या उच्च वातावरणांत संचार केलेले संस्थानिक असतां त्यांनीं लोकांत शिक्षणाचा व विचारस्वातंत्र्याचा प्रसार करणारें एखादें वर्तमानपत्र काढण्यास परवानगी न देण्याइतका मनाचा संकुचितपणा कां ठेवावा तें कळत नाहीं. इंदुरास वर्तमानपत्र काढण्याची परवानगी सर नारायणराव चंदावरकर यांच्या कारकीर्दीत एका गृहस्थानें मागितली होती. ते दिवाण ह्मणून आणखी कांहीं दिवस राहिले असते तर ती कदाचित् मिळाली ही असती. पण इंदूरच्या प्रजेच्या दुर्दैवानें तसें न घडल्यामुळें वर्तमानपत्र स्थापित होण्याचा सुसमय लांबणीवर पडला, आणि पुढें तें प्रकरण तितकेंच थांबलें असें ऐकतों. ग्वालेरसंस्थानांत खुद्द निमसरकारी असें जयाजीप्रताप नांवाचें वर्तमानपत्र आहे व तें करीत असलेल्या लोकशिक्षणाच्या महत्त्वाच्या कार्यास महाराजाकडून उत्तम साह्य ही होत आहे, याबद्दल महाराजांस आह्मी धन्यवाद देतों. या बाबतींत इंदूर ग्वालेरीचें लवकरच अनुकरण करील व वर्तमानपत्राच्या अभावाचा कलंक दूर करण्याचें श्रेय इंदूरचे महाराज घेतील अशी आह्मी आशा करतों.

## मुलांच्या सद्गुणांचें कौतुक.

मूल हें भावी पिढीचा जनक असतें अशी इंग्रजींत ह्मण आहे, आणि ती अनुभवसिद्ध आहे. मुलांचे गुणांना प्रोत्साहन न मिळाल्यामुळें पुढें तीं शेळपट होतात, येवढी गोष्ट जर आमच्या लोकांना कळती, तर मुलांचे जे अपूर्व गुण कित्येक वेळां दिसतात, त्यांना प्रोत्साहन मिळून जिकडे तिकडे उत्कृष्ट नागरिक दिसूं लागले असते. विलायतेंत या युद्धाच्या प्रसंगीं जीं मुलें स्वदेशाविषयीं उज्ज्वल अभिमान व स्वार्थत्यागाविषयींची तयारी दाखवित आहेत, त्यांच्या कृत्यांना लंडन टाइम्स सारख्या पत्रांत सुद्धां प्रसिद्धी मिळते. परवा एका शाळेंतल्या मुलींनीं आपणांस मिळालेलीं सगळीं बक्षीसें वॉर फंडाला देऊन टाकल्याची गोष्ट विलायतेंतल्या बहुतेक ठळक पत्रांतून आली आहे. आमचेकडे हें काम ‘आनंद’ कर्त्याकडे सोपवून बाकीचे संपादक स्वस्थ बसतात. हा शोचनीय प्रकार बंद झाला पाहिजे. ‘आनंदा’ च्या ताज्या अंकांत ‘शूर मुलगे’ या मथळ्याखालीं पंजाबांतल्या दाघा मुलांची गोष्ट दिली आहे. ती सर्व पालकांनीं वाचून मुलांच्या मनांत बिंबेल अशा रीतीनें त्यांना समजावून दिली पाहिजे. ‘आनंदां’तून अशा गोष्टी वरचेवर येत असतात हें येथें सांगणें अवश्य आहे.

## अस्पृश्यवर्गांचा अभ्युदय.

अस्पृश्य वर्गाविषयीं हिंदुसमाजानें जो अन्याय आजपर्यंत केला आह तो दूर करून त्या वर्गाला शिक्षणाच्याद्वारें उन्नतीस आणणें व त्याला इतर जातींच्या बरोबरीनें हक्क देणें हें त्या समाजाचें प्रथम कर्तव्य आहे यांत शंका नाहीं. या संबंधानें जी चळवळ सुरूं आहे, तिला प्रत्येक सुशिक्षितानें हातभार लावला पाहिजे. या कामीं सरकारच्या साह्याची जरूर लागेल तेथें तें देण्यास आज अधिकारी तयार आहेतच, व नुकतेंच शिक्षणखात्याचे भावी मेंबर सर शंकरन् नायर यांनीं ही आपल्या हातीं अधिकार आल्यावर आपण या वर्गाच्या अभ्युदयासाठीं मनःपूर्वक झटण्याचें अभिवचन नुकतेंच एका भाषणांत दिलें आहे. दोघांचें सहकारित्व झाल्यावर हा अभ्युदयाचा काळ बराच अलीकडे ओढला जाईल अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

## शुभ मास

आगस्ट महिना हा हिंदुस्थानाला अत्यंत शुभमास असावा असें दिसतें. कांग्रेसचे जनक मि. ह्यूम, मुंबईचे ‘सिंह’ ही योग्य पदवी धारण करणारे व सार्वजनिक कामें आज साठ वर्ष सतत नेटानें करून आपली छाप जनता व सरकारी अधिकारी या दोघांवर ही उत्तम प्रकारें बसविणारे सर फेरोजशहा मेथा, व त्याचप्रमाणें सगळ्या महाराष्ट्राला— किंबहुना— अखिल भरतखंडाला आपल्या कृत्यांनीं जागृत करून सोडणारे र. टिळक या तीन राष्ट्रपुरुषांचा जन्म या आगस्ट महिन्यांतच झाला. तिघांच्याही जन्मदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या त्यांच्या भक्तांनीं उत्सव केले. अशा उत्सवांच्या वेळीं भक्तांनीं आपल्या ध्येय पुरुषांसंबंधानें चारित्रकारांच्या पद्धतीप्रमाणें थोडीशी अतिशयोक्तिपर भाषणें केलीं तरी तीं क्षम्य ह्मटलीं पाहिजेत. याचदृष्टीनें नागपुरास व पुण्यास रा. टिळकांच्या जन्मतिथीला जीं भाषणें झालीं त्यांचा विचार करणें योग्य आहे. भक्ति ह्मणजे प्रेमाची परा कोटी. ती आंधळी असल्याचें नवल काय?

## मनोरंजन.

एखाद्या वैद्यकविषयक पत्रांत इंजिनियरिंग बद्दलचे लेख येऊं लागले, किंवा लॉ रिपोर्टस् चे संपादक काव्य मीमांसेनें आपल्या मासिकाचीं पृष्ठें भरून काढूं लागले तर त्याचा हात धरण्याचा अधिकार त्यांच्या ग्राहकांस खास आहे. पण मुंबईचें मासिक मनोरंजनास मात्र हा नियम लागूं नाहीं असें दिसतें. हे मासिककार पुष्कळवेळां आपल्या उद्देशाच्या मर्यादेचा फारच अतिक्रम बेलाशक करीत असतात. आगष्टच्या ताज्या अंकांत त्यांनीं सुमारें २० पृष्ठें निवळ राजकीय विषयाच्या चर्चेला वाहिलीं आहेत! मनोरंजनाच्या वाचकांत प्रबुद्ध, अप्रबुद्ध स्त्रिया, पुरुष, व मुलें हीं आहेत. प्रांतिकपरिषद किंवा कांग्रेसचा समेट यासारख्या विषयांची गंभीर चर्चा वाचण्यासाठीं ते मनोरंजन खास घेत नाहींत. केवळ उच्चप्रतीचें मनोरंजन व्हावें येवढ्यासाठींच ते वर्षाचे ४ रुपये खर्चतात. असें असतां त्यांच्या पुढें राजकीय विषयाची किंवा जातिभेदासारख्या वादग्रस्त प्रश्नांची चर्चा मांडणें ह्मणजे खानावळवाल्यानें आपल्या गिऱ्हाइकापुढें सुग्रास अन्नाचें ताट ठेवण्याऐवजीं त्यांच्या हातीं एखादें लॉटरीचें तिकिट देण्यासारखें हास्यास्पद आहे. आपण विलायतेंतल्या उच्च प्रतीच्या मनोरंजनपर मासिकाच्या तोडीचें मासिक काढीत आहों अशी घमेंड वेळीं अवेळीं बोलून दाखविणारांना आपल्या कर्तव्याची येवढी जाणीव असूं नये हें आश्चर्य आहे!

मनोरंजनाच्या याच अंकांत ‘मधुप’ या लेखकानें मुलींना उपदेश करण्याच्या मिषानें हल्लींच्या स्त्रीशिक्षणपद्धतींतले दोष दाखविणारांवर यथेच्छ तोंडसुख घेतलें आहे. कां? तर उत्तम गृहिणी तयार करणें हा स्त्रीशिक्षणाचा उद्देश असला पाहिजे असें आक्षेपकांचें ह्मणणें आहे. बिचाऱ्या लेखकाला गृहिणी शद्बाच्या अर्थाची पूर्णव्याप्ति व त्या पदाचें गौरव याची योग्य कल्पना असती तर त्यानें येवढा जळफळाट निष्कारण खास केला नसता. तो समजतो कीं घरांत चुलीपाशीं बसून फूफू करणें येवढेंच गृहिणींचें कर्तव्य! अर्थात् येवढ्या कामासाठीं स्त्रियांना आपलें अमोलिक जीवन फुकट घालविणें ह्मणजे राष्ट्रशक्तीचा अपव्यय करणें आहे, आणि हें त्याचें ह्मणणें बरोबर आहे. पण हा त्याचा सगळा तर्क गृहिणी शद्बाच्या खऱ्या अर्थाविषयींच्या अज्ञानावर रचिला आहे येवढेंच त्यांत वाईट आहे. ज्या पाश्चात्य राष्ट्राचा कित्ता तो आपल्या डोळ्यांसमोर ठेवित आहे त्या राष्ट्रांत ही स्त्रीशिक्षणाचा उद्देश उत्तम गृहिणी तयार करणें असाच समजतात. (बोर्ड ऑफ फीमेल एज्युकेशनचें उद्देशपत्रक पृ. ६ ओळ ९ ८ पहा) त्यांच्या ‘गृहिणी’ शद्बांत नुसता स्वयंपाक करण्याचाच अंतर्भाव होत नसून गृहव्यवस्था, पतीस त्याच्या हरएक कामांत योग्य सल्ला मसलत देणें, मुलांचें शिक्षण, वगैरे अनेक गोष्टींचा समावेश होतो आमच्या आर्य संस्कृतीच्या दृष्टीनें ही गृहिणी शद्बाचा असाच व्यापक अर्थ आहे. ‘कार्येषु मंत्री’ हा एक गुण संस्कृत कवींनीं गृहिणींच्या ठायीं अवश्य मानिला आहे. पूर्वींच्या काळीं अरुंधतीसारख्या स्त्रिया गृहिणी ह्मणवून घेण्यांत भूषण मानीत होत्या. पण त्या कांहीं नुसत्या पोळपाट लाटण्याशींच व्यवहार करणाऱ्या नव्हत्या. तर उपनिषदासारख्या आध्यात्मिक ग्रंथांचें अध्ययन करून आपल्या पतीशीं बरोबरीच्या नात्यानें चर्चा करीत असत. ती गृहिणीची योग्यता ‘मधुपा’ च्या दृष्टीनें त्याज्य असेल, आणि स्त्रियांनीं गृहव्यवस्थेकडे ढुंकून न पाहतां लेक्चरें झोडावीं, किंवा स्त्रियांचे मेळे भरवांवे, किंवा संगीत नाटकांचा वार चुकूं देऊं नये, आणि असें होणें हेंच स्त्रीशिक्षणाचें अंतिम ध्येय अशी त्याची कल्पना असेल तर हें ध्येय मनोरंजनाच्या द्वारें आपल्या मुलींनीं ग्रहण करावें कीं नाहीं याचा महाराष्ट्रांतील पालकांस अवश्य विचार केला पाहिजे.

## युद्धाच्या बातम्या.

वार्सा शहराचा ताबा सोडतांना रशियानें त्याबद्दल दिलेलें कारण अगदीं योग्य होतें हें गेल्या आठवड्यांत आलेल्या युद्धाच्या बातम्यावरून ठरलें आहे. वार्सा सोडल्यानें रशियाला आपली बाजू मजबूत करण्याला व अधिक उत्साहानें लढण्याला संधी मिळाली आहे. गेल्या आठवड्यांत रशियानें शत्रूवर कित्येक ठिकाणीं चांगले जय मिळाविले व रशियन चिकाटी ही अस्वलाच्या पकडीप्रमाणें मोठी कठीण असते हें जर्मनाच्या अनुभवास आणून सोडिलें. पेट्रोग्राडहून बिनसरकारी साधनांनीं अशी बातमी आली आहे कीं ता. १२ आगष्ट रोजीं बाल्टिक समुद्रांत एक जंगी आरमारी लढाई होऊन तींत एक जर्मन क्रूझर साफ नाश पावलें व कित्येक लढाऊ जहाजें बरींच जायबंदी झालीं. हें जर्मन क्रूझर तिकडे कशाला गेलें होतें तें सांगण्याची अवश्यकता नाहीं. बाल्टिकसमुद्राच्या उत्तर भागांत रशियाचें आरमार आहे, तें तेथल्या तेथें भोंवतालीं लढाऊ जहाजांचा वेढा घालून अडकवून टाकावें असा शत्रूचा बेत होता, पण तो सपशेल फसला. गेल्या-दीड महिन्यांत रशियन फौजेनें जो पराक्रम केला तो केवळ अवर्णनीय होता असें युद्धशास्त्रज्ञांचें मत आहे. ही पूर्वेकडील रणक्षेत्राची स्थिति झाली. पश्चिमेकडे सूचेझनवळ फ्रेंच लोक मोठ्या निकरानें लढत आहेत. एकोणवीस फ्रेंच वैमानिकांनीं मोठी बहादरी करून जर्मनांचें एक ठाणें व तेथील कोठार जाळून फस्त केलें, व त्याचवेळीं भूचर अशा फ्रेंच सैनिकांनीं जर्मनांवर तोफांचा भडिमार सुरूं केला आहे. गेल्या आठवड्यांत ब्रिटिश योद्धयांना थोडीशी विश्रांति लाभल्यासारखी दिसते. तथापि जर्मन नरपिशाचांनीं पुनः इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर कुलुपी गोळे टाकून स्त्रीहत्या व बालहत्या करण्याचा प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाहीं, व विशेषसें नुकसान ही झालें नाहीं. दाक्षिणेस आस्ट्रियन लोकांनीं बेलग्रेड वर तोफांचा भडिमार केला. याचा वचपा काढण्यांत सार्वियन लोकांनीं बिलकुल विलंब लाविला नाहीं किंवा कसूर ही केला नाहीं. त्यांनीं सेमालिन व पेंचेव्हो अशा दोन आस्ट्रियन शहरावर तसाच भडिमार केला. डार्डानेल्सकडे एका फ्रेंच-क्रूझरानें जाफा येथील जर्मन लोकांच्या दारूगोळ्याच्या कोठाराचा नाश केला. इटालियन लोकांच्या चपळतेची प्रस्तुत युद्धांत

फार तारीफ होऊन राहिली आहे. हे लोक वानरासारखे दऱ्याखोऱ्यांतून लपत लपत येऊन एकदम उंच मान्याची जागा काबीज करतात. कोंडार सरहद्दीवर एका घोर युद्धांत त्यांनीं जो पराक्रम दाखविला तो अवर्णनीय होता.

प्रत्यक्ष लढाईच्या बातम्या जितक्या रम्य तितक्याच किंबहुना अधिकच लढाईंत गुंतलेल्या राष्ट्राच्या मुत्सद्देगिरीच्या डावपेंचाच्या लढायांचीं वर्णनें वाचण्यालायक असतात. जर्मनी तह करण्याविषयीं उत्सुक आहे अशा बातम्या मधून मधून डोकावत असतात. या जर्मनीच्या शत्रूकडून ह्मणजे दोस्तराष्ट्रांकडून आल्या असतील असें प्रथम दर्शनीं कोणास ही साहाजिकच वाटतें. पण हा प्रकार अगदीं निराळा आहे. या बातम्या जर्मन लोकांनींच कांहीं एका विशिष्ट हेतूनें उठविल्या असतात. तो हेतु हा कीं जर्मन डबघाईला आले, आतां युद्ध लवकर संपणार, अशी लोकांची समजूत होऊन ब्रिटन वगैरे दोस्त राष्ट्रांत सैन्याची भरती करण्याची व दारूगोळा तयार करण्याची जी खटपट जारीनें सुरूं आहे, तिच्यांत शिथिलता यावी, व लोकांचें साह्य तिला मिळूं नये. जर्मन लोकांची ही लबाडी आतां ब्रिटिश लोकांच्या पूर्ण परिचयाची झाली आहे, पण हिंदुस्थानांतले लोक भोळे असल्यामुळें शत्रूच्या अशा भुलथापामुळें फसून आपल्या राजनिष्ठेच्या कर्तव्यांत अज्ञानानें कदाचित् शिथिल होतील यासाठीं ही सावधगिरीची सूचना देण्यांत येत आहे.

अमेरिकेकडून दोस्तराष्ट्रांना दारू गोळ्याचा पुरवठा होत आहे असा संशय घेऊन आस्ट्रियानें त्याविरुद्ध अमेरिकेला एक निषेधपर पत्र पाठविलें होतें. त्याला अमेरिकेनें जें उत्तर पाठविलें आहे त्यानें आस्ट्रियाचें व जर्मनीचे दोघांचींही तोंडें एकदम बंद होतील. जर्मनींनें हें पत्र स्वतः न पाठवितां आंस्ट्रियाकडून पाठविलें यावरून जर्मनी राष्ट्राचा कावेबाजपणा व आस्ट्रियाचा मूर्खपणा ही एकदम नजरेस येतात. बोअर युद्धाचे वेळीं जर्मनीनें ब्रिटिशांना असाच दारूगोळा पुरविला होता, असें सांगून अमेरिकेनें आस्ट्रियाचें तोंड तर लागलींच बंद केलें पण जर्मनीचा खरा कावेबाजपणा याहूनही अधिक काळा आहे. बोअर युद्धाचे वेळीं बोअर लोकांना इंग्रजांचे विरुद्ध चिथविलें जर्मनीनें, आणि पुढें लढाईच्या वेळीं ब्रिटिश लोकांना युद्धसामुग्री पुरविली ती ही जर्मनीनेंच. दाणे टाकून कोंबडे झुंजविण्याची कला जर्मनीला पूर्णपणें अवगत आहे. जर्मनराष्ट्र विद्यासंपन्न आहे असा आतांपर्यंत त्याचा लौकिक होता. पण विद्या आणि नीतिमत्ता यांचें साहचर्य असलेंच पाहिजे असें नाहीं हेंही जर्मनीनें प्रत्ययाला आणून दिलें. जर्मनी विद्यालंकृत असेल, पण नीतिभूषणानें अलंकृत खास नाहीं. ‘ मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः ’ हेंच खरें.

पीछेहाट.

पूर्वेकडील रणक्षेत्रांत जर्मनीनें आपल्या पराक्रमाची व युद्धकौशल्याची जाणीव रशियन सैन्याला नुकतीच करून दिली. मेमेन नदीच्या डावीकडील कूनूचे किल्ले जर्मनीनें सर केले आणि आसपासचीं शहरें व प्रांत एकामागून एक घेत चालले आहेत. कुका आणि नॅरेव या दोन नद्यांमधील किल्ले जर्मन तोफखान्यानें जमीनदोस्त करून टाकले. जर्मनीच्या तोफांच्या पुढें रशियन तोफांची सरबत्ती फिकी पडली. संधिकालाच्या वेळीं जसे रंग एकसारखे बदलत रहातात तसे जय व अपजय हे नेहमीं उलट पालट होत असतात. आणि अशांतच लढाईची शोभा विशेष दिसून येते.

## खेडींपाडीं

आमच्या वऱ्हाडांतील बहुतेक खेडीपाडीं कधीं काळीं अशीं वसलेलीं आहेत कीं तेथें आरोग्याचे व स्वच्छतेचे सर्वच नियम एकत्रपणें मोडलेले दिसतात. अगोदर पुष्कळशा खेड्यांचें स्थान अगदीं लवणांत असतें. ज्याला जशी जागा सांपडली तशीं घरें बांधलीं गेलीं आहेत. मोकळी हवा व सूर्य प्रकाश हीं तर नीटपणें घरोघर नांदतही नाहींत. अलीकडे शहर सौंदर्य या संबंधानें शास्त्रीय पद्धतीनें विचार चालले आहेत. पण आमच्या मतें शहर सुधारण्यापूर्वीं खेडेगांवांची रचना सुधारणें अधिक लवकर होईल. निरनिराळ्या अमदानींत निरनिराळीं खेडीं वसलेलीं आढळतात. तशीं ब्रिटिश राज्यांतील नमुनेदार खेडीं ह्मणून वसविण्याचा सरकारनें जरूर विचार केला पाहिजे. प्रस्तुतचीं खेडीं उठवून तीं उंचशा ठिकाणीं नेऊन तेथें दूर दूर अंतरावर पूर्वपाश्चिम दिशांच्या बाजूनें मोकळीं व एका रांगेनें दुतर्फा बांधलेलीं घरें असावीं. याकरितां सरकारांतून जागा देण्याच्या सोयी व तसेंच जंगलखात्याकडून लाकूड फाटा मिळण्याच्या सोयी अधिक सवलतीनें मिळाल्या पाहिजेत सार्वजनीक पाण्याच्या व नदीकांठच्या सोयी पहाताना सांडपाण्याच्या तजवीजीची योजना अगोदर करण्यांत आली पाहिजे. गेल्या हप्त्यांत येथील कांहीं सायकलवाली मंडळी पातुरास गेली होती तेथें त्यांना गांवांची रचना नवीन पद्धतीवर होण्याची अवश्यकता अधिक दिसून आली. पातुर हा ५।६ हजार वस्तीचा गांव खरा पण तेथें आरोग्याच्या दृष्टीनें सर्वच गोष्टींचा अभाव दिसून आला. आपल्या इकडील खेडेगांवांतील लोकांचें आरोग्यासंबंधाचें अज्ञान फार शोचनीय स्थितींत आहे. जे सृष्टीचे नियम मनुष्याच्या आयुष्यवृद्धीच्या व शरिरसंपत्तीच्या वाढीसाठीं पाळले पाहिजेत ते अज्ञानपणें, मोडले जातात पण ते त्यांची कडक शिक्षा केल्यावांचून रहात नाहींत. आणि मनुष्य आपण होऊन ज्या गोष्टीकडे लक्ष्य पुरवीत नाहीं. तेथें प्लेगासारखे रोग मनुष्याला वस्ती सोडावयास लावतात व आरोग्याचे धडे घालून देत असतात. आमच्यामतें खेडेंगांवच काय पण शहरें सुद्धां सरकारनें नवीन पद्धतीनें वसविलीं पाहिजेत. ह्मणजे रुग्णालयें जाऊन ठिकठिकाणीं आरोग्यमंदिरें चमकूं लागतील.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** या आठवड्यांत आकाश आभ्राच्छादित राहून हवा कुंद होत होती. मघा नक्षत्राचा एक आठवडा कोरडाच गेला. पावसाचीं चिन्हें अगदींच नाहींत असें नाहीं. हवा असावी तशी स्वच्छ व निरोगी नाहीं. शहरांत व नवाबपुऱ्यांत उंदीर मरत असून प्लेगच्या कांहीं केसीस ही झाल्या आहेत. लोक गांवाबहेर जाऊं लागले आहेत. प्लेगची स्वारी अगदींच अचानक येऊन तिनें आतांपर्यंत उडाविलेल्या गर्दीवरून ती लवकरच उग्र स्वरूप धारण करते कीं काय अशी भीति पडली आहे. निंदणी कोळपणी आदीकरून शेतीचीं कामें चालूं आहेत.

**सन्मानः—** ना० रा० स्टँडन साहेब व त्यांच्या पत्नी हीं उभयतां विशेष समाजप्रिय आहेत ह्मणून त्यांच्या सहवासाचा लाभ सर्वांस मिळावा या उद्देशानें ना० रावबहादूर केशवराव दामले, हायकोर्ट वकील, व त्यांच्या पत्नी श्री. सौ. गोपिकाबाई, यांनीं आपल्या ‘ लक्ष्मीविलास ’ वाड्यांत पानसुपारीचा समारंभ गेल्या शनिवारीं टुमदारसा केला. बायकांची बैठक निराळी केली होती आणि तिकडे श्री० सौ० स्टँडन बाई यांनीं आपल्या सौजन्याची व सुशीलपणाची ओळख तेथें जमलेल्या स्त्रियांस करून दिली. रा० स्टँडन साहेबही प्रत्येक गृहस्थाजवळ जाऊन कांहीं कुशलप्रश्न करून सुखसंवाद आनंदानें करीत होते. साहेब बहादुर येथून उदईक उमरावतीस जाऊन ता० २५ च्या कायदे कौंसिलच्या बैठकीस नागपूर येथें हजर होतील.

सेंट्रल बँकेची वार्षिक सभा कालरोजीं टाऊन हॉलमध्यें सायंकाळीं भरली होती. ना० रा० स्टँडन साहेब यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारून पुष्कळशा उपयुक्त गोष्टीचा नकाशा रेखाटून दिला. याबद्दल ते आदरभावास विशेष पात्र आहेत.

गेल्या शनिवारीं सकाळीं आठ वाजतां ना० रा० स्टँडन साहेब यांनीं येथील म्युनिसिपल सभासदांची मुलाखत घेऊन बऱ्याच महत्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या. त्याबद्दलची साग्र हकीगत स्थलाभावीं या अंकीं देतां आली नाहीं. ती पुढील अंकीं देऊं. नामदारसाहेबांनीं केलेल्या सूचनामुळें म्युनिसिपल कामांत नवीन उत्साह येऊन त्यास नवीन चांगलें वळण लागेल अशी आह्मांस आशा आहे.

रा. रा. जी. एम्. टाउनशंड, डेप्युटी कॉन्सरवेटर ऑफ फॉरेस्ट, यांस रायपूरकडील फॉरस्टचें काम संपल्यावर उमरावती येथें फॉरेस्ट डिव्हिजनवर नेमिलें. आणि त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा. रा. विनायक चिमणाजी भागवत, एक्स्ट्रा असिस्टंट कॉन्सरवेटर ऑफ फॉरेस्ट, यांस नागपूर—वर्धा फॉरेस्ट डिव्हिजनवर बदललें.

रा. रा. जे. एच्. मॅक्नील, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, बुल्ढाणा, यांस ता० २८ आगष्ट १९१५ पासून सहा आठवड्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून ते रजेवरून परत येईपर्यंत किंवा दुसरा हुकुम होई पर्यंत रा. रा. ए. सी. आर्मस्ट्राँग, डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, फर्स्ट ग्रेड, उमरावती, यांस बुल्ढाणा येथें आफिशिएटिंग डि. सु. ऑफ पोलीस नेमण्यांत आलें.

**प्रतिवादी भयंकर मठ कांचीः—** येथील श्री. जगद्गुरु मठाधिपती अनंताचार्य हे वऱ्हाडांत आले असून हल्लीं त्यांचा मुक्काम इलिचपूर येथें आहे. इलिचपूरचे राहिवाशी व मोठमोठे ऑफिसर लोकांनीं त्यांचें ता० १० आगष्ट रोजीं मोठ्या थाटानें स्वागत करून गांवांतून त्यांची मिरवणूक काढली होती. ता० ११ रोजीं “ तत्वज्ञान ” ह्या विषयावर स्वामीजींचें भाषण सकाळीं ६॥ ते ११॥ वाजेपर्यंत झालें. श्रोतृसमाज ७०० वर होता व गांवांतील मोठमोठे लोक ह्मणजे तहासिलदार, पोलिस इन्स्पेक्टर, रावसाहेब देशपांडे वगैरे प्रमुख मंडळी ही हजर होती. तेथील लोकांनीं स्वामीजींना आणखी कांहीं दिवस त्यांच्या उपदेशाचा लाभ मिळावा ह्मणून राहण्याचा आग्रह केल्यामुळें त्यांचा मुक्काम २० तारखेपर्यंत येथें होणार आहे व त्यानंतर ते चांदूर बाजारचे लोकांना त्यांच्या उपदेशाचा लाभ देण्याकरितां जाणार आहेत. स्वामीजींना हिंदी, इंग्लिश, क्यानडी, संस्कृत, तामील, तेलगू व मराठी इतक्या भाषा येत असून त्यांची लेक्चर देण्याची शैली फार चांगली आहे.

( कर्तव्य )

**पोंचः—** डॉ. केतकर यांच्या राष्ट्रधर्मप्रचारिणी संवा'संबंधानें ‘ क्ष ’ कडून पत्रव्यवहार आला आहे. तो बरा आहे तरीपण स्थलसंकोचास्तव पुढील अंकीं ढकलणें भाग पडत आहे.

---

## जाहीर नोटीस.

वि॥ सबजज्ज साहेब खामगांव
सक्सेशन सार्टिफिकीट नंबर ४ सन १९१५ इसवी.
सक्सेशन सार्टिफिकीट मिळण्याबद्दल अर्ज.

अर्जदार

१ अजोती मर्द कस्तुरचंद २ अमोलखी मर्द कस्तुरचंद मारवाडी रा. पातुर्डा ता. जळगांव.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यांनीं सक्सेशन सार्टिफिकेट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत केला आहे. त्याची चौकशीची तारीख २५-९-१५ नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं हरकत असेल. त्यांनी सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणती ही तक्रार ऐकली जाणार नाहीं. आज तारीख १८-८-१९१५ इसवी रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं दिली.

R. N. Trivedi
सबजज्य
खामगांव

नो० नं० ३४०

पुरवणी—वऱ्हाडसमाचार ता० २३ आगष्ट १९१५

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार या नोटिशीनें सर्वत्र साहू सावकार व इतरलोक

यांसः—

या नोटिशीनें कळवितो कीं, मी साहू आहे. त्यामुळें माझे गांवांतील कांहीं लोकांशीं वैमनस्य असून माझे जेणें करून नुकसान होईल अशा प्रयत्नांत ते असतात. माझा मुलगा नामे अंबादास हा दुर्व्यसनांत गुंतला असून त्यांनीं कांहीं लबाडांच्या सल्यानें पैशाची उधळपट्टी केली व करीत आहे. अशा एका लबाडाच्या फितवणीनें सांप्रत तो घरांतून कोठें निघून गेला. असून जातांना त्या लबाडाचा (अंबादासच्या सोबत्याचे) नांवचा दस्तैवज ही घेऊन गेला आहे. व या वरून तो वाईट कामाकडे पैसा खर्च करील. करितां सर्वांस जाहीर करिता कीं, त्यांस (अंबादासास) त्याचे स्वतःचे अगर माझे नांवावर कोणी कर्ज देऊं नये. अगर त्याजपासून कोणतीच स्थावर जंगम इस्टेट लिहून घेऊं नये, घेतल्यास वरील कर्जांत मी अगर माझी कोणतीही इस्टेट बांधली जाणार नाहीं. कळावें. ता० १८-८-१९

सही

१ सखाराम सदाशीव भट यांचे करितां नागो सदाशीव द० खु०

नो० नं० ३१७रा. कापशी

---

## जाहिरनोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस व सावकार मंडळीस जाहीर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं माझा दत्तक मुलगा हनमानबक्ष हा हल्लीं आमचेशीं भांडण करून आमचे घरांतून निघून गेला आहे व तो वेगळा राहत आहे. सूरजमल पूरणमल दुकान वाशीम या दुकानशी त्याचा कांहीं एक संबंध नाहीं तरी त्या दुकानचे कर्मदार लोकांनीं त्या दुकानतर्फे त्यास कांहीं एक पैसा देऊ नये. व त्याला कोणत्याही नांवानें कर्ज वगैरे देऊ नये. त्याचे कर्जाबद्दल आह्मी कोणत्याही तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं. आमच्यातर्फे त्याला कोणतेंही काम कामकरण्याचा कर्ज काढण्याचा गहाण किंवा खरेदी किंवा बक्षीस वगैरे देण्याचा कर्ज वसूल करण्याचा कोणताही अधिकार नाहीं व त्यानें केलेल्या कोणत्याही कामाबद्दल खालीं सही करणार बिलकुल जबाबदार नाहीं. हे या जाहिर नोटीशीनें सर्वांस कळविले आहे. कळावें. ही जाहिर नोटीस दिली ता. २० माहे आगष्ट सन १९१९

सही.

हंसराम मनालाल द. खु.

नो. नं. ३३८

---

## नोटीस

रतनलाल असाराम भाटे रा. अंबेटाकळी हल्लीं राहणार खामगांव.

यांस:—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुमचेवर आमच्या गहाणाचे फैसल वि. अ. डि. जज साहब यांचे फायलावरील मु. नं. २६ मध्यें रुपये २१२६७॥— चा झालेला आहे. त्याचे अमलबजावणी प्रकर्णांत तुह्मी लबाडीनें जी शेती तुमची नाहीं अशी कांहीं शेती गहाण दिलेली होती असे अतां समजतें. या तुमचें लबाडीनें आतां कचेरींत कांहीं फिर्यादी चालू आहेत. या लबाडीमुळें गहाण जिनगी हुकूमनाम्याचे पैसे फेडण्यास पुरी पडणार नाहीं. व आह्मी तुमचे जातीवर राहिलेला हुकूमनामा सामील करूं हें तुह्मी जाणून आहांत. परंतु तुमचे जातीवर हुकूमनामा सामील झाल्यास आह्मांस पैसे मिळू नयेत व आह्मी बुडावे या लबाडीच्या दुष्ट हेतूनें तुह्मी आपली दुसरी जिनगी कांहीं लोकांस विक्रीनें किंवा गहाणानें लिहून देणार आहांत असें समजलें आहे. तरी या नोटीशीनें कळवितो कीं अशातऱ्हेची लबाडी करू नये. केल्यास तुमचे जिनगीचे सर्व व्यवहार बातल समजले जातील. कळावें ता. २०-८-१९ मुं॥ अकोला.

सही.

मुरलीधर गोवरधनदास दस्तुर गोवरधनदास भार्टीया खुद.

नो. नं. १३९

---

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाइज्ड.

## सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुळे पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक-** डा. गौतमराव केशव, आणि सन्स ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २१

सतत ४२ वर्ष चाललेला कारखाना

### ए. जे. म्हात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ओटो मुरंगीं! एकच भाव!

### आमचेकडे मिळणारा माल

### ओटो मुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरानिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, धंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | ,356 | 8,88,02,223 |
| 1914 | ,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1804 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18.898 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a record for the company. The next Division of profits will be madea s at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 25

हें पत्र अकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samarchar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ३० माहे आगष्ट सन १९१५ ई० [ अंक ३४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

## अस्सल अंगुरी.

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

बो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदांवरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें--

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० १

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तारीख १९ जुलै १९१५ इसवीच्या आकोला वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्राच्या अंकांत ९ वे पानावर तारीख १४-७-१५ ची लिहिलेली व महमदखां व आहमदखां वा॥ हाजी अनवरखां बेद [illegible] मर्द हाजी अनवरखां बेद रा० आकोला ताजनापेठ नि. बांगडी अशा सहीखाली जाहिर नोटीस सर्व लोकांस देण्यांत आलेली मी वाचून पाहतां स्पष्ट दिसून येतें कीं असली खोटी व खोडसाळपणाची नोटीस द्वेषभावानें अगर आपमतलबी वाईट हेतूनें माझें नुकसान करण्यासाठीं अगर भांडण उपस्थित करून माझे पैशाची व इज्जतीची खराबी करण्यासाठीं व आपला अंतरस्थ दुष्ट हेतू साधण्याकरितां कोणींतरी माझे अनिष्ट इच्छिणाऱ्या कारस्थानी पुरुषाचे चिथावणीवरून दिलेली दिसते. सदरहू नोटिशींतील मजकूर अगदीं खोटा आहे. माझे ताब्यांत असलेल्या सर्व जिनगीचा मी पूर्णपणें मालक आहे. यांत कोणाचा हितसंबंध व हक्क वगैरे मुळींच नाहीं. वाटेल त्याप्रमाणें मी आपली जिनगीची व्यवस्था करण्यास मला पूर्ण [illegible] अधिकार आहे. अशा खोट्या व खोडसाळ नोटिशीवर लोकांनीं मुळींच भरंवसा ठेवूनये. इतकेंच सांगणें मला जरूर दिसल्यावरून मीही जाहिर लेखी खबर त्याच वर्तमानपत्राच्या द्वारें सर्व लोकांस देत आहे कळावे ता० २९-८ १९१५ सही.

हाजी याकुबखां वा॥ अहमदखां
द. खु.

नो० नं० ३४१

### जाहिर नोटीस

जाहिर नोटीस मौजे पातारी तालुके बाळापूर येथील व इतर सर्व गांवचे शेट साहुकार लोकांस खालीं सही करणार यांजकडून:—

जाहिर करण्यांत येत आहे कीं, माझा साक्षात मुलगा नामदेव याची तब्यत बरोबर नसून त्याचें मस्तक फिरल्या सारखें झालें. तो कधीं कधीं चांगले स्थितींत असतो. व कधीं कधीं बेहोशीच्या गोष्टी करितो. व लोकांकडून मजला विन विचारतां कर्ज ही घेतो. असें समजल्यावरून सर्वत्र लोकांस जाहिर करून कळवितो कीं, नामदेव यांस कोणी माझे पश्चांत कर्ज वगैरे देऊं नये. व दिल्यास त्या कर्जाचा मी जबाबदार नाहीं. व माझा जीवमान आहे तों पर्यंत माझे जिनगीवर त्याचा वारसा नाहीं. व त्याची तब्यत चांगली नाहीं. कोणी त्याच्याशीं व्यवहार करूं नये. कळावें. ता० २४-८-१५

द. वामन शामराव अर्जनवीस

सही

विठोबा भवानजी लोहार द० खु०

नो० नं० ३४२

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
[illegible] ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असल्या पाहिजे.

सूचनाः— गुरुवारपर्यंत आलेल्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, फिर्यादफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें** } मॅनेजर

### नोटीस

नोटीस घेणारी नामदेव मानाजी शिंपी बेंदरकार राहणार दहीगांव रेच्याचे ता. दर्यापूर पोष्ट अंजनगांवसुर्जी

यांसः—

नोटीस देणार चंद्री मर्द नामदेव शिंपी रा. आकोली जहागीर ता. आकोट नोटीस देते ऐसाजे मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होण्यास १०-१२ वर्षें झालीं. मी अज्ञान असतां व सज्ञान झाल्यावर तुमचे घरीं राहत असे. पुढें तुमचे आईनें बापानें व तुह्मी मला मारहाण करून फार त्रास दिला. तो मी सर्व सहन केला. पुढें तुह्मी मला दिपवाळी करितां बापाचे घरीं पाठविलें. तेव्हां पासून ह्मणजे ९ वर्षांपासून बापाचे घरीं आहे. माझा बाप गरीब मनुष्य असल्यामुळें मी कर्ज काढून उदर निर्वाह करीत आहे. तुह्मी दिलेला त्रास असह्य आहे. त्याचें वर्णन करितां येत नाहीं. मी ९ वर्षांपासून आकोली येथें आहे. त्यास खावटीचें साल दरसाल १० प्रमाणें एकंदर रु. ३०० देऊन मला घेण्यास १५ दिवसाचे आंत यावें. रु० ३०० न दिल्यास व मुदतींत घेण्यास न आल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घर ठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. ही नोटीस दिली. ता० २२ माहे आगष्ट सन १९१५ ई० दस्तुर नारायण वामन

सही

चंद्री मर्द नामदेव शिंपी रा. अकोलीजहागीर निशाणी आंगठा

नो० नं० ३४३

## जाहीर नोटीस,

मी सही करणार मुली मर्द नारायण माळी रा० पाटखेड तालुके आकोला याजकडून ह्या नोटीसीनें नारायण वा॥ जाणुजी जात माळी राहणार राहीत तालुके जिल्हा आकोला.

यांस:—

कळविते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून तुमचे व माझें लग्न झाल्यास आज सुमारें १९ वर्ष झालीं व लग्न झाल्यापासून १० वर्ष पर्यंत तुह्मी माझी नेआण केली व मी तुमचे घरीं येऊन राहत असे असे रीतीनें १० वर्ष पावेतों तुह्मी मला वागविले परंतु मी पांच वर्षापूर्वी शहाणी झाल्यापासून तुह्मी माझी नेआण करण्याचे बंद करून मला वागवित नाहीं व ... खरा अर्थ आहे ... नेत नाहीं. माझा व आमचीं ... माझेबद्दल सांगण्यास आला असतां तुह्मी त्याला सांगितले कीं मी तुमचे मुलीस वागविण्यास तयार नाहीं. व ती लंगडी असल्यामुळें मी तिला घेऊनही जात नाहीं. अशा प्रकारें तुह्मी त्याला सांगितल्यामुळे त्याचा व माझा नाईलाज होऊन मला हल्लीं आपले बापाचे घरींच राहणें भाग पडत आहे. तुह्मी मला टाकून दिल्यास माझे जन्माचें मातेरे होणार असून मला खाण्यापिण्यासही मिळणार नाहीं. करितां या नोटीसीनें तुह्मास कळवित आहे कीं सदर्हु नोटीस पावल्यापासून १९ दिवसाचें आंत माझें पांच वर्षाचे खावटीचे खर्चाबद्दल कर्ज झालेले रुपये २६० देऊन तुह्मी मला घेऊन जावें व तुह्मी तसें न कराल तर मी दुसरा घरठाव करीन. मग तुमची कोणतेच प्रकारची जबाबदारी मजवर राहणार नाहीं व खावटीचे खर्चाबद्दल तुमचेवर दावा करीन व या नोटीसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल ता. २६-८-१९१९ इ.

सही.

मुली मर्द नारायण जात माळी
रा. पाटखेड नि. खुद हा.
बांगडी द. बळीराम
शिवराम.

नो० नं० ३४४

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण वा॥ सूर्यभान काकड कुणबी रा. आकोट एलिचपूर वेस

यांस:—

खालीं सही करणार नोटिस देते कीं, मझे बापानीं माझें लग्न तुमच्याशीं करून दिले. त्यांस ७-८ वर्षे झालीं. त्यानंतर मला ऋतुप्राप्त होऊन ४-५ वर्षे झालीं. तुमच्या कडून संसार होणें अशक्य झाले. सबब तुह्मी मला माझे बापाचे घरीं रवाना केलें. सांप्रत मी तेथेंच आहे. त्यासही ४ वर्षे झालीं. माझे बापाचे गारिबीमुळें माझे बापास माझे अन्नवस्त्राबद्दल २९० रु. लोकांचें कर्ज झालें आहे. तरी आतां ही संसारास योग्य असे तुह्मी झाले असल्यास वरील कर्जाचे रुपये १९ दिवसांत माझे बापास देऊन मला घेऊन जावें. तसें न केल्यास मी हीच नोटिस फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा कोणताही हक्क राहणार नाहीं मला बापाचे घरीं पोचविनांना माझे अंगावरचे सर्व दागीने तुह्मी काढून घेतले होते. क. ता.

सही

सेनी मर्द नारायण काकड नि॥ बांगडी

नो० नं० ३४५

## पत्र व्यवहार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांस सा. न. वि. वि:—

आपल्या विश्रुत पत्रांत येत्या अंकीं खालील मजकुरास स्थळ द्याल अशी आशा बाळगुन मजकूर लिहीत आहे.

आपल्या पत्राच्या तारिख ९।८।१५ च्या अंकामध्यें डॉ. केतकर यांच्या राष्ट्रधर्म प्रचारिणी संघासंबंधानें कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. ते त्या गोष्टीचा बारकाईनें विचार करून प्रदर्शित केले आहेत असें दिसत नाहीं. हा विषय दिसतो तितका कमी महत्वाचा नाहीं. कोणत्याही संघाचें महत्व तो स्थापन करणाऱ्याचा उद्देश व त्यापासून राष्ट्र प्रगतीस होणारा फायदा या दोन्ही गोष्टीचा पूर्ण विचार करून ठरवावें लागतें. या दृष्टीनें पाहतां डॉ. केतकर यांच्या संघासारखी एकादी संस्था सद्यःकालीं बरीच उपयुक्त होईल असें वाटतें. प्रथम आपण संघाचे उद्देशाचाच थोडक्यांत विचार करूं. पहिला उद्देश ह्मणजे भाषा निहाय देशाची विभागणी. आपल्या हिंदी लोकांचें एक राष्ट्र बनविणें हें प्रत्येक सुशिक्षित माणसाचें आद्य ध्येय आहे याबद्दल मतभेद ... आणि आपल्या इंडियन नॅशनल काँग्रेसचे प्रयत्न या दिशेनें चालू आहेत. ही काँग्रेस अस्तित्वांत येऊन अजमासें तीस वर्षें झालीं. या तीस वर्षांच्या अनुभवानें असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं काँग्रेस ज्या दिशेनें प्रयत्न करित आहे तींत कांहीं तरी चूक होत असली पाहिजे. कारण एवढ्या मोठ्या अवधींत तिला "हिंदी राष्ट्र" बनविण्याचें बाबतींत ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं. आपल्या हिंदुस्थानवासी यांचे आद्य ध्येय हें आहे कीं आपलें एक राष्ट्र व्हावयास पाहिजे. तें कसें व कोणत्या दृष्टीनें होईल याचा प्रामाणिकपणें विचार केला असतां डॉ. केतकर यांचे उद्देश व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न अगदीं स्तुत्य व आदरणीय आहेत असें प्रत्येक खऱ्या देशभक्ताला वाटल्या वांचून राहणार नाहीं.

आपल्या या अफाट देशामध्यें अनेक भाषा चालू असल्यामुळें हल्लींच्या विभागणी पद्धतीनें हिंदुस्थानचें एक राष्ट्र होण्यास बराच अडथळा होत आहे. महाराष्ट्राचा एक तुकडा, तैलंगणाचा एक तुकडा, रांगडी मुलुखाचा एक तुकडा, व कांहीं एतद्देशीय संस्थानें असे मिळून एक प्रांत करण्यामध्यें एकी व एकराष्ट्र कसें होणार. या पद्धतीनें लोकांमधली फूट कायम राहील. अठरा धान्याचें कडबोळें करणें केव्हां ही श्रेयस्कर नाहीं. मग एक राष्ट्र तें कोठून होणार?

भाषानुरोधानें विभागणी झाल्यानें त्या त्या भाषेच्या लोकांचें नेहमी दळणवळण राहून त्यांचे एकप्रकारें ऐक्य झाल्यावांचून राहणार नाहीं. एक भाषा हें एक नैसर्गिक बलवत्तर बंधन आहे. परस्परांतील दळणवळण वाढण्यास व एक विचाराचा फैलाव होण्यास त्यासारखें दुसरें साधन नाहीं. यामुळें लोकांमध्यें आपलेपणा आपोआप जाग्रत होऊन तो वाढत्या प्रमाणावर राहील. अशा रितीनें प्रत्येक भाषानिहाय प्रांताची एकी होऊन एकंदर हिंदुस्थानचें एक संयुक्तराष्ट्र सहज बनेल. उदाहरण घेऊनच सांगावयाचें झाल्यास आपल्याला जर एक काठ्याचा मोठा दोरखंड बनवावयाचा असला तर नुसताच एक काठ्याचा भारा वळवित बसल्यानें भागेल काय? किंवा कधीं तरी त्याचा दोरखंड बनणें शक्य आहे काय? दोरखंडच बनवावयाचा असल्यास अगोदर बारिक बारिक दोऱ्या वळवून नंतर त्या एकत्र करून वळविल्यानें दोरखंड होईल. भाषा निहाय विभागणी झाल्या शिवाय हिंदीराष्ट्र एक होण्यास दुसरा उपाय नाहीं. आपला देश एवढा मोठा आहे कीं तो यूरोप खंडांतील रशिया सोडून बाकी युरोपाइतका आहे. रशिया खेरीज युरोपांत किती भाषा, लोक आणि तदनुसार राष्ट्रें नाहींत? त्याप्रमाणें या देशांत पुष्कळ भाषा असणें अपरिहार्य आहे. ह्मणूनच भाषा निहाय प्रांताची वाटणी झाल्यानें एकसत्तेखालीं त्या सर्वांचें एकीकरण होण्यास मदत झाल्यावांचून राहणार नाहीं.

दुसऱ्या उद्देशासंबंधानें आपला आक्षेप असा आहे कीं व्यापार आणि इतर व्यवसायासंबंधानें एका प्रांतांतले लोक दुसऱ्या प्रांतांत जातात. तेव्हां त्या लोकांना यांची भाषा वेगळी ह्मणून त्यांना राज्यकारभारांतून वगळावे लागेल. आणि तें इष्ट होणार नाहीं. असे जे लोक एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत व्यवसायार्थ चालले जातात. त्यांना त्या त्या प्रांतांतील भाषा अवगत होण्यास वेळ लागत नाहीं. कारण व्यवहारामध्यें सुद्धां आपलीच भाषा बोलून त्यांचें चालणार नाहीं. व जे पूर्वीच गेलेले असतील त्यांना तर तद्देशीयांप्रमाणें भाषा येत असतेच. आपल्या या प्रांतांत पुष्कळ मारवाडी अगर गुजराथी उत्तम मराठी बोलतांना आपण पाहतों. तसेच हे लोक बेंचमॅजिस्ट्रेट, डिस्ट्रिक्टबोर्डचे मेंबर, म्युनिसिपल कमेटीचे मेंबर वगैरे झालेले ही आपण पाहतों. फारतर काय रावसाहेब खुशालराव अंदुरेकर मराठे देशमूख मराठी बोलणारे हे ग्वाल्हेर प्रांतांत ह्मणजे हिंदी प्रांतांत कायदेकौंसिलचे मेंबर झाले नाहींत काय? त्यांना कांहीं भाषेची अडचण वाटली नाहीं. अगर मराठी बोलणारे ह्मणून त्या प्रांतातल्या निवडणूकींतून ते वगळले गेले ही पण नाहींत.

तिसऱ्या उद्देशासंबंधानें आपला अभिप्राय अयोग्य आहे असें नाहीं. मात्र त्या दिशेनें जन समुहाचा अखंड आणि नेटाचा प्रयत्न पाहिजे. एका दृष्टीनें हल्लीं जरी तिसरा उद्देश साध्य वाटला नाहीं, तरी राष्ट्र घटनेस त्याची फार जरूरी आहे. याच दिशेनें मराठीभाषेंत शास्त्रीय पुस्तकें पाश्चिमात्य पद्धतीस अनुसरून अगदीं आज तागाईत ( Up to date ) करण्याचा कांहीं विद्वान मंडळीचा प्रयत्न हल्लीं चालू आहे. ही एक मोठी आनंदाची गोष्ट होय.

सारांश राष्ट्र धर्मं प्रचारणेसंबंधाची डा. केतकरांची जी योजना दिसते. ती अव्यवहार्य नसून अत्यंत आवश्यक आहे इतकेंच नव्हे तर अशी संस्था आपल्यांत नव्हती ती उणीव डॉ. केतकर यांनीं भरून काढली याजबद्दल त्यांचें सर्वांनीं अभिनंदन करणें जरूर आहे. आणि अशा त्यांच्या राष्ट्र कार्याला हात भार लावून त्यांचें यश चिंतन करणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे.

आपला

क्ष

## वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य ६ शके १८३७

## स्त्रियांचें शिक्षण.

स्त्रियांना शिक्षण द्यावें कीं नाहीं या प्रश्नाची चर्चा करण्याचा काळ आतां राहिला नाहीं, तर स्त्रियांना शिक्षण द्यावयाचें तें कोणत्या प्रकारचें असावें हें ठरविण्याचा काळ आतां आला आहे. प्रत्येक काळांत देशस्थित्यनुरूप शिक्षण शद्बाचा अर्थ व व्याप्ति यांत फरक पडत जातो, ही गोष्ट पुरुषांच्या व त्याचप्रमाणें स्त्रियांच्याही शिक्षणाविषयीं खरी आहे. पूर्वी वैदिक काळीं ब्राह्मणांच्या मुलाचें शिक्षण त्यावेळच्या त्यांच्या कर्तव्यक्षेत्राच्या व्याप्तीला अनुरूप असें होतें. ब्राह्मणांनीं अध्ययन, अध्यापन, व यजनयाजन वगैरे कर्में करावयाचीं असत, त्यावेळीं त्यांच्या मुलांना तीं कर्में चांगल्या रीतीनें करतां येतील असें शिक्षण देणें, क्षत्रियांना क्षात्र कर्म चांगलें करतां येईल, व वैश्यांना वाणिज्य व्यवसाय उत्तम प्रकारें चालवितां येईल असें शिक्षण मिळत असे. उपनिषद् काळांत यज्ञयागाचे जागीं आध्यात्मिक चिंतन स्थापित झालें, तेव्हां ब्राह्मणांच्या मुलांच्या शिक्षणाचें स्वरूप ही आपोआप पालटलें; त्यानंतरच्या काळांत ब्राह्मणांनीं सेवावृत्ति स्वीकारल्या बरोबर त्या वृत्तीस उपयुक्त होईल असें स्वरूप शिक्षणास मिळालें. मराठ्यांच्या उत्कर्षाच्या काळांत ब्राह्मणांनीं हातांतलें दर्भ टाकून तलवार घेतांच त्यांच्या शिक्षणाची दिशा बदलून शिपाईगिरीचें व मर्दानी खेळाचें शिक्षण हेंच ब्राह्मणांचें शिक्षणाचें ध्येय झालें. नंतर त्यांच्या कारकुनीचा काळ आला, तेव्हां उत्तम फर्डा कारकून तयार करणें हें शिक्षणाचें कार्य ठरलें, व आतां तोही काळ जाऊन निराळी परिस्थिति प्राप्त होतांच पूर्वीचें शिक्षण अपुरें वाटून तदनुरूप शिक्षणाचें ध्येयांत ही फरक पडला. पुरुषाच्या शिक्षणाचीं हीं जशीं स्थित्यंतरें परिस्थितीच्या रूपांतराबरोबर झालीं, तशीं स्त्रियांच्या शिक्षणाचीं होणें हें अप-

रिहार्य होतें व त्याप्रमाणें तीं घडतही आलीं. पूर्वीचें सीता, मंदोदरी, अरुन्धती, च्या काळचें स्त्रीशिक्षण, पुढच्या काळांतल्या गार्गी, वाचक्नवीच्या काळांत राहिलें नाहीं, आणि या दुसऱ्या काळच शिक्षण मराठ्यांच्या राजसत्तेच्या काळीं नव्हतें. तेंच रूपांतर पुढें होत गेलें व आमच्या स्त्रियांची कर्तव्यमर्यादा गृहापुरती मर्यादित होतांच त्यांचें शिक्षण ही चूलपोतेऱ्यापुरतें मर्यादित होऊन बसलें. त्यांच्या शिक्षणाचें क्षेत्र फारच मर्यादित झाल्यामुळें आमच्या स्त्रिया अशिक्षित, व स्त्रियांना याहून अधिक शिक्षण देणें समाजास विघातक होईल अशी भीती ही पुष्कळांना वाटूं लागली. याचा अर्थ असा झाला कीं आमच्या स्त्रियांना मुळींच शिक्षण नसतें. त्या अगदीं अशिक्षित असतात. हा समज खरोखर चुकीचा आहे. त्यांना शिक्षण नसतें असें नाहीं.. तर त्यांचें शिक्षण 'शिक्षण' या शद्बाचा प्रस्तुत जो व्यापक अर्थ झाला आहे त्याच्याशीं सुसंगत नाहीं, हा त्यांचा खरा अर्थ आहे. खरोखर पाहिलें तर आमचीं शास्त्रें किंवा समाज स्त्रीशिक्षणाला विरुद्ध किंवा पराङ्मुख कधींही नव्हता. तसें असतें तर आमचा समाज आपलीं कार्यें आजपर्यंत यथास्थित रीतीनें करीत आला, तें कधींच घडलें नसतें; व समाजच मुळीं नष्ट झाला असता. परंतु तसें घडलें नाहीं. जोंपर्यंत स्त्रियांचें शिक्षण भिन्नपरिस्थिती बरोबर प्राप्त झालेलीं भिन्न कर्तव्यें यथायोग्य रीतीनें बजावण्यास आमच्या स्त्रीसमाजास तयार करीत होता, तोंपर्यंत स्त्रियांच्या शिक्षणासंबंधानें मागें कधीं ओरड झाली नाहीं, व या कामीं शिक्षण अपुरें पडूं लागतांच ती होण्यास सुरुवात झाली हें त्यांतलें खरें रहस्य आहे, आणि स्त्रीशिक्षणासंबंधानें कैवार घेऊन त्यांत सुधारणा करूं इच्छिणारे हें मर्म ओळखून वागतील, तर त्यांच्या वाणींतून समाजाच्या मर्मावर आघात करणारे जे वाग्बाण सुटतात ते कधीं सुटावयाचे नाहींत. व त्यामुळें नव्या जुन्या समाजांत निष्कारण उत्पन्न झालेला संघर्ष टळेल.

परिस्थित्यनुरूप मनुष्याच्या कर्तव्यक्षेत्राचा विस्तार किंवा संकोच होत असतो, व त्या विस्तारसंकोचानुरूप शिक्षणाचे व्याख्येंत व व्यापकतेंत परिवर्तन घडत असतें व तें घडलें पाहिजे हें तत्त्व एकदां मान्य झालें म्हणजे स्त्रीशिक्षणासंबंधाचा जटिल प्रश्न तेव्हांच उलगडला जातो. पुरुषांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा उलगडा अशाच रीतीनें झाला आहे, आणि हल्लीं मुलांना शिक्षण हायस्कूल व कालेजें यांत मिळणाऱ्या शिक्षणविषयींचा असंतोष जो उत्पन्न झाला आहे त्याच्या मुळाशीं हेंच तत्त्व आहे. मुलांना नुसतें वाङ्मयात्मक शिक्षण देऊन आतां भागत नाहीं, त्या बरोबर हस्तकौशल्याचें, वाणिज्य पद्धतीचें किंवा दुसरें कसलें तरी धनोपार्जन करण्याचें शिक्षण द्यावयास पाहिजे असें आतां बहुतेकांना वाटूं लागलें आहे. तोच प्रकार स्त्रीशिक्षणासंबंधाचा ही आहे. पूर्वीं स्त्रियांना गृहशिक्षण— संसारांतलीं कामें करतां येतील येवढें शिक्षण— दिलें म्हणजे काम झालें असें जें वाटत होतें तें चुकीचें होतें, स्त्रियांचें कर्तव्यक्षेत्र हल्लींच्या काळांत अधिक विस्तृत झालें आहे, त्यांना आरोग्य, व्यवहारज्ञान, समाजसुधारणा, राजकीय स्थित्यंतरें, उद्योगधंदा वगैरे गोष्टींचें ही ज्ञान असणें अवश्य आहे असें पुष्कळांना वाटूं लागलें आहे; कित्येकांना तर असें ही वाटतें कीं स्त्रियांना पाकनिष्पत्तीचें शिक्षण न मिळालें तर एकवार चालेल, पण त्यांना एम. डी, किंवा एम. ए. होऊन पुरुषांप्रमाणें शिक्षणसंस्था किंवा आरोग्यभवनें यांची व्यवस्था करतां आली पाहिजे. त्या सुगृहिणी न झाल्या तरी पतकरेल, पण उत्तम शिक्षकिणी, उत्तम डाक्तरणी, किंवा उत्तम वकिलिणी झाल्या पाहिजेत. ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनाप्रमाणें जो तो या स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करून त्या शिक्षणाची दिशा ठरवूं पाहत आहे. अशावेळीं स्त्रीशिक्षणाची एकच दिशा निश्चित ठरणें अशक्य आहे. व ती सर्वांना समाधानकारक वाटेल अशी अपेक्षा करणें ही व्यर्थ आहे. स्त्रीशिक्षणाचे बाबतींत विचार करणारांचे हल्लीं सामान्यतः दोन पक्ष आहेत. एक पक्ष म्हणतो कीं स्त्रियांना विद्या अवश्य हवी, पण ती इतक्या बेताची असली म्हणजे पुरे कीं तिच्या योगानें स्त्रियांना गृहिणीचें व मातेचें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावतां यावें. दुसरा पक्ष म्हणतो कीं या विद्येनें स्त्रियांच्या कपाळची परवशता कधींच दूर व्हावयाची नाहीं. त्यांना नेहमीं पुरुषजातीवर चरितार्थासाठीं अवलंबून राहावें लागणार, व परवशता ही जशी पुरुषांना जाचक व त्यांच्या बुद्धिप्रभावाला खुरटणारी होते, तसाच प्रकार स्त्रियांच्या संबंधानें घडूं देणें अन्यायाचें आहे. स्त्रियांना येवढ्यासाठीं पुरुषासारखेंच सगळें शिक्षण अवश्य आहे. त्यांना पुरुषाप्रमाणेंच सगळे व्यवसाय करून स्वतंत्र रीतीनें राहतां येईल असें शिक्षण त्यांस दिलें पाहिजे. या दोन्ही पक्षांची एकवाक्यता करूं जाणे म्हणजे व्यर्थ कालक्षेप करणें होय. यासाठीं त्या भानगडींत न पडतां दोघांच्या ही मनाचें समाधान व्हावें म्हणून आह्मी असें सुचवितों कीं मुलींसाठीं दोन प्रकारच्या शिक्षण संस्था असाव्या. एका संस्थेंत उत्तम गृहिणी व उत्तम माता निर्माण होतील अशा प्रकारचा शिक्षणक्रम ठेवावा. दुसऱ्या प्रकारच्या संस्थांत पुरुषांसारखेंच सर्व शिक्षण देण्यांत यावें. हल्लींच्या मुलींच्या शाळा व हायस्कूलें वगैरे या दुसऱ्या प्रकारच्या शिक्षणाच्या धोरणावरच चाललेलीं आहेत. जर सगळें शिक्षण पुरुषांसारखेंच द्यावयाचें तर मुलींसाठीं निराळ्या व मुलींसाठीं निराळ्या संस्था ठेवून खर्च वाढविण्यांत तरी काय अर्थ आहे? मुलांच्याच शाळांतून व हायस्कूलांतून मुलींना घेण्याची व्यवस्था केली म्हणजे स्वल्प खर्चांत हा कार्यभाग होईल. मुलींच्या साठीं स्वतंत्र शाळा काढावयाच्या त्या पहिल्या प्रकारच्या शिक्षणक्रमाच्या असाव्यात. म्हणजे त्यांत सुगृहिणी व सुमाता निर्माण करण्याकडे शिक्षणाचा रोख ठेवावा. पण या दोन्ही प्रकारच्या शाळांची अवश्यकता आहे. त्यावांचून चालावयाचें नाहीं. हल्लींच्या शाळा एकांगी म्हणजे दुसऱ्या प्रकारच्या स्त्री शिक्षणाची सोय करणाऱ्या आहेत. पण पहिल्या प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी असणारी एक ही शिक्षण संस्था नाहीं. आणि त्यामुळें समाजाच्या एका पक्षांत असंतोष धुमसत आहे. तेव्हां समाजाच्या अध्वर्यूंना व सरकारला आमची अशी विनंति आहे कीं त्यांनीं स्त्री शिक्षणाचा प्रश्न आह्मीं वर म्हटल्या प्रमाणें सोडवून दोन्ही पक्षांचा असंतोष मिटविण्यासाठीं मुलींसाठीं वर सांगितलेल्या दोन निरनिराळ्या पद्धतीच्या शाळा काढाव्या, किंवा निदान सुगृहिणीच्या शाळा तेवढ्या निराळ्या काढून पुरुषांप्रमाणें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या मुलींची सोय पुरुषांच्या शाळांतून करावी.

## जगांतील सर्वांत मोठा टाइपरायटर.

पनामा पॅसिफिक प्रदर्शनांत ज्या अनेक विलक्षण वस्तू दिसतील त्यांत एक अवाढव्य टाइपरायटर आहे. हा नेहमीच्या साधारण टाइपरायटरच्या १७२८ पट मोठा आहे. प्रदर्शन चालू असतांना त्या टाइपरायटरवर ९ फूट रुंदीच्या कागदावर ३ इंच उंचीच्या व २ इंच अंतर असलेल्या अक्षरांत बातमीपत्रकें छापली जातील.

नेहमीं उपयोगांत येणाऱ्या साध्या आकाराच्या एका टाइपरायटरशीं विद्युच्छक्तीनें संबंध जोडून हें अजस्त्र यंत्र चालविण्यांत येणार आहे. उदाहरणार्थ:— लहान यंत्राच्या एकाद्या अक्षराची किल्ली दाबली तर मोठ्या यंत्रांतील तेंच अक्षर उमटेल. साधारण प्रतीच्या यंत्राचें वजन ३० पौंड असतें, तर ह्या प्रचंड यंत्राचें वजन १४ टन आहे. हें चालवितांना २१ फूट रुंद जागा व्यापितें. ह्याची उंची १५ फूट आहे. हें यंत्र चालविण्यास २५ फूट लांब ३० फूट उंच व २५ फूट रुंद एवढी खोली पाहिजे. अक्षर उठण्या करितां ज्या ठिकाणीं आपण बोटानें दाबतो त्या किल्लीच्या मुखपृष्ठाचा व्यास ७ इंच आहे. प्रत्येक अक्षराचा दांडा ५२ इंच लांब असून त्याचें वजन साध्या टाइपरायटर इतकें आहे. हा [illegible] टाइपरायटर तयार करण्याचें काम दोन वर्षे सुरू असून ह्यास अदमासें ३ लक्ष रुपये खर्च आला आहे.

## युद्धाच्या बातम्या.

गेल्या आठवड्याच्या आरंभाला रशियाची फार वाईट स्थिति असल्याबद्दलच्या बातम्या होत्या. वार्सा घेतल्यापासून जर्मनलोक जोरानें पुढें पाऊल टाकीत चालले व रशियचें पाऊल मागें मागें पडत चाललें. जर्मनी आतां रशियाची राजधानी पेट्रोग्राडवर रोख धरून पुढें सरकत आहे. पेट्रोग्राड हस्तगत करण्यांत जर्मनीचे दोन हेतु आहेत. एक तर त्यायोगानें रशियाची पूर्ण मानखंडना होऊन तो देश स्वतंत्रपणें तह करण्यास कबूल होईल अशी जर्मनीची कल्पना, आणि दुसरा हेतु हा कीं जरी त्यामुळें रशिया तह करण्याला कबूल झाला नाहीं, तरी रशियाचे दारूगोळा करण्याचे कारखाने उत्तर भागांत असल्यामुळें तो प्रांत हस्तगत केल्यावर दारूगोळा करण्याचे कारखानें अर्थातच बंद पडून रशियाला लवकर जेरीस आणतां येईल. या दृष्टीनें पश्चिमेकडून समुद्रांतून व पूर्व आणि दक्षिण या बाजूंनी जमिनिवरून रशियाच्या उत्तर भागाला शह लावण्याचा प्रयत्न जर्मनी करीत आहे. पैकीं जमिनीवरून शह लावण्याच्या प्रयत्नांत जर्मनीला थोडें बहुत यश आलें आहे असें मानण्यास लावणाऱ्या बातम्या गेल्या आठवड्याच्या प्रारंभीं आल्या. परंतु त्या बरोबरच समुद्राच्या बाजूचा त्यांचा प्रयत्न सपशेल फसून जर्मनीची जंगी हानि झाल्याचीही आनंदाची बातमी आल्यानें निराशेच्या अंधारानें व्यापृत झालेल्या मनाला आशेच्या किरणांनीं पुनः प्रज्वलित केलें आहे. पश्चिमेकडे रिगाच्या आखातांत शिरून जर्मनीनें रशियन आरमाराचा विध्वंस करण्याच्या हेतूनें आपल्या जवळचें एक जंगी सुपर ड्रेड नॉट (सवाई बेडर) व कांहीं क्रुझरें आणि टार्पेडो बोटी यांची रवानगी केली. तें पाहतांच रशियन आरमारानें आरंभीं थोडी कच खाल्ल्याचें दाखविलें. पण योग्य संधी प्राप्त होतांच उलट खाऊन जर्मन आरमारावर निकराचा हल्ला करून आलेल्या अनाहूत पाहुण्यास अर्धचंद्राचा मान दिला. जर्मन सवाई बेडर जहाज बुडालें, त्याच्या बरोबर आलेल्या क्रुझरांपैकीं तीन क्रुझरें व सात टार्पेडो बोटी यांनीं जलसमाधि घेतल्या, आणि आरमाराच्या शेष भागानें आपला रस्ता रिगाच्या आखातांतून सुधारला. पेर्नौ येथें जर्मन सैन्यानें उतरण्याचा यत्न केला, पण तेथें रशियन फौजेनें शत्रूच्या सैन्याचा फडशा पाडला, या बातम्यांनीं रशियांत तूर्त आनंदी आनंद झाला आहे. पण हा आनंद फार वेळ टिकणारा नाहीं हें रशियन जाणून आहेत. जर्मनीचा हल्ला दुप्पट जोरानें लवकरच येईल यांत शंका नाहीं.

जर्मनीनें आराबिक नांवाचें एक इंग्रज जहाज बुडविलें, त्यांत कांहीं अमेरिकन लोकांची प्राणहानि झाली. त्यामुळें अमेरिका व जर्मनी यांच्यामधील वादाचें पुनरुज्जीवन झालें आहे. आतां तरी व्यवहारांत कालक्षेप करण्यांत अर्थ नाहीं अशी अमेरिकन लोकांची खात्री होवो म्हणजे झालें. तशी खात्री झाल्याची न अमेरिकन जागृतीची थोडी बहुत चिन्हें ही दिसूं लागलीं आहेत. अमेरिकेच्या जर्मनींतल्या वकिलाला प्रेसिडेंट विल्सन यांच्याकडून झालेल्या हानीबद्दल पूर्ण तपास करण्याचा व जीव वाचवून परत आलेल्या जर्मन-अमेरिकन लोकांच्या जबान्या घेण्याचा हुकुम झाला आहे. या व मागील प्रकरणाबद्दल जर्मनीनें योग्य भरपाई न केल्यास मित्रत्वाचा भंग होऊन लढाईचा प्रसंग येईल ही गोष्ट लक्षांत घेऊन तसा प्रसंग आल्यास आगोदरची योग्य सावधगिरी अमेरिका ठेवूं लागली आहे. अमेरिकेंत असलेल्या जर्मन लोकांची खानेसुमारी घेण्याबद्दल व त्यांना [illegible] केंद्रेंत ठेवण्याची जरूरी दिसल्यास [illegible]साठीं आतांपासून छावण्या तयार [illegible] करण्याबद्दल तजविजी चालू आहेत. जर्मनी[illegible]ला अनुकूलता व अमेरिकेविषयीं द्रोह [illegible] करण्यास उत्तेजन देणाऱ्या वक्त्यांना पक[illegible]डण्याचे हुकुम सुटण्याच्या बेतांत आहे[illegible]त असेंही कळतें. याप्रमाणें सध्या अमे[illegible]रिका हॅमलेट नाटकांतल्या हॅमलेट राज[illegible]पुत्राची भूमिका उत्तमप्रकारें करीत [illegible] आहे असें सर्व साधारण मत आहे.

पश्चिमेकडील रणक्षेत्रांत गेल्या आठवड्यांत म्हणण्यासारखी हालचाल झाली नाहीं. जर्मनीनें आराबिक जहाज बुडविल्याचा वचपा ब्रिटिशांनीं जर्मनीचीं क्रुझरें व टार्पेडो

बोटी वगैरे बुडवून अंशतःतरी घेतला ही समाधानाची गोष्ट आहे.

## हिंदुस्थान आणि ब्रिटिश कर्ज.

इंग्रज सरकारला प्रस्तुत युद्धामुळें वारंवार कर्ज काढावें लागतें, पण या कर्जाच्या रकमा खुद्द इंग्लंडांतच बहुधा मिळतात, आणि हिंदुस्थानच्या लोकांना इंग्लंडाला सहाय्य करण्याची संधी क्वचितच मिळते याबद्दल हिंदुस्थानचा कळवळा वाटून लंडनच्या टाईम्स पत्रानें एक मोठा लेख लिहून सरकारला अशी सूचना केली आहे कीं यापुढें कर्ज काढण्याचा प्रसंग येईल तेव्हां सरकारनें हिंदुस्थानांतल्या पुरून ठेवलेल्या द्रव्याची आठवण ठेवावी, आणि हिंदुस्थानाला विशेष सवलती देऊन अगदीं गरीब हिंदी रयतेला ही ब्रिटिशसरकारचा सावकार होण्याचा मार्ग मिळवितां येईल अशी तजवीज करावी. कर्ज काढतांना तरी हिंदुस्थानची आठवण सरकारला करून देण्या इतकें लंडन टाईम्सनें आपल्या मनाची उदारता दाखविली आहे व त्याबद्दल हिंदुस्थान त्याचा आभारी राहील. पण युद्ध संपल्यानंतर ब्रिटिश राज्यकारभाराच्या प्रत्येक बाबतींत ब्रिटिशसरकार वसाहतीचें मत घेत जाईल असें आश्वासन ब्रिटिश प्रधानानें नुकतेंच दिलें, तेव्हां या लंडनच्या मेघगर्जनेला हिंदुस्थानची आठवण कशी झाली नाहीं याचें सर्वांना आश्चर्य वाटत आहे, त्याचें उत्तर काय?

## इटली व तुर्क यांचें युद्ध.

इटलीनें आतांपर्यंत नुसत्या आस्ट्रियाच्या विरुद्ध युद्ध चालविलें होतें. पण आतां तुर्कांशीं ही युद्ध करण्याचा आपला निश्चय जाहीर केला आहे. गेल्या दोन महिन्यांत आस्ट्रियांशीं युद्ध करीत असतां इटालियन लोकांना जो अनुभव आला त्यावरून त्यांचे ठिकाणीं जो आत्मप्रत्यय उत्पन्न झाला त्याचा हा परिणाम दिसतो. इटलीच्या या निश्चयानें डार्डानेल्सकडे इंग्रजांना चांगला साह्यकर्ता आयताच मिळालासें होईल व दोस्त राष्ट्रांच्या बळांत भर पडेल, म्हणून ही सुवार्ताच समजली पाहिजे.

## देशी धंदे आणि सरकारची मदत.

हिंदुस्थान सरकारचे व्यापारखात्यावरील प्रधान सर विल्यम क्लार्क हे मद्रासेस गेले असतां येथील चेंबर ऑफ कॉमर्स सभेनें देशीधंद्यांना सरकारनें मदत करण्याच्या अवश्यकतेचा प्रश्न त्यांच्या पुढें मांडला. देशीकारखान्यांना ब्यांकांकडून मदत पाहिजे तशी मिळत नाहीं अशी तक्रार होती. यावर सर वि. क्लार्क यांनीं असें म्हणण्यास काय आधार आहे असें विचारलें असतां कोणाला ही योग्य प्रमाण देतां आलें नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. ही गोष्ट खरी असेल तर यापासून आम्हां लोकांना पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. सर वि. क्लार्क यांच्या उत्तरावरून सरकार ब्यांकाकडून योग्य कारखान्यांना द्रव्याची मदत देवविण्यास तयार आहे असें अनुकूल अनुमान काढण्यास हरकत नाहीं ही एक गोष्ट झाली. दुसरी ही कीं कोणत्याही गोष्टीबद्दल तक्रार करण्यापूर्वी तिच्या मजबुतीचा पुरावा अगोदर गोळा करणें अवश्य आहे हें ही आमच्यांतल्या नेत्या पुरुषांनीं ध्यानांत ठेवावयास पाहिजे. ब्यांकाकडून देशी उद्योगधंद्यांना मदत मिळत नाहीं ही गोष्ट सिद्ध करण्यास पुरावा मिळणार नाहीं असें नाहीं. कलकत्त्याच्या बंगाली पत्रानें असें एक उदाहरण खुद्द कलकत्त्यांत घडलेलें दिलें आहे. तेथील एका स्वदेशी कारखान्याला भांडवल पाहिजे होतें म्हणून त्या कारखानदारानें कलकत्ता ब्यांकजवळ कर्ज मागितलें व तारणासाठीं कारखान्याचीं इमारत, यंत्रसामुग्री व माल ही लावून देण्यास तो तयार झाला. तथापि ब्यांक त्याला पैसे देईना. शेवटीं एका डायरेक्टरनें स्वतः जामिनकी दिली तेव्हां पैसे मिळाले. अशा गोष्टी घडत नाहींत असें नाहीं. पण अशीं प्रमाणें जमवून मग तक्रार करण्यास तयार व्हावें हें शिक्षणच आमच्या पुढाऱ्यांना मिळालेलें नसल्यामुळें त्यांना वारंवार ठेंचा खाव्या लागतात. सार्वजनिक चारित्र्याचा ओनामा आम्ही शिकत आहों अशा वेळीं अशा चुका आमचे पुढाऱ्यांच्या हातून झाल्याबद्दल त्यांना दोष देणें योग्य नाहीं, पण मागच्या ठेंचेपासून कांहीं शहाणपण शिकणें हें त्यांचें कर्तव्य आहे येवढेंच म्हणतों.

## पोलीसची गर्दी.

बडोदें संस्थानांत वाजवीपेक्षां ज्यास्त पोलीसची गर्दी आहे अशी टीका तेथील दिवाण मि. व्ही. पी. माधवराव यांनीं केली आहे. श्रीमंत महाराज साहेब या गोष्टीचा विचार करतीलच. पण एकच गोष्ट यावरून चांगली दृष्टोत्पत्तीला येते, ती ही कीं मि. माधवरावासारखा अनुभवी, निर्भीड टीका करणारा व स्पष्टवक्ता आणि कर्तृत्ववान् दिवाण लाभण्याइतकें भाग्यवान् तें संस्थान आहे. खालसा मुलुखांत सामान्यतः असा अनुभव येतो कीं पोलिस खातें म्हणजे सरकारच्या अत्यंत प्रीतीतिलें आणि विश्वासाचें खातें. तेव्हां त्याच्यावर किती ही अयोग्य खर्च झाला, तरी तो योग्यच आहे असें दाखविण्याकडे अधिकाऱ्यांची प्रवृत्ति असते. अशा स्थितींत पोलिसची संख्या वाजवीपेक्षां ज्यास्त आहे ही अनिष्ट गोष्ट आहे. व वाजवीपेक्षां ज्यास्त पोलिस ठेवण्यापासून रयतेच्या सुखांत भर न पडतां असंतोषांत मात्र भर पडते अशा प्रकारची निर्भीडपणाची पण अनुभवसिद्ध टीका राज्यकर्त्यांना खपणें ही अपूर्व गोष्ट म्हटली पाहिजे. खुद्द कलकत्ता हायकोर्टाला तेथील पोलिसखात्यापुढें वाकण्याचे प्रसंग आले आहेत. तेथें सुद्धां ज्या पोलिसाचा इतका प्रभाव दिसतो त्याच पोलिसासंबंधानें मि. व्ही. पी. माधवरावासारख्या अनुभविक दिवाणांनीं असे उद्गार काढावे ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. या टीकेचा परिणाम काय होतो तें पाहण्यास पुढील रिपोर्ट प्रसिद्ध होईपर्यंत थांबलें पाहिजे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—या सप्तकांत आकाश आभ्राच्छादित राहिल्यानें सूर्यदर्शन फारसें झालें नाहीं. पाऊसही पण विशेष पडला नाहीं. हवा सर्द झाली आहे. प्लेगचा जोर म्हणण्यासारखा नाहीं तरी पण हवा त्यास अनुकूल अशीच आहे. पिकांची स्थिति समाधानकारक आहे.

रावबहादुर काशिनाथ केशव ठाकूर, डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज, यांची रजा संपतांच त्यांची नेमणूक पुन्हां पश्चिम वऱ्हाडांतच होणार आहे. ही आनंदाची खबर होय. प्रस्तुतचे डि० व से० जज्ज रावबहादूर विनायकराव केळकर यांस येथेंच फर्स्ट ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज नेमण्यांत येत आहे.

रा. रा. गोपाळ वामन बापट, फर्स्ट ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज, आकोला, यांस चांदा येथें बदलण्यांत येत असल्यामुळें त्यांच्या उत्कृष्ट सौजन्यानें व निस्पृह न्यायबुद्धीनें त्यांचें दूर जाणें या जिल्ह्यांतील मंडळीस आवडणार नाहीं. कायद्यांतील विद्वत्ते शिवाय वाङ्मयाच्या क्षेत्रांत हे चांगले रसिक मर्मज्ञ व सहृदय असे एक लेखक व ग्रंथकार आहेत.

रा. रा. भास्कर मोरेश्वर विंद्रे, स्मॉल कोर्ट जज्ज आकोला, यांची बदली येथून बुलडाण्यास होऊन तेथील रा. रा. अच्युत सिताराम साठे यांस येथें त्याच जागीं नेमण्यांत आलें.

ता. २४ रोजीं श्रीराम थिएटरांत हल्लीं येथें असलेल्या पारशी नाटक कंपनीचा हरिश्चंद्र प्रयोग चालू असतां एक बैराग्यानें स्टेजवर जाऊन अभिनय करीत असलेल्या वारांगनेच्या पाठीवर हल्ला केला. पोलीस चौकशी सुरू आहे.

**आत्महत्याः**—परवाच्या शुक्रवारीं रात्रीं येथून जवळच बाळापूर रस्त्यावर असलेल्या रिधोरा नांवाच्या गांवीं एका महारणीनें गळ्यास फास लावून आत्महत्या केली. पोलीस चौकशी चालू आहे.

**म्युनिसिपालिटी व नामदार कमिशनर साहेबः**— गेल्या २१ तारखेला वऱ्हाडचे लोकप्रिय कमिशनर नामदार स्लांडन साहेब यांनीं येथील टौनहॉलमध्यें म्युनिसिपल सभासदांची मुलाखत घेतली. या बैठकींत म्युनिसिपालिटीचीं कामें सुरळीत व रास्त रीतीनें चालण्यास म्युनिसिपालिटीचा कार्यक्रम कसा असावा, त्यांतील अधिकाऱ्यांनीं आपणामध्यें कामाची फाळणी कशी करावी, डिविजनल मेंबर्स, साधे म्हणजे नुसते मिटींगमध्यें हाजर राहून मतें देणार मेंबर्स व ऑफिस-बेअरर्स यांचीं कामें कोणतीं व तीं त्यांनीं कशीं करावी. यांचे अधिकार काय व यांनीं कामें बरोबर बजाविलीं किंवा नाहीं हें कळण्यास काय तजविजी ठेवाव्या अशा संबंधाच्या सूचना आपणापुढें कराव्या असें म्युनिसिपल मेंबर्स यांस त्यांनीं कळविलें. यावर पुष्कळ उहापोह झाला; व त्यांमध्यें व ना. कमिशनर साहेब व मे. डेप्युटीकमिशनर मि. जठार साहेब यांनीं वेळोवेळीं सुचना पुढें आणणाऱ्या वक्त्यांकडून कांहीं गोष्टी मोघम राहिल्यास त्यासंबंधीं खुलासाही करून घेतला.

या प्रसंगानें आकोल्याचे म्युनिसिपालिटीचे देहांत नवेंच चैतन्य उत्पन्न झालें आहे अशी आमची समजूत आहे. आप आपली कामें म्युनिसिपालिटीचे सभासद कायद्या प्रमाणें व लोकादरास पात्र होईल अशा तऱ्हेनें बजावतात कीं नाहीं हें पाहण्याचें काम प्रांतिक अधिकाऱ्यांचें आहे. व तें अकोलेकरांच्या हिताच्या दृष्टीनें मे. स्लांडन साहेबांनीं या प्रसंगीं बजाविलें आहे असें आम्ही आनंदानें कबूल करितों. म्युनिसिपालिटीचे मेंबर होते वेळीं उमेदवारांमध्यें जी पराकाष्ठेची हौस दिसून येते ती हौस त्यांमध्यें मेंबर निवडून आल्यावर कायम रहात नाहीं असें पुष्कळदां अकोलेकरांच्या अनुभवास आलेलें आहे. याचीं कारणें अनेक आहेत. पण म्युनिसिपालिटीच्या नौकेच्या खलाशांवर प्रांतिक अधिकाऱ्यांची जितकी जास्त बारीक नजर असावी तितकी असणें हें एक मोठें कारण म्युनिसिपालिटीच्या औदासिन्याच्या मुळाशीं आहे यांत संदेह नाहीं. लोकांस सुशिक्षित करून लोकांच्या खऱ्या उपयोगाचीं कामें करणारे लोक अगोदर म्युनिसिपालिटींत थोडे. आपआपली व्यक्तिशः धांव पुढें कोणत्या रीतीनें होईल अशा महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन पुष्कळसे लोक म्युनिसिपालिटींत शिरतात व अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अगोदर जें कामभरेल तें करण्याची हांव धारितात. असें पुष्कळदां घडलेलें दिसून येतें. येणें करून पुष्कळदां असें होतें कीं, खरोखर लोकोपयोगी कामाकडे अशा मेंबरांचें लक्ष जितकें त्वरित जावें तितकें जात नाहीं; व तें गेलेंच तर सरकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून जातें. लोक काय म्हणतात या संबंधीं स्वतःची परीक्षा पाहण्याची इच्छा जर येथील म्युनिसीपालिटींत असती तर आपलीं बजेटें व प्रोग्राम त्यांनीं दरसाल अगाऊ लोकांच्या सूचना काय येतात हें पाहण्याकरितां प्रसिद्ध केलीं असतीं व वेळोवेळीं म्युनिसीपालिटीचे बाहेर जे व्यापारी, साहुकार किंवा इतर सुशिक्षित लोक आहेत यांचीं मतें निरनिराळ्या विषयावर तिनें नाना तऱ्हेनें मिळविलीं असतीं. इतकेंच नाहीं तर रेट-पेअर्स-असोसिएशन सारखी लोकोपयोगी संस्था लयाला जाऊं न देण्याचें श्रेय ही तिनें घेतलें असतें. तसेंच नदीचे किनारे, स्मशानभूमी व त्या बाजूचे रस्ते व इमारती या संबंधीं ज्यास्त तरतूद म्युनिसिपालिटीस ठेवितां आली असती. कोणते रस्ते आगाऊ दुरस्त केले पाहिजेत याचा विचार करणें, बाजारांतील कांहीं कांहीं महत्वाच्या जागा फुकट वापरल्या जातात हें पाहून आपला महकमा वाढविण्याची कोशीस निर्भिडपणें, करणें, मतदार लोक आहेत त्यापेक्षां उच्च दर्जाचे असावेत असे नियम करून घेणें, शिक्षणगृहें गरीब नागरिकांची सोय पाहून वस्तीच्या नजीक बांधणें, शहरांतील आठवडे बाजारांची स्थिती त्यावर शेड्स घालून सुधारणें, लोकांकरितां जास्त मुताऱ्या व मोऱ्या बांधणें, कोतवालीसमोरची अप्रशस्त घाण दूर करणें, हजारो गाड्या प्रत्यहीं बाहेर

गांवाहून येतात त्यांच्या उतारूयाकरितां जागा मार्केटाहून फार दूर नाहीं अशा ठिकाणीं राखून ठेविणें, जाणारे येणारे शेकडोशे अज्ञान उतारू ३४ कलमांत विनाकारण बळी न पडतील अशा तऱ्हेची तजविज, ठिकठिकाणीं मुत्र्या व शौचकूप बांधून करणीं. व 'पब्लिकप्लेसेस' मुकरर करणें, म्युनिसिपालिटीस केलेल्या अर्जाची दाद त्वरित लागणें, पत्रव्यवहार बरोबर व शिस्तशीर चालला आहे किंवा नाहीं हें पाहणें हुशारलोक निवडून नेमणें व स्वाभिमान व स्वमत बाजूला ठेऊन सर्वांच्या विचारानें सर्वांच्या सोई प्रमाणें ऑफिसर्स निवडणें व आपल्या शिस्तीची ऐट बाळगणें इत्यादि अनेक कर्तव्यें म्युनिसिपालिटीनें चांगलीं केलीं तर तीं करितां येण्याजोगीं आहेत. हल्लीं कामाची फाळणी बरोबर नसल्याकारणानें कामें बरोबर होत नाहींत, अर्जाचा विचार लवकर होत नाहीं व कामें एक सूत्रानें अथवा शिस्तीनें चालत नाहींत. ही गोष्ट लक्षांत घेऊन मेहेरबान कमिशनरसाहेबांनीं परवांच्या बैठकींत, म्युनिसिपल मेंबरांस आग्रहानें सांगितलें कीं आपल्या कामांची विभागणी नीट करून शिस्तीनें व निर्भिडपणें म्युनिसिपल ऑफिस- बेअरर्स व म्युनिसिपल नौकर यांनीं कामें केल्यास लोकांचें कल्याण होऊन म्युनिसीपालिटीचे मोठेपणांत भर पडेल.

निरनिराळ्या सबकमेटींचे चेअरमन यांजकडे जीं जीं स्वतंत्र कामें आहेत त्यांत होता होईल तों पर्यंत जनरल कमेटीचे व्हाईसचेअरमन यांनीं ढवळाढवळ करूं नये. व प्रत्येक सबकमेटीनें आपआपलें काम बरोबर बजाविलें किंवा नाहीं हें मात्र पहात असावें, असें त्यांनीं सुचविलें. कामाचे विभागणी संबंधानें त्यांनीं मि. गुप्ते, खानसाहेब, अमानखा, मि. महाजनी, मि. राहिमानबेग, मि. बापट, मि. खरे, यांच्या सूचना ऐकिल्या मि. महाजनी यांचें मत पडलें कीं, निरनिराळ्या सबकमेट्याकडे जीं कामें आहेत तीं कामें जनरल कमेटीचे व्हाइस चेअरमन यांनीं करूं नयेत व या निरनिराळ्या सबकमेट्यांचे चेअरमन यांजकडे त्यांचे विशिष्ट कामा संबंधानें लोकांनीं अर्ज किंवा तकरारी कराव्यात. व या सब कमेटीच्या चेअरमनांनीं सेक्रेटरीस आपआपल्या कमेटीच्या कामाच्या अमलावारीसंबंधीं हुकुम देत जावे. मि. महाजनी यांचें मुद्देसूद भाषण संपल्यावर याच आशयाचे मि. राहिमानबेग यांचें ही भाषण झालें. मि. गुप्ते यांचें मत पडलें कीं, जनरल कमेटीचे व्हाईस चेअरमन यांनीं लोकांचे अर्ज किंवा तकरारी परस्पर घ्याव्या. व त्या संबंधीं निकाल निरनिराळ्या सबकमेट्या कडून करून घेऊन त्या संबंधीं अमलावारी सेक्रेटरी कडून करून घ्यावी. खानसाहेब अमानखा यांचें मत असेंच पडलें. पण मे. कमिशनर साहेबांनीं सांगितलें कीं, जर निरनिराळ्या सब कमेट्या मुद्दाम निर्माण केल्या आहेत तर त्यांचीं कामें त्यांनींच स्वतंत्रपणें करावीत व त्याचे कामांमध्यें मुळारंभांत जनरल कमेटीचे व्हाइस चेअरमन यांनीं हात घालून या निरनिराळ्या सबकमेट्यांचे चेअरमन यास नामशेष करणें चांगलें नाहीं.

य वादविवादामध्यें, म्युनिसिपालिटीचे निरनिराळे ऑफिसर्स आपआपलीं कामें नीट करतात किंवा नाहीं लोकांच्या तकरारींचा निकाल नीट लावतात किंवा नाहीं या संबंधीं निर्बंध सदर्हु ऑफिसरास लागावा ह्मणून इंटरपेलेशन सिस्टीम ह्मणजे प्रश्न रुपानें माहिती मिळविण्याची रीत या म्युनिसिपालिटींत सुरू करावी, असे मि. त्रिंबकराव बापट यांनीं सुचविलें व ही सूचना मे. कमिशनर साहेब यांस पसंत पडली.

यावर कोणते नोकर म्युनिसिपालिटीचे नेमावे अशाबद्दल वादविवाद झाला व त्यांत हल्लींची वहिवाट ठीक आहे असें निष्पन्न झालें आहे. मात्र हेडक्लार्क यास आसिस्टंट सेक्रेटरी अशी संज्ञा देऊन वहिखात्यावर व पासबुकावर सह्या कायद्यानुसार करण्याची मोकळीक त्यास द्यावी असें बहुमत पडलें. या नियमावर बोलतांना मे. कमिशनर साहेब यांनीं म्युनिसिपल सभासदांच्या लक्षांत एक मोठी गोष्ट भरविली कीं प्रत्येक मेंबरानें, म्युनिसिपल स्टाफवर हुकमत चालवू नये. उदाहरणार्थ जाइंट स्टाक कंपनाचे डायरेक्टर हे आपले ठराव पांस करून मग म्यानेजिंग एजंटसकडे त्या ठरावाची अंमलबारी सोपवितात. तद्वत म्युनिसिपल सभासदांनीं आपले विचार अथवा ठराव ठरवून त्यांची अमलबारी करण्याचें काम ऑफिस बेअरर्स व स्टाफ यांजकडेस सोपवावे असें नामदारांनीं सांगितलें. म्युनिसिपल कामाच्या काळजी संबंधानें थोड्या अवकाशांत त्रोटकपणें आपले विचार जाहीर करून म्युनिसिपल मेंबरास आपलीं कामें शिस्तीनें निर्भिडपणें व नियमितपणें केलीं असतां लोक कल्याण होऊन स्थानिक स्वराज्य चें चीज होईल. हें मे. स्टांडनसाहेबांनीं खुबीनें व कळकळीनें सांगितलें व आपला अमूल्य वेळ आकोलेकरांच्या हिताकरितां खर्च केला त्याबद्दल येथील लोक त्यांचे ऋणी आहेत; व ते उमेद बाळगून आहेत कीं, येणेंप्रमाणें समदृष्टीनें व बारीक नजरेनें दरवर्षी म्युनिसीपालिटीच्या प्रगती संबंधीं आपली कळकळ नामदार साहेब दाखवितील व आकोला म्युनिसिपालिटीच्या इतिहासांत आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवितील.

## नोटीस

वि. ऑडीशनल मुनसफ साहेब खामगांव मु० नं० ३११ सन १९१५ ने. तारीख १६-९-१९१५

वादी

१ संपत जगदेव पाटील कुणबी रा० भोन ता० जळगांव वगैरे ईसम

प्रतिवादी

बापु माधव कुणबी पाटील रा० भोन ता० जळगांव

दावा रुपये.

जाहीर नोटीस

मौजे भोन तालुके जळगांव येथील सर्वत्र हिंदु लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, आमचे कोर्टांत वादी १ गणपत जगदेव २ संपत विठोबा ३ राव जी मारोती ४ सखाराम इण्याजी यांनी बापु माधव पाटील याजवर असा दिवाणी दावा केला आहे. कीं, मौजे भोन ता० जळगांव येथील बखळ जागा मारोतीची मढीची जागा पूर्व पश्चिम हात २४ दक्षिण उत्तर हात ३२ याची चतुः सिमा पूर्वेस तुकाराम व महेपत पाटील यांची जागा पश्चिमेस मारोतीचे मढीचा भाग दक्षिणेस बनेचंद याची जागा. उत्तरेस सार्वजनिक रस्ता येणे प्रमाणें जागा हिंदु— पंच लोकांची असून त्याची सर्व वहिवाट ही गांवकरी लोकांकडेसच आहे. असें असून बापु माधव कुणबी हा एकटाच वरील जागा अन्यायानें बळकावून बसला आहे. व त्यावर काम सुरू केलें व झोपडें ही बांधलें आहे. वरून ती जागा वादीची मारोतीचे मढीचे मालकीची आहे. असा ठराव होऊन ती जागा तब्यांत मिळणेकरितां व प्रतिवादीनें त्यावर केलेलें काम काढून टाकून पुढें काम करू नये. अशी मनाईची ताकीद प्रतिवादीस मिळण्याकरितां वरील चार इसम यांनीं भोन येथील हिंदु समाजातर्फे आपले सहीनें बापुमाधव याचेवर दि. मु. नं. ३११/१९१५ चा दावा आमचे कोर्टांत आणला आहे. तरी हे सर्वत्र लोकांस जाहिर व्हावे. ही नोटीस ता० २६-८-१५ इ० रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली असे.

सही.

*R-* D. Bhagwat.

ऑडीशनल मुनसफ

कोर्ट खामगांव.

खामगांव.

ता. २६-८-१५

नो. नं. ३४८

## जाहीरनोटीस

सावित्री मर्द भगाजी जात कुणबी आडनांव जाधव रा० हिसळी ता० मंगरूळपीर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटीस देण्यांत येते कीं, तुमचा नवरा भगाजी हा मयत होऊन अंदाजा चार वर्षे झालीं. व तो आमचा सखा चुलतभाऊ होता. आमची सर्वांची जरी वाटणी झाली होती. तरी सर्व इस्टेट वडिलोपार्जित आहे. आह्मी किंवा तुमचे नवऱ्यानें स्वतंत्र कांहीं कमावलेली नाही. तुमचा नवरा मयत झाल्यावर तुह्मी त्याची बायको ह्मणून शेती तुमचे नांवानें झाली आहे. तुमचे पोटीं कांहीं संतती नाहीं. व तुमचें पूर्ववय आहे. अलिकडे तुमचा विचार गंधर्व करण्याचा आहे. असें समजतें करितां तुह्मास मुद्दाम या जाहीर नोटिशीनें कळविले जाते कीं, तुह्मी सदर्हु जिनगी ह्मणजे शेतें, व घरें कोणास विक्री किंवा गहाण, किंवा बक्षीस करण्याचा तुह्माला अधिकार नाहीं. तुह्मी जिवंत असून आमचे कुळांत राहिपर्यंत तुह्मी त्या इस्टेटीचा उपभोग घ्यावा. तुमचे पश्चात सदर्हु जिनगीचे आह्मी खरे वारस व हक्कदार आहों. करितां तुह्मी कोणतेही प्रकारें सदर्हु इस्टेटीची विल्हेवाट करूं नये. केल्यास तुह्मी जबाबदार व्हाल कळावें. ता० २७-८-१९१५ इसवी

सह्या

१ रावजी वल्द मुकुंदजी जाधव रा० हिसळी हल्लीं मुक्काम आकोला नि० खु० हातची

२ बळीराम वा सोनाजी जाधव रा० हिसळी हल्लीं मुक्काम आकोला नि० खु० हातची

नो० नं० ३४९


सतत ९० वर्षाच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाइज्ड.

## सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुळे पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. १।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक-** डा. गौतमराव केशव, आणि सन्स. ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३

# NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

NAGPUR:
The 19 th August 1915.

Sd./ J. T. Marten,
*Chief Secretary to the Chief Commissioner.*
*Central Provinces.*

RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of identity will be specially useful to young men of good family, as it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions.

Those who are desirous, however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of or in addition to, a certificate of idetity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production before authorities outside Inbia of a certificate of ibentity, unless supplemented by documentary evidence of respectadility, is not sufficient to ensure that a passport will be granted.

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1, Name of applicant ______
2. Fathe's name and caste ______
3. Residence ______
4. Age of applicant ______
5. * Nationality of applicant ______
6. Social or pecuniay status of father ( or guardian ) ______
7. Date of probable departure of applicant from India ______
8. Object of applicant's visit to England ( Europe ) / America / japan. ______

Signature of Deputy Commissioner or Political Agent, or Head of School or College. ‡

Signature of applicant.

Signed before me.

Deputy Commissioner or Political Agent.

Dated ______

* i. e., Whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of Native State.)

‡ Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of Schools or Colleges.

NOTE:—Holders of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport. unless it is supplemented by documentary evidence of respectability endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, certifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

## नोटीस

विद्यमान सबजज्ज साहेब बहादूर कोर्ट मलकापूर.

कि. दि. मु. नं. ६९ सन १९१९

अर्जदार

रामसींग मोहनसींग रजपूत आ. पा. इष्ट मित्र आई तापाबाई मर्दे मोहनसींग रा. मलकापूर सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं मोहनसींग रतनसींग रजपूत हा ता. १३-८-१९१४ इ. रोजीं कजबे मलकापूर येथें मयत झाला आहे.

त्याचे वारस या नात्यानें अर्जदार रामसींग वा॥ मोहनसींग रजपूत आ. पा. इष्टमित्र आई तापाबाई मर्दे मोहनसींग रा॰ मलकापूर यानीं वारसाचें सक्सेशन सर्टीफिकीट मिळण्याकारितां आमचे कोर्टांत ता. ९-८-१९१९ इ. रोजीं अर्ज दिली. त्याची चौकशीची तारीख २९-९-१९ ही नेमिली आहे, तरी त्याचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असल्यास नेमलेल्या तारखेस कोर्टांत हजर व्हावे कळावें तारीख २३।८।१९१९

M. C. Tiwari.
Sub judge.
Malkapur

N. N. 346


सतत ४२ वष चालेलला कारखाना

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मर्दार भुलेश्वर -- मुंबई.

एकच माव! ओटो सुरंगीं ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिन, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळयास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळया भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळयापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळया भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळयास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व कितना निरनिराळया सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, चिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes s record for the company. The next Division of profits will be madea at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें